१८८१

म. ग्रं. सं. ठाणें.

विषय काव्य

सं. क्र. १५५३

REFBK-0011991

REFBK-0011991

९९९१
दा. क्र.
शाखा

# चैत्रबन

लेखक

ग. दि. माडगूळकर

REFBK-0011991
REFBK-0011991

प्रकाशक
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
७२९ बुधवार, पुणें २

सर्व हक्क लेखकाच्या
स्वाधीन

चित्र
दीनानाथ दलाल

किंमत बारा रुपये

प्रथम आवृत्ति
डिसेंबर १९६१

मुद्रक
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

अण्णासाहेब किर्लोस्कर

आणि

गोविंद बल्लाळ देवल

यांच्या गीतरचनांस सादर समर्पण

३२९८ ... ३।०५
९५५३ ... २।२।६६

## पानफूल

गेल्या वीस वर्षांत, मीं चित्रपटांसाठीं पुष्कळ लिहिलें. जागा मिळेल. त्या त्या ठिकाणीं लेखणीचीं रोपें रोविलीं. त्यांच्या निगराणीला अनेकांचा हातभार लागला. कांहीं गीतें वृक्षांसारखीं फोंफावलीं. कांहींनीं लावल्या ठायींच कोमेजून माना टाकल्या. वांचलीं, वाढलीं तीं पणांत आलीं. आंखणीवांचून एक उद्यान उभें राहिलें.

श्री. ग. रा. कामतांनीं मोठ्या साक्षेपानें या उद्यानांतील प्रत्येक वृक्ष, प्रत्येक वेल तपासून पाहिली. पाला-पाचोळा, तण, मरगळ दूर केली. अभिजात रसिकतेनें हें 'चैत्रबन' मराठी वाचकांसाठीं उघडें केलें.

हीं गीतें रचतांना मला कसलाच त्रास झाला नाहीं. तीं शोधून त्यांची संगतवार पुनर्रचना करतांना श्री. कामतांनाच खरे सायास पडले. त्यांचे कसे आणि किती आभार मानूं ?

श्री. रा. ज. देशमुखांनीं आपल्या साऱ्या शक्ति पणाला लावल्या. 'चैत्रबनां' तील साऱ्या पायवाटा त्यांनीं जणुं संगमर्मरानें बांधून काढल्या. प्रत्येक पादप उठावदार दिसेल असे वाफे बांधले. आयव्ययाची तमा न धरतां ते मनःपूर्वक झटले. त्यांना शतवार धन्यवाद. दिनानाथ दलालांनीं द्वार सजविलें ते बनाहूनहि वेधक.

आभार किती जणांचे मानूं ? या सारस्वताच्या झाडांना अवधानामृतानें न्हाऊं घालणाऱ्या मराठी रसिकतेला कुठल्या शब्दांनीं गौरावूं ?

9443

## पानफूल

गेल्या वीस वर्षांत, मीं चित्रपटांसाठीं पुष्कळ लिहिलें. जागा मिळेल, त्या त्या ठिकाणीं लेखणीचीं रोपें रोविलीं. त्यांच्या निगराणीला अनेकांचा हातभार लागला. कांहीं गीतें वृक्षांसारखीं फोंफावलीं. कांहींनीं लावल्या ठायींच कोमेजून माना टाकल्या. वांचलीं, वाढलीं तीं पणांत आलीं. आंखणीवांचून एक उद्यान उभें राहिलें.

श्री. ग. रा. कामतांनीं मोठ्या साक्षेपानें या उद्यानांतील प्रत्येक वृक्ष, प्रत्येक वेल तपासून पाहिली. पाला-पाचोळा, तण, मरगळ दूर केली. अभिजात रसिकतेनें हें 'चैत्रबन' मराठी वाचकांसाठीं उघडें केलें.

हीं गीतें रचतांना मला कसलाच त्रास झाला नाहीं. तीं शोधून त्यांची संगतवार पुनर्रचना करतांना श्री. कामतांनाच खरे सायास पडले. त्यांचे कसे आणि किती आभार मानूं ?

श्री. रा. ज. देशमुखांनीं आपल्या साऱ्या शक्ति पणाला लावल्या. 'चैत्रबनां' तील साऱ्या पायवाटा त्यांनीं जणुं संगमर्मरानें बांधून काढल्या. प्रत्येक पादप उठावदार दिसेल असे वाफे बांधले. आयव्ययाची तमा न धरतां ते मनःपूर्वक झटले. त्यांना शतवार धन्यवाद. दिनानाथ दलालांनीं द्वार सजविलें ते बनाहूनहि वेधक.

आभार किती जणांचे मानूं ? या सारस्वताच्या झाडांना अवधानामृतानें न्हाऊं घालणाऱ्या मराठी रसिकतेला कुठल्या शब्दांनीं गौरावूं ?

'चैत्रबनां' तील गीतांना अर्थानुरूप चाली देऊन तीं गीतें लोकप्रिय करण्याच्या कार्यातील अर्धा वांटा श्री. सुधीर फडके या मान्यवर संगीत दिग्दर्शकांचा आहे. श्री. पु. ल. देशपांडे, माझ्याशीं ओळख होण्यापूर्वीच माझीं गीतें आवडीनें गात होते. योगायोगानें पुढें ते माझ्या गीतांचे संगीतकार झाले. या उभयता मित्रांचें ऋण ही फेडतां येण्यासारखी गोष्ट नाहीं.

आपल्या चित्रपटांतून हीं गीतें चित्रित करविणाऱ्या किती निर्मात्यांची नांवनिशी सांगूं? किती दिग्दर्शकांशीं आभारप्रदर्शक हस्तांदोलन करूं? किती गायक-गायिकांच्या ओटींत मनमोकळे धन्यवाद घालूं? किती संगीत दिग्दर्शकांचें ऋण आनंदानें माथीं घेऊं?

श्री. व्ही. शांतारामापासून गोविंदराव घाणेकरापर्यंत अनेक निर्माते या चैत्रबनाच्या लावणीस कारण झाले आहेत. राजा परांजप्यापासून मधुकर पाठकांपर्यंत अनेक दिग्दर्शकांनीं याला 'चैत्र' रूप दिलें आहे. मंगेशकर भगिनींपासून, स्वतः सुधीर फडक्यापर्यंत कैक गायक-गायिकांनीं या चैत्रबनाला स्वरसुगंध दिले आहेत. श्री. वसंतराव देसायांपासून वसंत पवारापर्यंत मराठींतील लहानमोठ्या संगीतकारांचे हात या नवशोभेसाठीं राबले आहेत. हे 'चैत्रबन' त्या सर्वांचें आहे. मी सर्वांचा ऋणाईत आहें.

पंचवटी,
मुंबई रस्ता, पुणें ३
२-१२-१९६१

*ग. दि. माडगूळकर*

# चैत्रबन

# लागले मिटाया डोळे

लागले मिटाया डोळे .
अंगाइ-गीत गा आतां !

पुरेत असलीं रुसणींफुगणीं
उद्यां रंगुं या मधुर मीलनीं
आज गातसे निद्राराणी
विसरूं तूं-मी या जगता !

तुझीं न् माझीं लटकिं भांडणें
शब्द त्यांतले लढति हटानें
जणूं भराऱ्या घेति ससाणे
कुणी पांखरें नभिं दिसतां !

विवाद आतां नकोत तसले
भाव मनाचे पुरते जुळले
विसरुनि सगळें झालेंगेलें
स्वप्निं पाहुं या पुढील कथा !

पहिला पाळणा

११८९

## लागले मिटाया डोळे

लागले मिटाया डोळे .
अंगाइ-गीत गा आतां !

पुरेत असलीं रुसणींफुगणीं
उद्या रंगुं या मधुर मीलनीं
आज गातसे निद्राराणी
विसरूं तूं-मी या जगता !

तुझीं न् माझीं लटकिं भांडणें
शब्द त्यांतले लढति हटानें
जणूं भराऱ्या घेति ससाणे
कुणी पांखरें नभिं दिसतां !

विवाद आतां नकोत तसले
भाव मनाचे पुरते जुळले
विसरुनि सगळें झालेंगेलें
स्वप्निं पाहुं या पुढील कथा !

पहिला पाळणा

## चाहूल घे

चाहूल घे, चाहूल घे
टाक हळूंच मग पाऊल गे !

सौंदर्याचे लाख शिकारी
फिरती साऱ्या रानभरी
बाणावांचुनि कुणी त्यांतला —
हृदय तुझें भेदिल गे !

धांवशील तूं कुठवर हरिणी ?
पारधि येतां पाठिमागुनी
चळतां पाऊल तुझें जरासें —
अचुक नेम तो साधिल गे !

पहिला पाळणा

३२९०४
९५५३
२,१०२
७२५

## आली प्रीतीची पहिलीच रात

अहा, प्रीतीची पहिलीच रात
आली प्रीतीची पहिलीच रात—
बहरांत !

सखे ग मजवरी
कशी झिमझिम करी—
बरसात—
चांदरात !

गगनाच्या अंगणीं
प्रियकर बघुनी
फुलली ताराराणी
कां ग हिणविशी
हंसुनी मजशी
येइल माझाही नाथ—
सदनांत !

पहिला पाळणा

# जाग, जाग, जाग सख्या

जाग, जाग, जाग सख्या, उजळल्या दिशा !

शशिमंडळ पश्चिमेसि अस्त पावलें
तारेही बघ विलिन होउं लागले
हंसावाया तुजसि विमल हांसते उषा !

मधुर हा प्रभातवात गात वाहतो
प्रीतीचें गीत तुझ्या गानिं गुंजतो
ऐक तुला गाती शुकसारिका कशा !

पहिला पाळणा

## दीन दास उद्धाराया

दीन दास उद्धाराया
हीन झाला पंढरीराया !

काय वानूं गुण त्याचे
रूप घेई महाराचें !

खांदा कांबळी घेवोनी
उभा अंत्यजाचे ध्यानीं !

हीनपण भूषविलें
देवपण त्याला आलें

सान कोण थोर कोण
कुणी घ्यावें पारखून

उच्च नीच नुरलें कांहीं
पांडुरंग सकला ठायीं !

भक्त दामाजी

# धाडिला प्रीतिदूत माझा

धाडिला प्रीतिदूत माझा
देइल का ग मान तयाला मथुरेचा राजा ?

नकोस तळपूं प्रखर दिनकरा
छायांनो, द्या त्यास आसरा
वृक्षलतांनो, फुलें अंथरा
जलदेवी, दे या दूताला अमृतकलश तुझा !

मार्गांनो, व्हा जरा अकुंचित
पवना, घुमवी मंगल संगित
शीघ्र पोचूं द्या माझें हृद्गत, करितें मूकपुजा !

रुक्मिणीस्वयंवर

# एकवार सांगतें कान्हा

एकवार सांगतें कान्हा
नको येऊं वाटेला पुन्हा
भरल्या घरच्या आम्ही कामिना
नाहीं सोसणार तुझा हूडपणा !

परवां धरलास हात
कदंबाच्या वनांत
पाप तुझ्या मनांत
रंगावाणी कावा तुझा काळा
काय मिटतोस अर्धाच डोळा ?

काल मारलास खडा
माझा फुटला घडा
दह्या-दुधाचा सडा
मुलखावेगळाच करिसी चाळा
काय मिटतोस अर्धाच डोळा ?

आज ध्यानांत धर
आधीं बाजूस सर
आई ग धरला पदर
भिडला केतकीला भुजंग काळा
काय मिटतोस अर्धाच डोळा ?

अशी मारीन तोंडांत
तुझे पाडीन दांत
अब्रू जाइल जगांत
नंदराज्याला येइल अवकळा
टाकिन फोडून मिटलेला डोळा !

रामजोशी

## सवालजबाब

बया —

पंचांग सांगतां जन्म गमवला, उगाच घालतां काय भीति ?
चंद्रकोरिपुढं तुमचा काजवा चमकुन चमकेल तरी किती ?
पोथ्यापुराणं वाचुन वाचुन अक्कल वाढली असेल अती—
तर चंद्राचं चांदणं उष्ण कां शितल, सांगा हो मजप्रती !

रामजोशी —

क्षयी कोर तूं सूर्यापुढती तेज ओकिसी किती
विरहामध्यें उष्ण चांदणें, शीतल पतिसंगतीं !

रामजोशी —

पाण्यामधली एक अप्सरा सहज भाळली नरावर !
कधीं, कोण, तें सांगुन द्यावें सवालास उत्तर !

बया —

पुराणांतलीं वांगिं राहु द्या पुराणांत असलीं !
नागकन्यका उलपी पूर्वी पार्थावर भुलली !

बया —

पती सोडुनी सती कोणती रतली अविरत परक्याशीं ?
खारट त्याचें चुंबन घेई, कैक मुखांनीं दिवस-निशीं !

रामजोशी —

पतितपावन त्रिभुवनजीवन मुनिजन बोलति स्वर्गधुनी
निंदुं नको जरि सिंधुस मिळते गंगा गंगाधर त्यजुनी !

**रामजोशी —**

तुझीच दौलत, परंतु दैवें भाळीं तुझ्या नाहीं !
तुझेच असुनी, तुझ्या दृष्टिला दुर्मिळ ते पाही !

तुझ्याच पाशीं आजवरी जे रम्य दोन पेले
सुधा, हलाहल आणिक मदिरा यांनीं भरलेले !

[ बयाला उत्तर सुचत नाहीं... ]

**रामजोशी** — तुझे डोळे !
कवडि पांढरीं, लोलक काळा, लाल जरा कोने
जगती, मरती, जीव झिंगती, आंतिल नजरेनें !
शुभ्र पांढरें असतें अमृत, हलाहलाचा रंगच काळा
सांग, गुलाबी नेत्रकडांहुन मद्याचा का रंग निराळा ?
जगवी अमृत, मारि हलाहल, मद्य झिंगवी कैफांत
ताडुनि बघ हे गुण तीनही असती तुझिया नेत्रांत !

**रामजोशी —**

सूर्य उगवतां गगनामाजी,
जळीं कमलिनी कां फुलती ?
पूर्ण चंद्रमा नभांत दिसतां,
सागरास कां ये भरती ?

[ बया सवालाचें उत्तर शब्दांऐवजीं कृतीनें देते. ती रामजोश्यांचे पाय धरते ! त्यामुळें सवालाचें उत्तर सांगून श्रोत्यांचें समाधान रामजोश्यांनाच करावें लागतें ! – ]

रामजोशी—

सूर्य उगवतां कमल उमलतें,
    सिंधु उसळतो चंद्रा बघुनी
शुद्ध प्रीति हें कारण त्याचें—
    ज्ञात्यांनो, घ्या हृदयीं भरुनी !

रामजोशी

## लाडे लाडे आलें मी मोहना

लाडे लाडे आलें मी मोहना, जवळ जरा या ना, विडा तरी घ्या ना
माझ्या भरला मनांत तुमचा शिपाईबाणा !

पंचकल्याणी घोड्यावर होउनी स्वार पाहिलं जातांना
सांठवायासी रूप केला डाव्या डोळ्याचा ऐना !

झुलेदार तंग अंगरखा, कमरेचा विळखा तलवार सोडीना
लल्या नगराच्या नारी डोळं तुझं रं बघतांना !

सांवळी सुरत झोंकदार, ताठ डोईवर तुरा डुलतांना
झालें कुर्बान तुझ्यावर, पीरत मनामधीं माईना !

झाली बहाल तुझ्यावर मर्जी, ऐका ही अर्जी, जवळ मला घ्या ना
शुद्ध कुंवार नार मी रं घुतला मोत्याचा दाणा !

रामजोशी

# काठेवाडी घोड्यावरतं

काठेवाडी घोड्यावरतं पुढ्यांत घ्या हो मला
राजसा, जाउं या जेजुरीला !

भरधांव धांवुं दे घोडा रस्त्यावर
टेकतें मान मी उमद्या छातीवर
घमघमाट करतीं दवन्याचीं वावरं
मुंग्या आल्या सर्वांगाला सख्या, सोडवा मला !

विळख्यांत धरा हो, कवळुन कवळी कुडी
वाऱ्यांत झालि कीं पदराची वावडी
मज अलगद उतारा निराबाइच्या थडीं
गार लागतंय पाणि पायाला, खांद्यावर घ्या मला !

जय मल्हार

# माझ्या व्हटाचं डाळिंब फुटलं

माझ्या व्हटाचं डाळिंब फुटलं
सांगा राघू, मी नाहीं कधीं म्हटलं ?

आतां नका रुसूं
जरा जवळ बसूं
खुदुखुदु हंसूं
दोन जिवांचं भांडण मिटलं !

नका वळवुं हो मान
करा शब्दाचा मान
बघा देऊन ध्यान
माझ्या अंगावर कांटं उठलं !

आम्हा बायकांची संवय
नाहीं म्हणजेच होय !
आतां कशाचा संशय ?—
राजाराणीचं नातं पटलं !

जय मल्हार

# झोंप आली

झोंप आली, आली जांभई
राया, कसे अजून आला नाहीं ?

आळसांत मिणमिणे समई
पायांत चुरगळे दुलई
भरलीच राहिली सुरई
सेजेवरी सुकलि कीं हो जाई !

किति वेळ तळमळूं अशी
लागली रुताया उशी
मिटूं तरी पापण्या कशी
पुरविली हौस माझि नाहीं !

अगबाई वाजली कडी
आला माझा सखासौंगडी
गेली उडुन झोंपजांभई !

जय मल्हार

# माझ्या व्हटाचं डाळिंब फुटलं

माझ्या व्हटाचं डाळिंब फुटलं
सांगा राघू, मी नाहीं कधीं म्हटलं ?

आतां नका रुसूं
जरा जवळ बसूं
खुदुखुदु हंसूं
दोन जिवांचं भांडण मिटलं !

नका वळवुं हो मान
करा शब्दाचा मान
बघा देऊन ध्यान
माझ्या अंगावर कांटं उठलं !

आम्हा बायकांची संवय
नाहीं म्हणजेच होय !
आतां कशाचा संशय ? —
राजाराणीचं नातं पटलं !

जय मल्हार

# झोंप आली

झोंप आली, आली जांभई
राया, कसे अजून आला नाहीं ?

आळसांत मिणमिणे समई
पायांत चुरगळे दुलई
भरलीच राहिली सुरई
सेजेवरी सुकलि कीं हो जाई !

किति वेळ तळमळूं अशी
लागली रुताया उशी
मिटूं तरी पापण्या कशी
पुरविली हौस माझि नाहीं !

अगबाई वाजली कडी
आला माझा सखासौंगडी
गेली उडुन झोंपजांभई !

जय मल्हार

## छबीदार नार गुलजार

छबीदार नार गुलजार चालली नटून
नाकांत नथ झोकांत कशी लाखांत, दिसे ही उठून !

नेसली शाल भरजरी, गडद अंजिरी —
दाटली बरी चोळी तटतटून
अर्धीच मिटे ही डोळा, टपोरी काळा, —
इष्काचा चाळा शिकली ही कुठून ?

ही कंबर हलवी शंभर जागीं लवुन
खेळते पाठिवर वेणीची नागिण
बघतांच मदन ये मनांतला खवळुन
शालचा झोळ हातांत, पदर दांतांत, —
. लोक पहातात सुंदरा झटून !

जा, दणकट हातीं मनगट कोणी धरा
महालांत गुंतवा गिरेंबाज पांखरा
बधुं कोण मायेचा पूत असे रे खरा !
उठा झटकून !—
नटारंगीची मस्ती घ्याया लुटून !

जय मल्हार

## अपराध मीच केला

तो – अपराध मीच केला, शिक्षा तुझ्या कपाळीं !
जाणीव हीच माझ्या जीवा सदैव जाळी !

ती – जन्मांत एक झाली ही प्रीतभेट देवा
डोळ्यांतुनी हळूं या, हृदयांत पाय ठेवा
बोलूं न द्यायची मी भलतेंच लाभवेळीं
अपराध मीच केला, शिक्षा तुझ्या कपाळीं !

तो – राष्ट्रार्थ जन्मलेला मी पाहुणा क्षणाचा
भासांत गुंतवावा मी जीव कां कुणाचा ?
अक्षम्य चूक झाली, मी प्रीत दाखवीली –
अपराध मीच केला, शिक्षा तुझ्या कपाळीं !

ती – तूं लाख पीडितांचा आधार अन् विसांवा
हा पोंच मूढ माझ्या प्रीतीस कां नसावा ?
मी संत मोहवीला, जो मग्न संतमेळीं
अपराध मीच केला, शिक्षा तुझ्या कपाळीं !

तो – आतां पुढील जन्मीं संसार मी करीन
ही स्वप्नभेट वक्षीं मी तोंवरी धरीन

ती – सद्भाग्य हें सतीचें मिरवीन नित्य भाळीं
अपराध मीच केला, शिक्षा तुझ्या कपाळीं !

वंदे मातरम्

# छबीदार नार गुलजार

छबीदार नार गुलजार चालली नटून
नाकांत नथ झोकांत कशी लाखांत, दिसे ही उठून !

नेसली शालू भरजरी, गडद अंजिरी —
दाटली बरी चोळी तटतटून
अर्धांच मिटे ही डोळा, टपोरी काळा, —
इष्काचा चाळा शिकली ही कुठून ?

ही कंबर हलवी शंभर जागीं लवुन
खेळते पाठिवर वेणीची नागिण
बघतांच मदन ये मनांतला खवळुन
शालूचा झोळ हातांत, पदर दांतांत, —
. लोक पहातात सुंदरा झटून !

जा, दणकट हातीं मनगट कोणी धरा
महालांत गुंतवा गिरेबाज पांखरा
बघुं कोण मायेचा पूत असे रे खरा !
उठा झटकून !—
नटारंगीची मस्ती घ्याया लुटून !

जय मल्हार

## अपराध मीच केला

तो – अपराध मीच केला, शिक्षा तुझ्या कपाळीं !
जाणीव हीच माझ्या जीवा सदैव जाळी !

ती – जन्मांत एक झाली ही प्रीतभेट देवा
डोळ्यांतुनी हळूं या, हृदयांत पाय ठेवा
बोलूं न द्यायची मी भलतेंच लाभवेळीं
अपराध मीच केला, शिक्षा तुझ्या कपाळीं !

तो – राष्ट्रार्थ जन्मलेला मी पाहुणा क्षणाचा
भासांत गुंतवावा मी जीव कां कुणाचा ?
अक्षम्य चूक झाली, मी प्रीत दाखवीली –
अपराध मीच केला, शिक्षा तुझ्या कपाळीं !

ती – तूं लाख पीडितांचा आधार अन् विसांवा
हा पोंच मूढ माझ्या प्रीतीस कां नसावा ?
मी संत मोहवीला, जो मग्न संतमेळीं
अपराध मीच केला, शिक्षा तुझ्या कपाळीं !

तो – आतां पुढील जन्मीं संसार मी करीन
ही स्वप्नभेट वक्षीं मी तोंवरी धरीन

ती – सद्भाग्य हें सतीचें मिरवीन नित्य भाळीं
अपराध मीच केला, शिक्षा तुझ्या कपाळीं !

वंदे मातरम्

## वन्द्य 'वन्दे मातरम्'

वेदमंत्रांहून आम्हां वन्द्य 'वन्दे मातरम्' !

माउलीच्या मुक्ततेचा यज्ञ झाला भारतीं
त्यांत लाखों वीर देती जीवितांच्या आहुती
आहुतींनीं सिद्ध केला मंत्र 'वन्दे मातरम्' !

याच मंत्रानें मृतांचें राष्ट्र सारें जागलें
शस्त्रधारी निष्ठुरांशीं शांतिवादी झुंजले
शस्त्रहीनां एक लाभे शस्त्र 'वन्दे मातरम्'

निर्मिला हा मंत्र ज्यांनीं, आचरीला झुंजुनी
ते हुतात्मे देव झाले स्वर्गलोकीं जाउनी
गा तयांच्या आरतीचें गीत 'वन्दे मातरम्' !

वंदे मातरम्

## एक भाबडी मैनाराणी

एक भाबडी मैनाराणी
नांदत होती हिरव्या रानीं
कोटरांत ती लपुनीछपुनी
कधीं गुणगुणे मंजुळ गाणीं

रसरंगेला राघू कोणी
भिरभिरतांना थांबे गगनीं
गोड लकेरी येतां कानीं
तोहि उतरला हिरव्या रानीं
संगत केली डोळ्यांनीं
ओळख केली सादांनीं
रान भारिलें नादांनीं
अवचित मैना तिथें टाकुनी
फिरता राघू गेला उडुनी !

झुरत राहिली हिरव्या रानीं
अजुनि भाबडी मैनाराणी !

वंदे मातरम्

## एका ग पाठीं एक

एका ग पाठीं एक
भाऊ माझे तिघेजण
बीजेची ग ओवाळणी
तीन पेठांचे तीन खण

तीन भावांची बहीण
वेणी घालिते तिपेडी
दिल्या देणग्या भावांनीं
मूद, केवडा, राखडी

बीजेला ग आले भाऊ
आले ओलांडुनी वेस
भाग्य घेऊनिया आले
ब्रह्मा, विष्णु नि महेश !

तीन भावांची बहीण
तीन लोकांत भाग्याची
तिच्या पाठीशीं पुण्याई
तीन मागील जन्मांची !

भर तिसऱ्या प्रहरीं
कोण पाहुणे आले तीन
माझ्या ग मायबाई
तुझ्या कुशीचे नंदन

आई, तुझ्या संसाराचें
त्रिदळ हें बेलपान
त्यांत एक मी भाबडी
कळी जाईची अजाण

स्वर्गांतून घाल आई
तुझ्या मायेची पांखर
सुखी नांदतीं संसारीं
तुझीं चिमणीं पांखरं !

वंदे मातरम्

# ऊठ सांवळ्या गोविंदा रे

ऊठ सांवळ्या गोविंदा रे
फुटे गाऊल्यांना पान्हा
हंबरती बोलाविती
तुज लडिवाळा कान्हा

ऊठ सांवळ्या गोविंदा रे
पैंजणांचा ऐक नाद
पाणियासी जातां जातां
देती गवळणी साद

ऊठ सावळ्या गोविंदा रे
गोपबाळ आले दारीं
गायीवासरें सांगातीं —
दह्याभाताची शिदोरी

ऊठ सांवळ्या गोविंदा रे
सारें जागलें गोकुळ
उदयाचळीं आला देव
झालें सोन्याचें आभाळ

वंदे मातरम्

# प्रभातसमयो पातला

प्रभातसमयो पातला,
आतां जाग बा विठ्ठला !

दारीं तव नामाचा चालला गजरू
देव-देवांगना गाती नारद-तुंबरू
दिंड्या-पताकांचा मेळा
तुझिया अंगणिं थाटला !

दिठी दिठी लागली तुझिया श्रीमुखकमलावरी
श्रवणिंमुखीं रंगली श्रीधरा, नामाची माधुरी
प्राणांची आरती,
काकडा नयनीं चेतविला !

संत जनाबाई

# भरली ग चंद्रभागा

भरली ग चंद्रभागा
भरली ग दुही थडीं
पाणियांत घेई उडी
भाऊ माझा नामदेव !

भरली ग चंद्रभागा
बुडाला ग सारा घाट
तीर्थाचा ग घेई घोट
भाऊ माझा नामदेव !

भरली ग चंद्रभागा
पाण्याला ग आला चेव
पाषाणाची करी नाव
भक्तराज पुंडलीक !

पुंडलिक, नामदेव
भीवरेच्या आले तीरीं
पायरीशीं उभा हरी
मिठी घाली नामदेव !

संत जनाबाई

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 32905 वि: ३१०५
क्रमांक 91553 नों दि: 2462

# पंढरीचा देव चांगला !

पंढरीचा देव चांगला —
पुंडलिकाच्या भेटीसाठीं इटंवरी थांबला !

शिवधेवाचा ह्येनं मोडला सहजी तिरकामठा
जनकाच्या वाड्यांत दाविला चिमत्कार मोठा
सीताराणी जितली ह्येनं, बळि रावन मारिला

यमुनेकांठीं ह्येनं राखिल्या हौसेनं गाई
गोपाळांची शिळी शिदुरी आवडिनं खाई
कौंस मारुनी गांव सोन्याचा समिंदरीं थाटिला !

हांक मारितां हरी घालितो भक्तासाठीं उडी
तिन्ही जगांचा राव इठोबा दुबळ्यांचा सौंगडी
सुमरण करितां त्याचें, मेळा पापांचा पांगला !

संत जनाबाई

# कानीं कोंबुनी तुळशी

कानीं कोंबुनी तुळशी, काय निष्ठुरा ऐकशी?
डोळियाच्या करूनी खांचा, छळ पाहसी भक्तांचा
जळों तुझें देवपण, नामा आणिलें लांछन
वृथा भक्तीचें थोतांड, तुझें पाहो नये तोंड!

विठ्ठल खोटा, विठ्ठल खोटा
व्यर्थ नामाचा बोभाटा!

राबलासी माझें घरीं, केली अखंड चाकरी
आणि असा कसा अंतीं, आळ आणिलासी माथीं?
स्वयें गावला विठ्ठल, काय माळेचें त्या मोल?
आण घालते नाम्याची, आण ज्ञानोबारायाची
सत्य सांगे विठाबाई, जनी म्हणे माझे आई!

संत जनाबाई

## मी तुझ्या कांतिचें वल्कल ल्यालें

मी तुझ्या कांतिचें वल्कल ल्यालें
तुझें नाम वदनीं रे, तुझें रूप नयनीं
श्री विष्णू तूं असती माझ्या मनिंच्या सिंहासनीं !

विशाल विष्णूरूप पाहतें मी श्यामल गगनीं
स्पर्शसुखाचा मोक्ष मिरवितें रानलता-सुमनीं !

निर्झर गाती गाणीं रे
ती तुझीच अमृतवाणी
चंद्र प्रकाशे, सूर्य झळाळे
ते तुझेच दोन्ही डोळे रे
उषा आणखी संध्या फेंकिति केशर तुझिया स्तवनीं !

सीतास्वयंवर

# पैंजण पायीं माझ्या

पैंजण पायीं माझ्या रुणुझुणु बोले, रे
आनंदाच्या नर्तनांत तनुमन डोले !

हंसाकृती नौका हाले
मदनाची सेना चाले
कुठें कुठें पाणियांत गौरचरण ओले
यौवनाचें उद्यान या तपोवनीं आलें !

हंसत हंसत या मीनलोचना
गाती गीतें छेडित वीणा
सोड समाधि मुनि, भाग्य उदेलें !

मधुसंचय या कमलामधले
भृंग लुटाया गुंजत आले
तूंही तसाच येई, नयन आसावले !

सीतास्वयंवर

# गुपित सांगतें तुला

एक गुपित सांगतें तुला
आवडसी तूं मला—
श्यामला, गुपित सांगतें तुला !
दिवसां नयनीं, रात्रीं स्वप्नीं—
हंससी तूं कोमला !

अशीच प्रतिमा, असा पितांबर
असेच डोळे सतेज सुंदर
असाच हंसरा भाव मुखावर—
गतजन्मीं पाहिला !

सांग प्रिया, ही ओळख कुठली
किती युगांनीं आजच पटली
कण कण काया माझी नटली—
जीव गडे लोभला !

सीतास्वयंवर

# हें वदन तुझें कीं कमल निळें ?

हें वदन तुझें कीं कमल निळें ?
कां नयन पाहतां होति खुळे ?

विशाल झालें शांत सरोवर
नयनांपुढती अथांग सागर
शेषशायि तव रूप मनोहर—
हलकें हलकें वर उजळे !

कुठं सख्यांचा मेळा लपला
कोठें उपवन, कोठें मिथिला
श्रीविष्णू तूं, मी तर कमला
शतजन्म चुरिन मी पदकमळें !

सीतास्वयंवर

# मनोरथा, चल त्या नगरीला !

मनोरथा, चल त्या नगरीला
भूलोकींच्या अमरावतीला !

स्वप्नमार्ग हा नटे फुलांनीं
सडे शिंपिले चंद्रकरांनीं
शीतल वारा सारथि होउनि
अयोध्येच्या नेइ दिशेला !

सर्व सुखांचा मेघ सांवळा
रघुनंदन मी पाहिन डोळां
दोन करांची करुन मेखला
वाहिन माझ्या देवाला !

सीतास्वयंवर

# रुणझुणत्या पांखरा

रुणझुणत्या पांखरा, तूं जा माझ्या माहेरा !

सांग जा आईला, तूं सांग जा भाईला
सांग जा वहिनीला, तूं सांग जा बहिणीला
गुणाची मी गुणवंती आवडते भरतारा !

चांदीच्या तोड्यांत बाई, चंदेरी साड्यांत
चौसोपी वाड्यांत मी हिंडते माड्यांत
आनंदी ग नणंदा, माझा मायाळू सासरा !

हौसेनें वागतें मी सेवेला जागतें
गोडीनं नांदतें मी सुख सारं भोगतें
महिन्यानं यायाचं फळ माझ्या संसारा !

जीवाचा सखा

# एक सुरांत घुंगरू बोले

एक सुरांत घुंगरू बोले
जोडी बैलांची डौलांत चाले—
रे सजणा चाले !

पाणी मोत्याच्या झोतापरी
पाटापाटांत झुळझुळ करी
ओल्या वाफ्यांत मोतिया डोले !

बाग रायाचा आला भरा
जाई जुई फुले मोगरा
सोनें शेवंतीला लागलें !

डेरेदार ग आंब्यावरी
काळी मैना कुहुकुहु करी
गाणें गाण्यांत मिळुनी गेलें !

जीवाचा सखा

# वृन्दावनीं कुणि बाई तुळस लाविली ?

वृंदावनीं कुणि बाई तुळस लाविली
वारियाच्या झुळकीनं हळुंच डोलली !

तुळसितळीं वास करी
गोकुळिंचा कृष्ण हरी
गोविंदाच्या प्रीतिची ही डुलत साउली !

उन्हं कोवळीं सोनेरी
तुळशीच्या रोपावरी
माझ्या मनीं कुणि आलं चोरपाउलीं !

तुळशीचं रोप डुलं
सोनियानं बाई न्हालं
शेवंतीची कांति माझ्या शरिरीं हांसली !

जिवाचा सखा

## तुझ्या डोळ्याचं पडलं चांदणं

तुझ्या डोळ्याचं पडलं चांदणं
कानीं आलं ग लाडिक हांसणं

भरझोक राहिलिस उभी
तुझि राजसवाणी छबी
उकलून ओठ डाळिंबी
गूज सांगशी बोलल्याविण !

हात हातिं दिला गुलबशी
त्या गोड आठवासरशी
भर उन्हांत मी सुखवाशी
सात जन्माचं फिटलं रिण !

जिवाचा सखा

## विझले रत्नदीप गगनांत

विझले रत्नदीप गगनांत
आतां जागे व्हा यदुनाथ !

अंधारांतुनि प्रकाश निघाले
हलके हलके पूर्वा उजळे
दंवबिंदूंचे मोती झाले पर्णांच्या तबकांत !

जागी झाली सुवर्णनगरी
अरुणासह ये उषासुंदरी
सोन्याची नवप्रभा पसरली सोन्याच्या दारांत !

मायाबाजार

# चांदण्यांत चालुं दे

चांदण्यांत चालुं दे मंद नाव नाविका
तरंगती जलावरी संथ चंद्र-चंद्रिका

नकोच आज बोलणें
बोलुं देत लोचनें
लोचनांत रंगल्या भावना अनामिका !

तूंच साथ दे मला
तूंच हात दे मला
तूंच ने तुझ्यासवें मंत्रमुग्ध बालिका !

भाव जे असावले
तुझ्यांत ते विसावले
नकोस होउं रे कधीं संगतीस पारखा !

मायाबाजार

# कां असा गेलास तूं ?

कां असा गेलास तूं? ना बोलतां ना सांगतां
दो दिसांच्या संगतीची हीच का रे सांगता?

भावमाला लोपल्या ओठिंच्या ओठींच कां?
फुलविली तूं लाज गालीं सुकविण्यासाठींच कां?
पुसुन गेल्या रंग-रेखा चित्र अपुरें रंगतां !

दूर व्हाया जवळ आलीं काय वेडीं पांखरें?
ये पुन्हां ये राजहंसा, पंखि जीवा झांक रे !
हांक मारूं मी कशी रे, गूज फुटतें बोलतां !

ठाऊका ना ठाव कोठें, मार्ग नाहीं माहिती
शोध घ्याया अंतरींचे नेत्र माझे धांवती
ये उदारा, राजसा रे, आसरा दे मागतां !

मायाबाजार

# चंदनाची चोळी

चंदनाची चोळी माझें अंग अंग जाळी
सरेना कीं ग बाई, रजनी काळी काळी !

दिलेल्या वचनांची प्रीतीला स्मृति नाहीं
एकांतीं काकुळती कितीदां येउं बाई ?
विरहीं करपते देहाची चांफेकळी !

पहांटवाऱ्यासंगें येईल का रे हांक ?
होईल कां रे खरी दिलेली आणभाक ?
थांबेल दाह माझा कोणत्या लाभवेळीं ?

नसूं दे शुक्रतारा, दिसूं दे तुझें मुख
तापल्या जीवावरी होऊं दे हिमसेक
माझ्याच आंसवांच्या होतील मुंडावळी !

मायाबाजार

# नखांनखांवर रंग भरा

चला सख्यांनो, हलक्या हातें नखांनखांवर रंग भरा
ग, नखांनखांवर रंग भरा !

आज सांवलीपरी जायचें त्यांच्यामागं पाउल ग
पायीं पैंजण बांधा द्याया आगमनाची चाहुल ग
सिंहकटीवर स्वैर खेळुं द्या रत्नमेखला सैल धरा !

बाहूंवरती बांधा बाई बाहुभूषणं नागाचीं
अंचलिं झांका हृदयावरचीं कमळें हीं अनुरागाचीं
गळ्यांत घाला हार साजिरा, पदकीं त्याच्या दिव्य हिरा !

वेणी गुंफा मदनबाण, वर भंवतीं हिरवा मरवा ग
आकाशांतिल नक्षत्रासम माथीं मोती जडवा ग
सौभाग्याच्या नगरा नेतें सौंदर्याचा थाट पुरा !

मायाबाजार

## मोटेच्या रे मोटकऱ्या

मोटेच्या रे मोटकऱ्या, राणी तुझी लाजरी
डोळ्यावरी ओढी कसा पदर निळा भर्जरी !

मोटेच्या रे मोटकऱ्या, राणी तुझी गोरटी
कर्दळींचं अंग तिचं, नजर जरा चोरटी !

मोटेच्या रे मोटकऱ्या, राणी तुझी हांसरी
बोल तिचे गोड किती ! साद जशी बांसरी !

मोटेच्या रे मोटकऱ्या, ऐट तुझी रांगडी
सांगतांना गूज तुला राणी तुझी बोबडी !

मोठीं माणसं

## जिंकून फड आला—

जिंकून फड आला माझा ग पैलवान !
सोन्याचं कडं हातीं, बादली फेटा छान

हलगी लेजिमाची एकच झाली घाई
गांवांत मिरवीत विजयी वीर येई
बघून हरपलं डोळ्यांचं माझ्या भान !

नको रे, असा होऊं आपुल्या नादीं धुंद
माडीच्या खिडकींत पडद्याआड चांद
नजर वर फेंकी, कळं दे थोडी मान !

उतरूं कशी खालीं ? भोंवतीं लोक किती
लाजरी मुलखाची आलें मी काकुळती
काढूं मी दृष्ट कशी, उतरूं लिंबलोण ?

मानाचं पान

## मी तुमची जाहलें—

ती :—

या पायावर जीव वाहिला, साक्षी हीं पाउलें
मी तुमची जाहलें, जिवलगा, मी तुमची जाहलें !

तो :—

चल ग राणी, हिरव्या रानीं, गुलुगुलु गोष्टी करूं

ती :—

चला नदीच्या तीरीं राया, वाळूवरती फिरूं

तो :—

मंजुळवाणें ऐकिव गाणें, मन त्याला भुललें

ती :—

मी तुमची जाहलें, जिवलगा, मी तुमची जाहलें !...

तो :—

चल ग राणी, रात चांदणी, चांदण्यांत न्हाऊं

ती :—

धारांखालीं मल्हारांतिल प्रीतगीत गाऊं

तो :—

धारांहुनही सूर सुखाचे तुझिया ओठांतले

ती :—

मी तुमची जाहलें, जिवलगा, मी तुमची जाहलें !

मानाचं पान

## तुझं कबुतर सहजच बसलं

तुझं कबुतर सहजच बसलं माझ्या कौलावर
सख्या रे, माझ्या कौलावर
काळिज माझं उडुनी गेलं तुझिया डोलावर !

गिरेबाज पांखरूं हळूच मी पकडलं
तूं काळिज माझं नजरेनं झडपलं
अदलाबदलीमधें गुंतलीं दोन खुळीं पांखरं !

तुझं कबुतर झालं जरा घाबरं
माझं मन थरथरतंय् बावरं
गोड भीतिनं दोन पांखरां भरलं रे कांपरं !

मी कोमल हातें कुरवाळिन पांखरूं
तूं अंतर माझे नको गडे कुस्करूं
लाडिगोडिचा सौदा पटला पहिल्या मुहुर्तावर !

मानाचं पान

## तळमळे जीव गडे सारखा

चांद उगवला, नाहीं आला माझा प्राणसखा
तळमळे जीव गडे सारखा ।

वाळ्याचा हा पडदा ओला
चंद्रकरांनीं किती तापला
झळा लागती सर्वांगाला
शय्येवरचा गुलाब टोंचे मज कांट्यासारखा ।

माझी मी तर आधीं व्याकुळ
दुष्ट चांदणें जाळी घरकुल
अजुन न वाजे कीं तव पाउल
सखा जीवाचा आज कसा हो मज वैऱ्यासारखा ।

वादळवाऱ्या, तूं तरि येई
मालवुनी जा इथली समई
मालव तारा, चंद्रकोर ही
मालव माझी प्राणज्योत ही, ये देवासारखा ।

मानाचं पान

## नाचते शिवापुढें भिल्लिणी

पैंजणें रुणझुणतीं चरणीं
नाचते शिवापुढें भिल्लिणी !

अंबिका माया मनमोहिनी
नाचते शिवापुढें भिल्लिणी !

कटीवर गुंजांच्या मेखला
फुलांचा साज नवा घातला
शिरावर मोरपिसें खोंवुनी –
चमकते विजेपरी चंचला
लोचनीं मदनाच्या लीला
पाहते भिंवई उंचावुनी !

समाधी सोडुनि शिव भोळा
न्याहळी उघडुनिया डोळा
हांसली हिमगिरिची बाळा –
मनोमन लाजुनि आनंदुनि !

मानाचं पान

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 32108 वि: 91021
क्रमांक 2543 नों दि 7/2/8

# कबीराचे विणतो शेले

कबीराचे विणतो शेले कौसल्येचा राम
भाबड्या या भक्तासाठीं देव करी काम
राजा घनश्याम !

एक एकतारी हातीं, भक्त गाइ गीत
एक एक धागा जोडी जानकिचा नाथ
राजा घनश्याम !

दास रामनामीं रंगे, राम होइ दास
माग चालवीतो प्रेमें, विटेना श्रमास
राजा घनश्याम !

विणुन सर्व झाला शेला, पूर्ण होइ काम
ठायिं ठायिं शेल्यावरतीं उठे रामनाम
गुप्त होइ राम !

हळू हळू उघडी डोळे पाहि जों कबीर
विणूनिया शेला गेला सखा रघुवीर
कुठें म्हणे राम ?

देव पावला

# कुणि म्हणेल वेडा तुला

कुणि म्हणेल वेडा तुला
कुणि म्हणेल वेडी मला
या वेडाची गोडी ठाऊक
तुझी तुला अन् माझी मला !

हें वेड जगावेगळें
तें जगास कुठुनी कळे !
जगावेगळा छंद लागला
तुझा तुला अन् माझा मला !

मज येईना बोलतां
तुज साधेना सांगतां
मुक्यासारखे बघती डोळे
तुझे मला अन् माझे तुला !

हें दोन जिवांचें कोडें
तें ज्याच्या त्या उलगडे
त्या कोड्याची फोड माहिती
तुझी तुला अन् माझी मला !

देव पावला

# जा मुली शकुंतले, सासरीं

जा मुली शकुंतले, सासरीं
आवरी डोळ्यांमधल्या सरी !

वडिल मंडळी असतिल कोणी
वागच त्यांच्या अध्यां वचनीं
सवतींलागीं मानुनि बहिणी
राही सदा हंसरी !

पतिसेवा हें ब्रीद आपुलें
देवाहुन तीं थोर पाऊलें
रागेजुन ते जरी बोलले
बोलुं नको त्यावरी !

दोन्ही कुळांचें नांव वाढवी
पतिव्रतेची पदवी मिळवी
संसारी तुज वाण नसावी
लक्ष्मी तूं साजिरी !

देव पावला

## हीच मळ्याची वाट

हीच मळ्याची वाट !

पानंदींतिल तांबड माती
गवतांचीं वर नाजुक पातीं
शिवेलगतच्या वळणावरती
हिरवा शेला पांघरलेली जांभुळ ही घनदाट !

सुरपारंबी इथें खेळलों
सांवलींत या थकुनी बसलों
उगा भांडलों, उगीच हंसलों
खडे चिमखडे यांनीं सजला अपुला सारीपाट !

याच वडाच्या पारंब्यांवर
उंच चढविले झोके झरझर
घरीं परतलों दिस टळल्यावर
गुरांसंगतीं गात चाललों लपती पाउलवाट !

पुढचं पाऊल

# झाला महार पंढरीनाथ !

काय देवाची सांगू मात ?
झाला महार पंढरीनाथ

नेसला मळिण चिंधोटी
घेतली हातामधें काठी
घोंगडी टाकिली पाठीं
करी जोहार दरबारांत !

मुंडाशांत बांधली चिठी
फेंकतो दुरून जगजेठी
'दामाजीनं विकली जी कोठी -
त्याचं घ्यावं दाम पदरांत!'

खळखळा ओतिल्या मोहरा
'घ्या जी मोजून, पावती करा'
ढीग बघून चमकल्या नजरा
शहा घाली बोट तोंडांत !

पुढचं पाऊल

# जाळीमंदीं पिकलीं करवंदं

भर उन्हांत बसलीं धरून सांवली गुरं
न्हाइ चिंता त्यांची तिन्ही सांजपातुर
चला दोघं मिळुनी चढूं टेकडीवर
चढतां चढतां धरा हात कीं वाट नसे रुंद
जाळीमंदी पिकलीं करवंदं !

तुम्ही बाळपणापासून जिवाचं मैतर
ही तरुणपणांतिल बाळपणाची लहर
कुणी बघत नाहीं तो चला गडे लौकर
आंबटगोडी चाखुं वाटतें, पुरवा कीं छंद !

मज लाज वाटते सांगाया तें धनी
घ्या तुमचं तुम्ही जरा तरी समजुनी
पाळणा उद्यांचा हलतो माझ्या मनीं !
दऱ्या टेकड्या चला धुंडुं या होउन बेबंद !

पुढचं पाऊल

## कुणी मला सोडवा

डोईवरी पाण्याचा ग माठ
मी हळुंहळुं चढतां यमुना-घाट
कशी पडली अचानक गांठ !

गोकुळांतला चोर आला
नंदाचा हा पोर आला आडवा
कुणी मला सोडवा !

त्यानं माझी रोखिली ग वाट
खडा मारला अन् फोडिला कीं माठ !
उभा राहुन हांसे वर धीट !

खट्याळ हा श्रीरंग, बाई
भिजविलें अंग, झोंबे गारवा !

काय म्हणूं मी याच्या खोडिला ?
ओला पदर कीं माझा ओढिला।
चंद्रहार गळ्यांतला तोडला –
कुणीतरी धांवा !–

कुणी ऐका माझी हांक, बाई
घाला थोडा धाक, वेड्या माधवा !

कुणी नाहीं इथं चिटपांखरूं
माझी मला मी कशी सावरूं ?
सूर मुरलीचे झाले सुरू

पुढें पडेना पाय बाई
आतां करूं काय ? — मोही गोडवा !

पुढचं पाऊल

## आला नाहीं तोंवर तुम्ही —

गुलजार चांद तुम्ही, मी चांदनी नव्हं का
घ्या मौज चांदण्याची सरदार अर्ज ऐका ! —
आला नाहीं तोंवर तुम्ही जातो म्हणतां कां ?
कां हो बोलत नाहीं कां ?
राया, हांसत नाहीं कां ?
आला नाहीं तोंवर तुम्ही जातो म्हणतां कां ?

बारा महिनं पडंल चांदनं तुम्ही राहिल्यावरी
पुनव रोजची होइल राया, नांदा माझ्या घरीं
मी करीन चाकरी तुमची जैसी लग्नाची अस्तुरी !
कां हो ऐकत नाहीं कां ?
राया, हांसत नाहीं कां ?
आला नाहीं तोंवर तुम्ही जातो म्हणतां कां ?

माझ्यासंगं करा संगती, रंगवुं या जिंदगी
बहारीच्या बादशहा घ्या लाखवार बंदगी
घ्या विडा जुळविला प्रीतीची वानगी
कां हो बोलत नाहीं कां ?
राया, हांसत नाहीं कां ?
आला नाहीं तोंवर तुम्ही जातो म्हणतां कां ?

पुढचं पाऊल

## माझ्या जाळ्यांत गावला मासा

आला चमकत बिजली जसा
माझ्या जाळ्यांत गावला मासा !

चांद पुनवंचा पान्यामधीं
त्याला माशानं गिळला कधीं
चांदी चमचमते रंगामधीं
उद्यां पैक्यानं भरनार कसा !

मासा इकून घेईन साडी
काळ्या रंगांत पांढरी खडी
नथ नाकांत एक वाकडी
कोळीवाड्याला घालीन वळसा !

उद्यां येनार नटुनी थटुनी
जशी जलांतली जलरानी
थाट रूपाचा माझ्या बघुनी
जाळ्यावांचून गुतंल मासा

पुढचं पाऊल

## मच्छगंधा हो देवा, माझं नांव!

राजधानी धन्य धनवंत हांस्तिनापुर
उंच उंच इमारती, भारी उंच गोपुरं
गुणवंत राजा तेथला प्रतापी चतुर
कीर्तिवंत धुरंधर त्याचें नांव जगभर!

शांतनु राजा रूपवंत गौर मनोहर
पांच पोषाख मुगुट धनुष्यबाण कटिस तलवार
वय झालें अर्धं तरी शरीर कसदार
बघतांच भाळावी रती असा झोंकदार!

वेष पालटुन राजा एकदां निघे शिकारीला
दुपारची वेळ मध्यान्हीं दिवस कीं आला
तों दुरुनी वाऱ्याच्यासंगं सुगंध फार सुटला
कुठं फुललं हजार पारिजातक कळेना त्याला!

वासासंगं राजा चालला
चालतां चालतां आला यमुनातीराला
तिथं एक मदमस्त पाहिली बाला
माशासाठीं फेंकुनी जाळं, गाई गीताला!

**नट :** हे सुंदरी, तूं कोण आहेस? हजार पारिजातक फुलल्याचा सुगंध तुझ्या रूपाचा किंवा काय?

**नटी :** आपण कोण? आपलं नांव काय? गांव कोणतं?

**नट :** तूंच सांग अगूदर.

नटी : सांगते ऐका —

मच्छगंधा हो देवा, माझं नांव
आपुन कोन सांगा नांव गांव !

कां हो असं बघतां टक लावुनी ?
मी रानवट पोरगी गेले भारी लाजुनी
समींद्राचीं आमी लेकरं, मच्छ खेळणीं
कधीं नाहीं नगर पाहिलें भोळा सभाव ...

मच्छगंधा हो देवा, माझं नांव
आपुन कोन सांगा नांव गांव !

नट : अग, तूं जळांतली जळवंती
पहातांच जडली प्रीति तुजवरती
काय गंगेवाणी खालीं उतरली रती ?
काय ओलें लावण्य लाभलें ! काय हावभाव !

नटी : मच्छगंधा हो देवा, माझं नांव
आपुन कोन सांगा नांव गांव !
वाळवंटी कां उभं रहावं
या बसूं नौकेमंदी राव

दोघं नौकेमंदी बसली,
नौका पाण्यावर पोहूं लागली
हंसावर बसून जणुं कांहीं विष्णु लक्ष्मी चालली !

**नट :** ने अशीच सुंदरी नाव —
मी हस्तिनापुराचा राजा शंतनुराव !

**नटी :** प्रत्यक्ष महाराज? . . . महाराज, आपन कोन. . . मी कोन?. . .

**सोंगाड्या :** ऐका—

ही अशी तऱ्हा प्रीतीची
नाहीं शुद्ध जाती-गोतीची
तात्यारावाची रचना वेगळी अस्सल जातीची—

**नटी :** सभंपुढं गाई मोगरी करून हावभाव
मच्छगंधा हो देवा, माझं नांव
आपुन कोन सांगा नांव गांव !

पुढचं पाऊल

# नारदा, वसतो मी तेथें

नारदा, वसतो मी तेथें
गातात भक्त मम जेथें !

झडती जेथें मृदंगवीणा
दास हरीचे करिति कीर्तना
भान हरपुनी करिति नर्तना
भक्तिरसाचें येतें भरतें !

सत्याचें जे करिती पूजन
सत्य तोच मी श्रीनारायण
सत्यप्रेम तें माझें चिंतन
सत्यमेव जयते !

नवरावायको

# बाळा जो जो रे

बाळा जो जो रे, लडिवाळा
थांबव घुंगरवाळा !

आली यक्षाची यक्षिणी
गंधर्वांची राणी
आली फुलांची फुलराणी
या ग करूनी मेळा
माझ्या आंदोला वेल्हाळा !

आल्या देवता रंगांत
गाती सारंगांत
केला स्वप्नांचा हिंदोळा
लागूं दे रे डोळा !

साऱ्या देवींच्या गाण्यांत
कमळं झोंपलीं पाण्यांत
सरला वाळ्याचाहि चाळा
गुंगी आली रे आभाळा !

नवराबायको

# मी प्रीत तुझ्यावर केली

मी प्रीत तुझ्यावर केली !
नांव सोडलें, गांव सोडलें, जननिंदा साहिली !

नीतीची ना भीती
मी एक जाणली रीती
होती नव्हती रूपसंपदा पायावर वाहिली !

मी वेडी जगतीं ठरलें
जग तुझ्यांत माझें विरलें
त्या तिथेंच मीपण सरले
तुझ्या लोचनीं, तुझ्या बंधनीं मोक्षसुखें पाहिलीं !

नवराबायको

# जागी झाली डोळ्यामंदी लाज !

काय झालं बाई तरी आज ?
जागी झाली डोळ्यामंदी लाज !

भिवईच्या कमानींत राहुन
प्रीत हांसे कुणाला ग पाहुन
ऐन ज्वानीचा लेऊन साज ?

कां हो उघडून मिटतां तिनदां
मऊ पापण्यांचा नाजुक पडदा
कोण दिसला गडी ऐटबाज ?

कां हो, दुरून बघतां तरी ?
सारं वाहीन पायांवरी
माझ्या डोळ्यांत या महाराज !

वंशाचा दिवा

# वाट पाहून डोळं थकलं

वाट पाहून डोळं थकलं, रं
माझं पाखरूं कसं बाई चुकलं ?

झुले फुलून शाळू गहिरा
कनसं भरून ये हरभरा
हिरव्या गव्हांत डुलतो तुरा
लोंबी लोंबींत माणिक पिकलं !

हांक देते तुला पांखरा
अरे माझ्या लाडक्या चोरा
कुठं दिला आज गुंगारा ?
तुझ्यासाठींच धन हें लपलं !

दिली टाकुन मी गोफन
बस हातावरी येऊन
ओला चारा तुला घालिन
माझ्या शिवारीं मोतीं पिकलं !

वंशाचा दिवा

## थंडगार सुटली हवा —

थंडगार सुटली हवा
ग बाई, मी जाते सख्याच्या गांवा !

दिवसा मनाला एकच चाळा
रातीं डोळ्याला लागंना डोळा
सारखं वाटतं सखा भेटावा !

एकदां दोनदांच झाल्या भेटी
घट्ट बसल्या रेशिमगांठी
ओढ लागली ग माझ्या जिवा !

लइ दिवस जिव्हारीं दडलं
जें घडूं नये तें घडलं !
त्येच्या डोळ्यांनीं साधला दावा !

त्यो येत न्हाइ तर न्हाई
मी होवून जाईन बाई
बायकांनीं मान इसरावा !

वंशाचा दिवा

# पाव्हनं एवढं ऐका

**नटी :–** पाव्हनं एवढं ऐका जी, पाव्हनं एवढं ऐका !
थांबा थोडं बांधा घोडं, उगीच गडबड कां ?
पाव्हनं एवढं ऐका ! ...

**नट :–** तरी न्हाई भागनार ! —

वायदा केला, उशीर झाला घरांत बघतिल वाट
अंधाराच्या आधीं म्हणतों उतरीन अंबाघाट !
सबूद देतों, लौकर येतों, उगाच अडवूं नका —

**नटी :–** —तरी बी जाऊं नका !
पाव्हनं एवढं ऐका !

कसं ध्येनांत येईना तुमच्या ?

अहो, लगीन ठरलं, आतां काय उरलं ?
लाज नका जी धरूं !
आजपासुनी तुमचं झालं राजहंस पांखरूं !
घ्या सरदारा, मोतीचारा, सोडून जाऊं नका—
मजसी रुसवूं नका !
पाव्हनं एवढं ऐका !

नट :- अहो, पण रुसण्यासारखं काय हाय त्यांत ?

नटी :- रातीं उखडतं, अंगनीं पडतं, चैताचं चांदनं...

नट :- नको उखाणं, कळुं द्या म्हणणं, —
काय तुमचं मागणं ? —

नटी :- चार दिवस न्हावा !
माझ्या हातचं जेवा
संधी दवडूं नका !
सोंग पांवरूं नका...
पाव्हनं एवढं ऐका जी, पाव्हनं एवढं ऐका !

वंशाचा दिवा

## लिंबोणीच्या फांदीवर

लिंबोणीच्या फांदीवर कावळा बोलतो
बाई कावळा बोलतो
कां ग बाई, माझा आज डावा डोळा लवतो

काळजांत हुरहूर
दिठी घुटमळे दूर
वेशींतुनी गांवामंदी निळा घोडा दौडतो !

मनीं गेलं मी लाजून
कशी करूं लिंबलोण ?
आवडीचा ओळखीचा शब्द दारांत उठतो !

ओळखीच्या खाणाखुणा
आला घरचा पाहुणा
जिवाचा ग जिवलग हळुं पायरी चढतो !

जोहार मायबाप

# सुख नांदे सखे बाई

सुख नांदे सखे बाई, माझ्या माहेरीं !
इथें माझा जीवभाव, इथें पंढरी —
माझी इथें पंढरी !

अंगणांत वृंदावन
माउलीची आठवण
इथें छेडिली बाबांनीं सये एकतारी !

मायाळू ग माझा भाऊ
किती त्याचे गुण गाऊं ?
गोरी माझी भावजय सुगरण भारी !

झोपडीच्या आसपास
कडू लिंब गोड वास
दुःख सुखावलें येथें मायेच्या संसारीं !

जोहार मायबाप

## माझा वाढला संसार

माझा वाढला संसार !
जेथें पाहो तेथें एका वडाचा विस्तार !

आम्ही विठ्ठलाचीं बाळें
खेळ खेळतो लडिवाळें
एक्या भावें नांदूं उंच-नीच सान-थोर !

नाहीं काळाचीही भीती
मूळ गावलें अनंतीं
संतांसंगें संत झाला हीनदीन म्हार !

जोहार मायबाप

# अजुनि कसा नाथांचा —

अजुनि कसा नाथांचा रथ बाई येइना ?
मनीं भीमकी म्हणे कसा ग, समय उभा राहिना ?

लटक्या भावें प्रतिमा वंदुनि
उभी मंदिरीं राजनंदिनी
मनीं मनोहर, श्याम लोचनीं
हातीं धरलें सुमनहि वेडी देवीसी वाहिना !

विचार एकच करी सारखा
असेल त्यांची प्रीत तरी का ?
किती दूर ती पुरी द्वारका ?
चुकामूक का होइल अंतीं ? – साहेना कल्पना !

पहिल्या भेटीविना विरहिणी
वाट प्रियाची बघे रुक्मिणी
विवाहघटिका सलते नयनीं
मिटे पापणी, तरीहि झरती जळधारा राहिना !

श्रीकृष्णदर्शन

# सखे मालिके, सांग मला

सखे मालिके, सांग मला
भाव तयांच्या मनांतला !

भेटी झाल्या जेव्हां अमुच्या
काय उमललें मनांत त्यांच्या ?
गूज तें ठावें केवळ तुला !

छातीवरती त्यांच्या रुळतां
थबकलीस तूं काय ऐकतां ?
काय गे, साद तरी उमटला ?

नयनांची मज नकळे भाषा
मनीं मोहरे वेडी आशा
कळेना अर्थ गडे यांतला !

अबोल कां तूं अशी गुणवती ?
तूं प्रीतीची त्यांच्या दूती
वाटतो सवतभाव का तुला ?

श्रीकृष्णदर्शन

# कमलिनी, मी कमलिनी !

कमलिनी, मी कमलिनी !
उभी मी जलावर उमलुनी !

तीरावरती प्रभो, उभा तूं
येउं कशी मी जवळ परंतू ?
घेइ तूं देवा, मज उचलुनी !

थरथरते मी रुजल्या ठायीं
चरणलाभ कां मजसी नाहीं ?
देइ मी गंध वनीं उधळुनी !

सुगंधांतली जाण भावना
पुरव मुक्याची प्रभो, कामना–
मला परि मारुं नको सुकवुनी !

श्रीकृष्णदर्शन

# सुखें जा झोंपीं राजकुमारी !

सुखें जा झोंपीं राजकुमारी !
चांदण्यांतला वारा ढाळी चांदीची चवरी !

घरोघर मिटल्या दीपकळया
जुळविल्या कमळांनीं पाकळया
भासते स्वप्नासम नगरी

झोंपले मीन जळीं खेळतां
झोंपल्या मीनाक्षी बोलतां
झोंपलें जीवन वनिं-मंदिरीं !

एकला मदन परी सावध !
शोधितो अंधारीं पारध !
मिटुन घ्या मृगनयनें सत्वरीं !

श्रीकृष्णदर्शन

## खेळुं या खेळ चला साजणी

फुलल्या चंपकवनीं
खेळुं या खेळ चला साजणी !

गरगर फिरुनी भुगा
फुलवि कळीच्या रंगा
अशी हरघडी
चाले फुगडी
करांत कर गुंफुनी !

तुरुतुरु चाले कैसी
हंसामागुन हंसी
पाठशिवणिचा
पाठ प्रीतिचा
आजच घ्या शिकुनी !

भिरभिर फिरतो वारा
झुलवितसे फलभारा
असा सारखा
हलतो झोंका
झोल्यावर बसुनी —
खेळुं या खेळ चला साजणी !

श्रीकृष्णदर्शन

## अबोल झालिस आज कशानें ?

अबोल झालिस आज कशानें
        सखी, कुणी तुज छळलें का ?
कुणी फेंकिले बाण फुलांचे
        तुझें तुला तरि कळलें कां ?

        मदननृपाची कृपा गडे ही –
                सरला आतां बालपणा !
        तुला नाहिं पण जगास दिसती
                डोळ्यांमाजी अशा खुणा !
        कधीं नाहिं ते अल्लड डोळे
                लाजुन खालीं वळले कां ?

बघतां बघतां आज बदलली
        अशी कशी ग तव कांती ?
चार दिसांनीं विचार जाउन
        तूंच प्रियकरा एकांतीं !
सांग येउनी माझ्या कानीं
        उत्तर कांहीं मिळलें का ?

एकांताची रात सखे, ती
        पहिलीवहीली नवलाची !
कुठलें उत्तर भृंगासंगें
        भेटी होतां कमलाची ?
अधरावरती मधुबिंदू मग
        हृदयावरती नखरेखा !

श्रीकृष्णदर्शन

## काय गाळतोसी डोळे —

काय गाळतोसी डोळे पिटुनीया ऊर ?
स्वप्नांतली नौका वेड्या, स्वप्नांतला पूर !

शोधूं पाहतोसी कैसा असारांत मेळ
संसार हा स्वप्नांतल्या बाहुल्यांचा खेळ
ऐक होउनीया जागा वैष्णवांचे सूर !

संसाराचें भय आम्हां भागवतां नाहीं
आठवितां आगेमागें उभी विठाबाई
नामघोष ऐकूं येतां दुःख पळे दूर !

सत्य एक विठ्ठलभक्ति, आन तो आभास
विश्वासही जिंकूं ऐसा आमुचा विश्वास
कल्पांतींही राहूं आम्ही नामरंगीं चूर !

संत कान्होपात्रा

## तुझा पोंचला सांगावा –

तुझा पोंचला सांगावा, आलों, निघालों केशवा !

माझा आठव काढिला, अग्नि बोलावूं धाडिला
आली मृत्यूची पालखी, खूण माझी मी ओळखी
जीव कासया गुंतावा जातां माहेरच्या गांवा ?

संगें घेतली शिदोरी, तुझिया नामाची माधुरी
माझा दागिना गोपाळा, एक तुळशीची माला
बांधाबांध सारी झाली, लेक माहेरा निघाली

दीस परतीचा केव्हां माझा मज नाहीं ठावा !

संत कान्होपात्रा

# सासऱ्यासी जाते

सासऱ्यासी जाते, माझी भरा कुणी ओटी
आंसूं डोळ्यांत दाटले, हांसूं फुले ओठीं !

सात जन्मांची पुण्याई आज माहेरून आली
उभें सौभाग्य राहिलें दारीं माझ्यासाठीं !

एका प्रीतीनें बांधले दोन मनें, दोन जीव
करूं सुखाचा संसार धरणीचे पाठीं !

संत कान्होपात्रा

# हरिनाम सदोदित गाई रे !

हरिनाम सदोदित गाई रे !
नलगे साधन,
नलगे जपतप
स्मर नित विठ्ठल-रखुमाई रे !

ज्या योगी न पावती योगबळें
ज्या ज्ञानी न जाणती ज्ञानबळें
वश भक्तां हरि तूं होई रे !

सुखशांति हरीचे उभयचरण
स्मरतां ते पुनः नच जन्ममरण
सुख सर्व हरीच्या पायीं रे !

जो विठ्ठलनाम निज अधरीं धरी
रे त्याचें मागेंपुढति हरी
जो निशिदिनिं सन्निध राही रे !

प्रभूचे पदरज — ती तर मुक्ति
भवतारकु ही हरिपद-भक्ति
पथ ह्याविण सोपा नाहीं रे !

विठ्ठल रखुमाई

# काहूर उठे—

काहून उठे, काहूर उठे, अनिवार व्यथा मी साहिली
अंधार घरीं, अंगार उरीं, दिनरात जिवाची काहिली !

बोललें नाहीं कुठेंही, दुःख ओठीं दाबलें
लाभ ज्याचा व्हावयाचा तेंहि नाहीं लाभलें
हाय ! माझी मीच डोळां वंचना हीं पाहिली !

संयमानें कोंडलेल्या शुष्क आशा सांठल्या
आग लावी राग त्यांना, मानसीं त्या पेटल्या
दाह आतां सोसवेना, जळत काया राहिली !

संपला अंधार आतां, संपलीं आंदोलनें
भस्म झालें भाकितांचें, जळुन गेलीं मीलनें
लोचनीं ना नीर आतां—शपथ ऐसी वाहिली !

कुंकवाचा धनी

# तुजसाठीं रे घननीळा

तुजसाठीं रे घननीळा
गुंफिते बकुळांच्या माळा

सुमनांसह मी भाव गोविते
अनंत कीर्ती तुझी ओविते
चिंतिते रंग तुझा सांवळा !

तुझ्या प्रीतिची मुग्ध साधिका
क्षणांत होतें मीच राधिका
पाहते रासांचा सोहळा !

रुक्मिणि होउनि राजपथावर
चढते हरि मी तुझ्या रथावर
घालिते हांसत वरमाळा !

स्वप्नें पण हीं क्षणभर टिकतीं
माळा माझ्या करांत उरती
पाहतां नीर भरे डोळां !

पारिजातक

# चित्र तुमचें रेखिते

चित्र तुमचें रेखिते मी –
चित्र तुमचें रेखिते !

पापण्यांच्या कूर्चिका या, लोचनांची रंगदाणी
ओलवीतें भाव माझे आंसवांचें धुंद पाणी
आसभासां माखिते मी –
चित्र तुमचें रेखिते !

काजळानें रंगवीली सांवळी ती अंगकांती
वक्षभागीं डोलताहे प्रीत माझी वैजयंती
तीच हृदयीं राखिते मी –
चित्र तुमचें रेखिते !

रेखिले मी ओठ तुमचे अधिर माझ्या ओष्ठरागें
कधितरीं या मंदिरीं हें स्वप्न व्हावें मूर्त जागें
तीच घटिका घोकिते मी –
चित्र तुमचें रेखिते !

पारिजातक

# शृंगाराचें बहरे नंदन

शृंगाराचें बहरे नंदन
कुठें गुंतले श्रीयदुनंदन ?

नील मण्यांचे दीप उजळले
रत्नमंचकीं निळसर कमळें
हरिकांती या सदनीं उमले
मंद सुगंधा उधळी चंदन !

सौधावरती फुलल्या वेली
कळया डोलती वरती-खालीं
वारा येउनि चोरपावलीं
हलुच तयांना देइ आलिंगन !

कळ्याफुलांनीं नटले मीही
जागजागतां आळस येई
मदनधनूसम तनु ही होई
कंचुकिचें मज रुतलें बंधन !

पारिजातक

# रानीं लिंबास आला बहार

हिरव्या साडीस पिवळी किनार ग
रानीं लिंबास आला बहार ग !

बाळवयांतल्या गौळणी
यमुनेच्या जणूं अंगणीं
बाळकृष्णाशीं करिती विहार ग !

वाळवंटीं घुमे पांवरी
रानवारा तसा सूर धरी
डुलल्या गौळणी, हललें शिवार ग !

नाच झाला ग झाला सुरू
किती आनंद डोळां भरूं
बळी राजाचं देणं उदार ग !

जशास तसें

## नांव कुंकू मात्र याचें —

नांव जगणें मात्र याचें हें, जित्याचें मरण देवा
कां करीसी खेळ असला ? तुजसी त्याचा मेळ ठावा !
आसवांनीं पुसत नाहीं लागला जो घाव भाळीं
नांव कुंकू मात्र याचें पाप ल्यावें मी कपाळीं !

सोसवेना सोसतां अन् बोलवेना बोलतां
हें मुक्याचें दुःख आतां कोण आहे जाणता ?
जतन करणें व्यर्थ आतां करपलेली ही नव्हाळी !

भंगलेलें भिंग त्याचा आरसा मी जोडिला
भोगतें जें दुःख त्याचा तिलक भाळीं लाविला
चोख सोनें डागळोनी गुंफिते मी सांखळी !
दीनवाणें हेंच गाणें भंगलेल्या राउळीं !

जशास तसें

# चिंचा आल्यात पाडाला !

चिंचा आल्यात पाडाला
हात नको लावूंस झाडाला —
माझ्या झाडाला !

माझ्या कवांच आलंय् ध्यानीं
तुझ्या तोंडाला सुटलंय् पाणी
काय बघतोस राहून आडाला ?

मी झाडाची राखणवाली
फिरविते नजर वर खालीं
फळ आंबुस येइल गोडाला !

माझ्या नजरेंत गोफणखडा
पुढं पुढं येसी मुर्दाडा
काय म्हणूं तुझ्या येडाला ?

जशास तसें

# आज इथं तर उद्यां तिथं !

रानपांखरा, दोन दिवसांची दुनियेची दौलत
आज इथं, तर उद्यां तिथं !

जेथें चारा, तेथें थारा
जिथें देणगी, तिथें नगारा
जाऊं तेथें निशाण रोवूं तें अपुलें दैवत !

मिळतां खाणें, गातां गाणें
जगायचें तर सुखांत जगणें
गांवाहुन ही बरी आपणां वाऱ्याची संगत !

वारा नेइल तिकडे जाऊं
एक सुरानें गाणीं गाऊं
मिळेल तुकडा पुरे तेवढा, त्यांत खरी रंगत !

जशास तसें

# आज पडली तुमची आमुची गांठ !

बहर उडाला —
आज पडली तुमची आमची गांठ !
अहो रावजी, फार पाहिली वाट !

आज पावतर ऐकुन होते नुसतं तुमचं नांव
एकडाव म्हटलं बघून यावा कसा काय तुमचा गांव
गांवाचं गांवकरी
सांगती कथा भारी
आमुच्या राजाचा न्यारा म्हणती थाट !

खरंच, एकदां बघुन तुम्हांला खूष मनीं मी फार
गर्व रुपाचा गळून गेला, पार चितळली गार !
मनांत आलं कांहीं
बोलाया धीर नाहीं
चांदरातिला जुळून आला घाट !

धरा उरीं वा दूर लाथडा, जडला माझा जीव
या प्रीतीच्या भिकारणीची जरा येउं द्या कींव
सांवरा तुम्ही मला
घाबरा जीव झाला
लपली माझ्या डोळ्यांपुढली वाट !

जशास तसें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 32908 ............ दि. 3/c/4
2453 ............ नों. दि. 7/2/6

## मोठं मोठं डोळं

मोठं मोठं डोळं
तुझं कोळ्याचं जाळं
माझ्या डोळ्याची मासळी त्यांत घावायची नाय् रं !

नको दावूं धाक—
मला, डोळं तुझं झांक
आल्यागेल्या भुलतिल, मी भुलायची नाय् रं !

लाडीगोडी सोड
तुझं बोलणं भारी गोड
सवालाला जबाब मी देणार नाय् रं !

असशिल मोठा नाग
तर केवड्याखालीं वाग
गुलाबाचा गेंद तुला लाभायचा नाय् रं !

शिकारीची हाव
तुला, हरिणीमागं धांव
रानांतली साळू तुला मिळायची नाय् रं !

पुरे तुझी ऐट
माझ्या बापाला भेट
लगीन झाल्याबगार मी बघायची नाय् रं !

जशास तसें

## हरि, तुझी कळली चतुराई

हरि, तुझी कळली चतुराई
हरी रे, भुलायची मी नाहीं !

गायींमागें गोप दवडुनी
लाखांमधली एक निवडुनि
आदरानीं या मला अडवुनी, दाविसी धिटाई !

गरीब भोळ्या जरी गवळणी
खोडि काढितां होउं नागिणी
बळेंच घेसी निंदा ओढुनि, काय रे तऱ्हा ही !

मी न एकटी इथें मोहना
जिवंत पुढती वाहे यमुना
धांवुन येईल माझ्या वचनां, हिरवी वनराई !

जशास तसें

## राया, मी डाव जिंकला

हुकुमाची राणी माझी
राया, मी डाव जिंकला !

लागला रंग तुम्हां, साधले डाव दोन
कैफांत गुंग होतां राहिलें नाहीं भान

बायकी कावा माझा
राखून पत्ता ठेवला !

उतारी करा आतां, चवऱ्या दुऱ्या टाका
आतांच मारला ना बदामी माझा एक्का ?

कटाप रंग सारे
हुकूम हातीं राहिला !

मधांचा डाव कसा ध्यानांत नाहीं आला
हातांत राणी माझ्या, गुलाम सर केला
तुम्ही गुलाम सर केला !

उलटली बाजी आतां
राणीनं राजा मारला !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## मिळालें मला सर्व कांहीं !

ती : काय मागुं मी, कशास मागूं कल्पतरू-पायीं ?
मिळालें मला सर्व कांहीं !

तो :— काय लाभलें, सांग प्रेमले

ती :— तुम्हीच दिधलें प्रेम आपुलें

तो :— या प्रेमाहुन थोर जगावर कांहिंच का नाहीं ?

ती :— कल्पतरूला मागुन घ्यावें आपण कांहीं, नाथा

तो :— काय सखे, मी मागूं आतां ?
स्वर्गच आला माझ्या हातां !

ती :— कुठें पण अमृत तें बाई ? —

तो :— मिळालें मला सर्व कांहीं !

ती :— कोणतें अमृत तें बाई ?

तो :— इथेंच अमृत ! –

ती :— — कळे न कांहीं

तो :— तूंच जरा मम नयनीं पाही

ती :— नाहीं !

तो :— नाहीं ? … मिळालें मला सर्व कांहीं!

ती :— कुठलें अमृत सांगा मजसी —

तो :— तूंच गडे, तें अधरीं धरिसी !
लाभत मज नाहीं ! —

ती :— — मिळाले मला सर्व कांहीं ! —

तो :— तुझ्या बंधनीं मोक्ष लाभला !
ती :— प्रीत-बंधनीं मोक्ष जिवाला !
आस दुजी नाहीं —
दोघें :— मिळालें मला सर्व कांहीं !

शिवलीला

## जीवन सरलें का?

तुमचें माझें मीलन आतां जगांत नाहीं का?
या विरहाच्या रजनीलागीं प्रभात नाहीं कां?
जीवन सरलें का?
एक तें स्वप्नच ठरलें का?

सरोवरावर तसें बसुनियां हंसणें नाहीं का?
कमलाभासें कलहंसाचें फसणें नाहीं का?
वनांतलें तें हितगुज सारें मनांत विरलें का?

चकोर उघडी चोंच, तयासी प्रकाश नाहीं का?
चंद्रा ग्रासी, त्या राहूसी विनाश नाहीं का?
दोघांचीही व्हावी पारध, दैवच फिरलें का?

लोचनांसही बंधविमोचन येथुन नाहीं का?
एकवार तें शेवटचें मज दर्शन नाहीं का?
नाम घेत मी मरुनी जावें इतुकें उरलें का?

शिवलीला

## हरवलें माझें कांहींतरीं

हरवलें माझें कांहीं तरी
काय हरवलें, कसें हरवलें, कांहिं कळेना परी !

सहज कुणाला दुरुन पाहिलें
ओठंगुन मी दूर राहिलें
स्पर्शावांचुन उगिच उमटला कांटा अंगावरी !

बघतां बघतां भुलले डोळे
त्या डोळ्यांतिल भाव निराळे
जागेपणिं मज भूल घातली बाई कोणीतरी !

लज्जा कीं ती होती भीती —
अजुनी मज तें नसे माहिती
तिथुन परतलें, परी विसरलें तेथें कांहींतरी !

बाळा जो जो रे

# दासांचाहि दास श्रीहरी

दासांचाही दास श्रीहरी
नंदाचा नंदन
घाशितो नाथां घरी चंदन !

कावडीवर कावडी
ओतिल्या आणुनिया तांतडी
विसरला भक्तसखा मीपण !

नाथांसह कीर्तनीं
आपुल्या रंगे गुणगायनीं
साथ दे चिपळ्यांची डोलुन !

भक्तां घरीं राबतो
सहज तो भक्तांना लाभतो
प्रभूला भक्तीचें बंधन !

बाळा जो जो रे

## कोण मी अन् कोण ते !

मिटुन डोळे घेतलें मी तरीहि त्यांना पाहतें
कोण मी अन् कोण ते !

गायिल्यावांचून त्यांनीं, गीत त्यांचें ऐकतें
भेटल्यावांचून त्यांना गूज माझें सांगतें !

नांव नाहीं पुशियलें मी, मीच कांहीं योजितें
तेंच ओठीं घोळतांना मी स्वतःशीं लाजतें !

भावनांचा भास का हा ? कल्पनांचीं कूजितें ?
वचन नाहीं घेतलें मी वाट तरिही पाहतें !

बोलले कांहींच ना ते, मी न कांहीं जाणतें
जोडतें जीवांस दोन्ही मुग्ध नातें कोणतें ?

बाळा जो जो रे

# कधीं रे पाहिन डोळां तुला ?

कधीं रे पाहिन डोळां तुला ?
    सोनुल्या देवाघरच्या फुला !

कस्तुरी-हरणाच्या उदरीं
हरीनें सांठविली कस्तुरी
    सुगंधें हरिणच वेडावला !

देव तूं येशिल माझ्या घरीं
तुझ्यास्तव अमृत माझ्या उरीं
    कधीं तें भरविन बाळा तुला ?

करुनिया डोळ्यांचा या दिवा
पाहते वाट तुझी राजिवा
    छंद मज एक तुझा लागला !

फुला, तूं संसारीं मंगल
फुला, तूं फुलाहुनी कोमल
    करिन या तळहाताचा झुला !

बाळा जो जो रे

# बाळा जो जो रे

बाळा जो जो रे
पापणिच्या पंखांत झोंपुं दे डोळ्यांचीं पांखरें !

झोंपीं गेल्या चिमण्या राघू
चिमण्या राजा, नकोस जागूं
हिरव्या पानावरी झोंपलीं वेलींचीं लेकरें !

पुरे खेळणें आतां बाळा
थांबव चाळा, थांबव वाळा
शब्द ऐकतें झोंपेमधुनी चावळते वारें !

मेघ पांढरे उशास घेउनि
चंद्र तारका निजल्या गगनीं
वनदेवींनीं उघडीं केलीं स्वप्नांचीं मंदिरें !

बाळा जो जो रे

## स्त्रीजन्मा ही तुझी कहाणी

स्त्रीजन्मा ही तुझी कहाणी
हृदयीं अमृत, नयनीं पाणी !

तुझिया पोटीं अवतरती नर
अन्यायच ते करिति तुझ्यावर
दशा तुझी ही केविलवाणी !

कुशींत तुझिया पुरुष धुरंधर
अबला परि तूं ठरसि जगावर
दासी म्हणुनी नमविति चरणीं !

सुंदरता तुज दिधली देवें
तुझी तुला ती परि न पेलवे
क्षणांत ठरसी तूंच पापिणी !

बाळा जो जो रे

## हळुंच कुणी आलें ग

हळुंच कुणी आलें ग काल मंदिरीं
झोंपेंतच होतें मी मंचकावरी !

वीरोचित चाल धुंद, मंदमधुर हास्य तें
श्यामल तें रूप गोड, अजुन मला भासतें
धीटपणें वदला तो, ' ऊठ उषासुंदरी !– '

पुसलें मी नांव न त्या, हंसलें तो हांसतां
फसलें अन् क्षणांत मी जवळी तो बैसतां
आणि कधीं कळलें ना सरली ग शर्वरी !

माहित ना माझें मज दीप कधीं लोपले
टेंकुन शिर छातीवर त्याच्या मी झोंपलें
तोंच उषःकाल हो, झालें मी बावरी !
झोंपेंतच अजुनी मी मंचकावरी !

पेडगांवचे शहाणे

## जाळिलेंस तूं तुझेंच घरकुल !

जाळिलेंस तूं तुझेंच घरकुल
स्वैर फिरसि तूं -- मी विरहाकुल !

ज्या हृदयीं तुज दिला आसरा
जाळिलेंस तें कसें पांखरा ?
निराधार मी झुरतें व्याकुल !

दोन जिवांचें इवलें घरटें
त्यांत चिमुकलें गूज चोरटें
विसरलास का बंधन कोमल ?

गूज हृदयिंचें घेउन पोटीं
मरेन तर मी तुझ्याचसाठीं
सुखी असो तव जीवन चंचल !

पेडगांवचे शहाणे

## शांत मला झोंपुं दे !

नाथा, शांत मला झोंपुं दे !
झालें गेलें त्याचा आठव झोंपेंतच लोपुं दे !

थकलें पाउल, थकले पैंजण
पुरे पुरे मज झालें नर्तन !
निळी जांभळी झोप राजसा, लोचन हे व्यापुं दे !

नको थांबवूं सूर परंतू
तंतुवाद्य तें छेड तुझें तूं
तुझ्या गळ्यांतिल प्रीती आतां अंगाई गाउं दे !

पेडगांवचे शहाणे

# फुलली रे रातराणी

फुलली रे रातराणी प्रीतीच्या अंगणीं !

दरवळतो मत्त गंध
दोन्हीही देह धुंद
नील नभीं मोहरली निळसर ही चांदणी !

लेवुनिया लाल साज
गालिं उभी धीट लाज
आज तुला न्याहळतां लवते ना पापणी !

चांदण्यास ये सुवास
त्यांत तुझे ऊन श्वास
नीज नसे, जाग नव्हे, भान नुरे मीलनीं !

स्त्रीजन्मा ही तुझी कहाणी

## सांजवात उजळली

सांजवात उजळली !
सखे, मी सांजवात उजळली !
काजळी हळू हळू निवळली –
सखे, मी सांजवात उजळली !

उजेड पडला देव्हाऱ्यावर
दिसली मूर्ती सुरेख सुंदर
मुक्या कळ्यांची ओंजळ मी त्या मूर्तीवर उधळली !

तिन्ही सांजची सरली हुरहुर
सुखदुःखांचा जळला कापुर
उरला निर्मळ सुगंध केवळ प्रीत त्यांत मिसळली !

प्रतापगड

# शेवया वळतांना

शेवया वळतांना
सोजी भिजवा मऊमऊ
लेकीचा ग माझ्या कंथ
उंच कुळींचा बाजीराऊ !

शेवया वळतांना
हाताला तूप लावा
लेकीचा ग माझ्या कंथ
मेणा धाडून बोलवा !

दसरा दूर गेला,
दिवाळी आज आली
कंथाच्या वाटेवरी
रांगोळी लेक घाली

वर्साचा दीस नवा
पणत्या लेक लावी
अंधारीं येतो कंथ
उजेड त्याला दावी !

माझ्या घरांत पाहुणा
शेजीबाई बघ जरा
लेक जांवयाची जोडी
जाई शेजारीं मोगरा !

प्रतापगड

## पांखरा, तुफान सुटला वारा

सरली प्रीती, सरलीं नातीं, खेळच सरला सारा
पांखरा, तुफान सुटला वारा !

मुळापासुनी झाड उखडलें
मोडुनि घरटें पार चिरडलें
भयाण गर्जत उठलें वादळ, कुठला रे थारा ?

आतां कुठल्या होतिल भेटी ?
गांठी जुळल्या तुटण्यासाठीं
असशिल तेथें सोस साजणा, दैवाचा मारा !

असो पिंजरा माझ्या दैवीं
नवी तुला तरि वाट दिसावी
येइ पाहुणा होउनि प्याया डोळ्यांतिल धारा !

प्रतापगड

# पावसांत चांदणें पडलें

सई, नवल कांहींसें घडलें
पावसांत चांदणें पडलें !

गूज मनींचें मनांत
कसें सांगू मी जनांत
नाहीं नाहीं ग !

ओल लाजतें कळ्यांत
पाणी हांसतें डोळ्यांत
सखे बाई ग !

कांट्यांत भिऊन जी अडलें
ती फुलांत अलगद अडलें !

सुख मावेना डोळ्यांत
गीत झालें तें गळ्यांत
सखे बाई ग !

नाहीं राहिलें पोटांत
तें कां थांबेल ओठांत ?
नाहीं नाहीं ग !

जे तुटले म्हणून मी कुढलें
आज फिरुनि बंध ते जडले !

प्रतापगड

# सांग, तूं माझा होशील का ?

सांग, तूं माझा होशिल का ?

वसंतकालीं वनीं दिनान्तीं
एकच पुशितें तुज एकांतीं
एकांतीं कर कोमल माझा हातीं घेशिल का ?

नसेल माहित तुला कधीं तें
रोज तुझ्या मी स्वप्नीं येतें
त्या स्वप्नांच्या आठवणी या ओठां देशिल का ?

दूर तूं तरी जवळ तुझ्या मी
नांव गुंतवित तुझिया नामीं
मी येतां पण सलज्ज जवळीं, जवळीं घेशिल का ?

लाखाची गोष्ट

## त्या तिथें, पलिकडे, तिकडे

त्या तिथें, पलिकडे, तिकडे –
माझिया प्रियेचें झोंपडें !

गवत उंच दाट दाट
वळत जाय पायवाट
वळणावर अंब्याचें –
झाड एक वाकडें !

कौलावर गार वेल
वाऱ्यावर हळुं डुलेल
गुलमोहर डोलतां –
स्वागत तें केवढें !

तिथेंच वृत्ति गुंगल्या
चांदराति रंगल्या
कल्पनेंत स्वर्ग जो –
तिथें मनास सांपडे !

लाखाची गोष्ट

...ची ... , ... स्वळ्य.
प्रु.क्र. ३२७८ ... दि: ३।८१
प्रत ९५५३ ... दि. ...

# डोळ्यांत वाच माझ्या

तो :– डोळ्यांत वाच माझ्या तूं गीत भावनांचें
सादाविना कळावें संगीत लोचनांचें !

ती :– मी वाचलें मनीं तें फुलली मनांत आशा
सांगावया तुला तें नाहीं जगांत भाषा !
हितगूज प्रेमिकांचें हें बोलक्या मुक्यांचें
डोळ्यांत वाच माझ्या तूं गीत भावनांचें !

तो :– हास्याविना फुटेना ओठांत शब्द कांहीं
कळलें तुला सखे, तें कळलें तसें मलाही
दोघांस गुंतविती मउ बंध रेशमाचे
डोळ्यांत वाच माझ्या तूं गीत भावनांचें !

ती :– पद्मासमान जन्मे हें काव्य जीवनीं या
या जीवनांत काव्यें, काव्यांत जीवनें या !
गंधांत धुंद वारा वाऱ्यांत गंध नाचे
डोळ्यांत वाच माझ्या तूं गीत भावनांचें !

लाखाची गोष्ट

## सांग रे राजा

पहिलें भांडण केलें कोणी ?
सांग रे राजा, कशि रुसून गेली राणी ?

अडखळला का पाय जरा ?
वळतां गळला का गजरा ?
लटका होता राग मुखावर, डोळ्यांत लटकें पाणी ?

मान वेळतां खेळ कळे
दंवांत फुलले दोन कळे
थरथरणारे ओठ जहाले क्षणांत हंसल्यावाणी ?

कलह प्रीतिचा गोडीचा
विलास जमल्या जोडीचा
विरह नकोसा, तरीही सुंदर, जीव गुंततां दोन्ही !

लाखाची गोष्ट

# लाज वाटे आज बाई

लाड वाटे आज बाई वाटतो आल्हादही
व्हावयाची भेट त्यांची व्हायचा संवादही

जवळ येते ती घडी अन् दूर जातो धीर का ?
भरुनि येती उगिच डोळे, कंप देहीं सारखा
भास होतो पावलांचा, कानिं येतो सादही !

दोन भुंवया या कमानी, पापण्यांचीं तोरणें
प्रियकराच्या स्वागतासी सिद्ध झालीं लोचनें
जीव थांबे लोचनीं त्या, ना तनूची दादही !

लाखाची गोष्ट

# ऐकशील का रे माझें

ऐकशील का रे माझें अर्थहीन गीत ?
दूर दूर जातें धरुनी उरीं तुझी प्रीत !

वाट तुझी बघतां दारीं पाय थकुन गेले
निमंत्रणावांचुन जवळीं मरण मात्र आलें
फेंकलेंस चरणावरचें फूल तूं धुळींत !

भाग्य हेंच अजुनी येतो गंध पाकळीस
स्पर्श तुझा आला होता चुकुन या कळीस
उमलतांच सुकलें तरिही आयु हें पुनीत !

सूर आर्त गीताचा या तुझ्या घरीं यावा
अश्रुबिंदु एकच नयनीं तुझ्या ओघळावा
हेतु एक शेवटचा या थरथरे मनांत !

लाखाची गोष्ट

# चिमण्या पांखरांचें

चिमण्या पांखराचें चिमणें घरकुल
चिमणे पंख मऊ, चिमणी किलबिल !

कालच्या वादळाची नाहीं ग आठवण
उद्यांची नाहीं चिंता नाहीं ग सांठवण
हालत्या फांदीवरी डोलती वंशवेल !

आभाळ वर निळें, विशाल खालीं जग
झाडांच्या मनोऱ्यांत चिमणे लोभ-राग
प्रहार करूं जातां वाराही थरारेल !

पांखर आभाळाची, आधार धरणीचा
देखावा मनोहर देवाच्या करणीचा
वेगानें धांवतांना काळ उडुनि जाईल !

चिमणीं पांखरं

## सुख पाहतां जवापाडें

सुख पाहतां जवापाडें
 दुःख पर्वताएवढें !

पदोपदीं अनुभव
 संतवाणीचा प्रभाव
ऐकूं येती मागें पुढें
 बोल तुकयाचे चोखडे !

दिस राबतां मावळे
 रात्रीं चिंता माथीं जळे
पोट वितीच्या एवढें
 त्याचें जन्माशीं सांकडें !

घाण्यासंगें घरी फेरा
 प्राणी जुंपला संसारा
फिरतांना आडे पडे
 दोन्ही डोळ्यांशीं झांपडें !

चिमणीं पांखरं

## हातीं नाहीं बळ

हातीं नाहीं बळ,	दारीं नाहीं आड
त्यानें फुलझाड	लावूं नये !

घालवेना चारा,	होई न जतन
त्यानें तों गोधन	पाळों नये !

सोसतां सोसेना	संसाराचा ताप
त्यानें मायबाप	होऊं नये !

नामसंकीर्तना	गवसेना वेळ
त्यानें गळां माळ	घालों नये !

चिमणी पांखरं

## थंडीची झोंप मला लागेना

माघाची रात
चांदणं त्यांत
कुशी बदलून कांहीं भागेना
थंडीची झोंप मला लागेना !

डावा डोळा
लवतो खुळा
नशीब बाई कांहीं जागेना !

सखा लढाईला गेला,
गेला तो अजुन नाहीं आला
घरीं तरणी नार लागली झुरणीला...

तपास केला
वाया गेला
कुणीच कांहीं मला सांगेना !

दिवसभर मी तळमळतें
रात्री समयीसंगं जळतें
बायकांचं दुःख बायकांना कळतं !

फुरफुर करी
समई परी
घोड्याची टांप कांहीं वाजेना !

आतां झाली ग पहांट
किती न्याहाळूं मी वाट ?
आली जांभई, बाई, माझी अवघडली पाठ !

पुनः सुरू तो रहाट
माझे डोळे, त्याची वाट !
नीज नाहीं सूज आली माझ्या डोळ्यांना दाट!

उचकी येते
सई होते
शकुनाचं फळ मला लाभेना !

नरवीर तानाजी

## मी वाजवीन मुरली

मी वाजवीन मुरली वृक्षीं बसून एका
होऊनिया मुकी तूं वाळूंत काढ रेखा !

कालिंदिचा किनारा, तें शांत संथ पाणी
राधामुकुंद दोघे, दुसरें न तेथ कोणी
माया तुझी नि माझी सांगूं नकोस लोकां !

लोकांस काय ठावे संबंध हे युगांचे
हें वेगळेंच नातें प्रेमांतल्या जगाचें
दिसतो जरी न वारा, झुलती कदंबशाखा !

मायेंत याच दोघे ये मायलेक होऊं
प्रीतींत याच राधे, होऊं बहीणभाऊ
प्रेमास बंध नाहीं, हीं बंधनें तरी का ?

अबोली

# रिमझिम करि बरसात

रिमझिम करि बरसात, मेघा!

गात मल्हारगान
विसरूनिया देहभान
अनवाणी फिरतों मी प्रियसखीच्या शोधांत!

परिसुनि हे सूर वनीं
जल झरतां मृगनयनीं
ओलेती येईल ती मोहुनिया नादांत!

धारांच्या मंडपांत
मीलन मग पावसांत
सम धरुनी वीज वरी कडकडुं दे गगनांत!

अबोली

## रुमझुमती पैंजण ते

रुमझुमती पैंजण ते पायिं चालतां
चमचमती नीलमणी कानिं डोलतां !

वेणींतुन गळतिं फुलें कुंदमालती
सादाविण 'कृष्ण कृष्ण' ओठ बोलती
कुजबुजती खिडक्यांतुन तरुण गोपिका
भेटाया श्रीहरिला जाय राधिका !

वाऱ्यावर पदर उडे, भान कोठलें
मुरलीचे सूर वनीं तोंच दाटले
हृदयाच्या नयनें ती पाहि मोहना
मोरासम देह करी धुंद नर्तना !
वृक्षांना कथिति गूज हंसुन मल्लिका
भेटाया श्रीहरिला जाय राधिका !

अंधारीं धारांतुन चिंब भिजे सुंदरी
दुरुन तरी कृष्ण सखा वांजवितो पांवरी
नाचुनिया देह थके भूमितळीं कोंसळे
मिटलेल्या नयनीं हरिरूप उभें सांवळें
मुरलीचा साद कथी बावरुनी वादकां
भेटाया श्रीहरिला जाय राधिका !

अबोली

# रंगांत मिसळले रंग नवे

रंगांत मिसळले रंग नवे
साधलें चित्र जें मला हवें !

चंद्रलोकिंच्या शीतल धामीं
ते आणिक मी, ते आणिक मी
भंवतिं ग्रहांचे फिरति थवे !

त्यांची वीणा, माझे पैंजण
गीत तयांचें, माझें नर्तन
युगायुगांचे मिळति दुवे !

तेजरूप मी, तेजरूप ते
तेजामाजीं तेज मिसळतें
दिसति जगा जरि दोन दिवे !

अबोली

# आभाळाच्या हत्ती, आतां पाऊस पाड

आसुसली माती
पिकवाया मोती
आभाळाच्या हत्ती, आतां पाऊस पाड गा
पाऊस पाड !

पुरुष :— मेघांच्या राजाला जाऊन सांग
ढगांनीं काजळुं दे डोंगरांची रांग
डोंगरांच्या तळीं
करपली काळी
हरळीची मुळी पुन्हां घेऊं दे वाढ गा !

स्त्रिया :— चारा नाहीं गाउल्यांना, दूध नाहीं वासरां !
धाराविना पेरा नाहीं, कोण आम्हां आसरा ?
नदी-नाला आटे
काळजांत तुटे
वृंदावनीं वठे दारीं तुळशीचं झाड गं !

पुरुष :— धरणीच्या पोटांत सांठूं दे ओल
रुजू दे बियाणं खतांत खोल
आल्यावर उन्हं
निवतील मनं
कुबेराचं धन मग मोत्याला मोड गा !

कुबेराचें धन

## कधींतरी मी आलें होतें

कधींतरी मी आलें होतें
बसलें होतें या इथें —
या इथें कीं त्या तिथें ?

बन केळींचें आंत गारवा
दूर कुठेंसा घुमे पारवा
असेंच ऐकत बसलों केव्हां
तसे दूर — पण जरा बिलगते —
तुम्ही इथें अन् मी इथें !

सकाळ हंसरी, उन्हें कोवळीं
एकांताची फुलत पाकळी
अशा सुगंधित सुचल्या ओळी
मी गाणारी, तुम्ही ऐकते —
तुम्ही इथें अन् मी इथें !

तुमचें माझें नवेंच नातें
कुणी पाहिलें कुणास नव्हतें
असें कसें मग मला भासतें ?
पाहिलेंच मी पुन्हां पाहतें —
तुम्ही इथें अन् मी इथें !

कुबेराचें धन

# चाल बैला, चाल

चाल बैला, चाल !
गीत गातीं रानपांखरें घुंगुर देती ताल !

पहांट फुटतां औतें जुपलीं
सकाळ आली आणिक गेली
बघतां बघतां दुपार निवली
गार वारा मावळतीचा सुचवी संध्याकाळ !

घटका येती, घटका जाती
तुला मला तें काय माहिती
राबे त्याला लाभे शेती !
घाम गाळुनी सुगी साधतां सुरू आपलें साल !

नंदी तूं तर दूत शिवाचा !
खांदां घेशी भार भवाचा
वंश थोर रे जगांत तुमचा
गीता गातां कृष्ण स्वतःला म्हणुन म्हणे गोपाळ

कुबेराचें धन

## सजणी, टाक बियाणं टाक !

तो :— तांबुस गोरा, हात साजिरा मुठींत मोती लाख
सजणी, टाक बियाणं टाक !

ती :— बंड्या बैलाला हो हो हो हो
माझ्या बैलाला हो ऽ ऽ ऽ—

समूह :— बंड्या बैलाला हो हो हो हो
माझ्या बैलाला हो ऽ ऽ ऽ—

ती :— एका सकाळीं, फूट कोवळी
काळ्यांत हिरवी झांक !

तो :— नाजुक लवलव, तशीच वाढव

ती :— खुरपून हरळी पाक !

तो :— हिरव्या रानीं, मंजुळ गाणीं गात पांखरें राख !
सजणी, टाक बियाणं टाक !

ती :— पांखराची राखण, नजरेची गोफण

तो :—   घरच्या चोराला धाक!
पिकलेल्या मळ्यांत, रास मोज खळ्यांत
ओव्यांत पुण्याई टाक!

ती :—   चांदण्यांत बसून

तो :—   माझ्यासंगं हंसून कष्टाची गोडी चाख!
सजणी, टाक बियाणं टाक!

कुबेराचें धन

## नाच रे मोरा

नाच रे मोरा, अंब्याच्या बनांत
नाच रे मोरा नाच !

ढगाशीं वारा झुंजला रे
काळा काळा कापुस पिंजला रे
आतां तुझी पाळी
वीज देते टाळी
फुलव पिसारा नाच !

झरझर धार झरली रे
झाडांचीं भिजलीं इरलीं रे
पावसांत न्हाऊं
कांहींतरी गाऊं
करून पुकारा नाच !

थेंबथेंब तळ्यांत नाचती रे
टपटप पानांत वाजती रे
पावसाच्या रेघांत
खेळ खेळुं दोघांत
निळ्या सौंगड्या नाच !

पावसाची रिमझिम थांवली रे
तुझी माझी जोडी जमली रे
आभाळांत छान छान
सात रंगी कमान
कमानीखालीं त्या नाच !

देवबाप्पा

## मथुरेंत मी, गोकुळिं कान्हा

आवरिलें मी नयनीं आंसूं
    कसा आंवरूं उरिंचा पान्हा ?
    मथुरेंत मी, गोकुळिं कान्हा !

कुठें तान्हुलें, कुठें माउली
कुठें वासरूं, कुठें गाउली
त्यांत शृंखला अशा पाउलीं
    कशीं जाउं मी, पाहूं तान्हा ?

बसल्या ठायीं बसुन पाहते
चंद्रबिंब हळु हळूं वाढतें
असेल झालें बाळ रांगतें
    म्हणेल आई तेथें कोणा ?

स्वर्गाहुनिया ज्याची थोरी
तें सांगाया जगांत चोरी
जाणशील का बाळा, तूं तरि ?—
    तुझ्याचसाठीं याहि यातना !

देवबाप्पा

## देवाचें घर बाई, उंचावरी

इवल्या इवल्याशा
टिकल्या टिकल्यांचें
देवाचें घर बाई, उंचावरी
ऐक मजा तर ऐक खरी !

निळी निळी वाट
निळे निळे घाट
निळ्या निळ्या पाण्याचे झुळुझुळु पाट
निळ्या निळ्या डोंगरांत निळी निळी दरी !

चांदीच्या झाडांना सोन्याचीं पानें
सोनेरी मैनेचें सोनेरी गाणें
सोन्याची केळीं, सोन्याचा पेरू
सोनेरी अंब्याला सोन्याची कैरी !

देवाच्या घरांत गुलाबाची लादी
मऊ मऊ ढगांची अंथरली गादी
चांदण्याची हंडी
चांदण्याचीं भांडीं
चांदोबाचा दिवा मोठा लावला वरी !

देवबाप्पा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 32728 वि: ५१०५
क्रमांक १५५३ नों दि २/५/५५

## मला न असूया

कुणिही गावा, कुणी पुजावा, देवच तूं देवा !
मला न असुया, मला न हेवा !

रूपगर्विता अतुल सुंदरी
कुणी नाचतिल तुझ्या मंदिरीं
एकतारिवर एक प्रीतिचा अभंग मी गावा !

धनिक नायिका कोणी येतील
हिरे माणकें तुला वाहतिल
गंधहीन या कोरांटीला नयनस्पर्श व्हावा !

रथ सोन्याचा, दोर रेशमी
तुला मिरवतां विजयलक्ष्मी
रथचक्राच्या तळीं मृत्युचा मान मला द्यावा !

देवबाप्पा

## देवाचें घर बाई, उंचावरी

इवल्या इवल्याशा
टिकल्या टिकल्यांचें
देवाचें घर बाई, उंचावरी
ऐक मजा तर ऐक खरी !

निळी निळी वाट
निळे निळे घाट
निळ्या निळ्या पाण्याचे झुळुझुळु पाट
निळ्या निळ्या डोंगरांत निळी निळी दरी !

चांदीच्या झाडांना सोन्याचीं पानें
सोनेरी मैनेचें सोनेरी गाणें
सोन्याची केळीं, सोन्याचा पेरू
सोनेरी अंब्याला सोन्याची कैरी !

देवाच्या घरांत गुलाबाची लादी
मऊ मऊ ढगांची अंथरली गादी
चांदण्याची हंडी
चांदण्याचीं भांडीं
चांदोबाचा दिवा मोठा लावला वरी !

देवबाप्पा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र.
अनुक्रम .......... दि: ..........
क्रमांक .......... नों दि. ..........

## मला न असूया

कुणिही गावा, कुणी पुजावा, देवच तूं देवा !
मला न असुया, मला न हेवा !

रूपगर्विता अतुल सुंदरी
कुणी नाचतिल तुझ्या मंदिरीं
एकतारिवर एक प्रीतिचा अभंग मी गावा !

धनिक नायिका कोणी येतील
हिरे माणकें तुला वाहतिल
गंधहीन या कोरांटीला नयनस्पर्श व्हावा !

रथ सोन्याचा, दोर रेशमी
तुला मिरवतां विजयलक्ष्मी
रथचक्राच्या तळीं मृत्युचा मान मला द्यावा !

देवबाप्पा

# बाइ हा आनंद ठेवूं कुठें ?

बाइ हा आनंद ठेवूं कुठें ?
ओठीं, पोटीं कसा रहावा ? अभाळ याला थिटें !

डोलत होतें वातावरणीं
मी झाडाची कळी होउनी
त्या झाडाला कल्पतरूची आज पालवी फुटे !

खळखळ खेळत होतें जीवनिं
मी गिरिची गिरिबाला होउनि
गिरी कशाचा ? हिमालयाचें स्वरूप तें गोमटें !

लेक थोर मी कुलवंताची
धन्य संतती मी संताची
बघतां बघतां विशाल झालें, विश्व उरे धाकुटें !

महात्मा

# अबोली बोलुं लागली प्रीत

सहजच सुचलें गीत
अबोली बोलुं लागली प्रीत !

स्वर हे लज्जित, किंचित् कंपित
चंचल कधिं तर कधीं विलंबित
स्वर-शब्दांच्या अतीत असल्या गीतांचे संगीत !

अबोध नवथर मनांत हुरहुर
मधुर मधुरतर तरिही कातर
अंतरांतलें अधरीं येतें, हेतु उगा लपवीत !

कळ्यांत परिमल, झऱ्यांत झुळझुळ
गळ्यांत कांहीं तसेंच अवखळ
एक वायुची लहर चालली भावकळ्या फुलवीत !

अंमलदार

# वाट मज ती आवडे

ओळखीची तरिहि नवखी आज दिसते कां गढे ?
वाट मज ती आवडे !

तींच घरटीं, झोपड्या त्या, तीच माती तांबडी
तींच कौलारें उतरतीं, तींच वळणें वाकडीं
लिंब-बोराळ्यांपुढें या काय चांफे-केवडे ?

आम्रशाखा, तीस झोंका, पांखरांचीं बोलणीं
पावलांची रांग पोंचे थेट माझ्या अंगणीं
लांबलेल्या सांवल्यांना आज कां शोभा चढे ?

बाभळीला बहर पिवळा, वरून बोले कावळा
आज कानां लागतो कां साद त्याचा वेगळा ?
लाल चाकोऱ्या कशाला वळति या माझ्याकडे ?

अंमलदार

# दूर कुठें राउळांत

दूर कुठें राउळांत दरवळतो पूरिया !
सांजसमयीं दुखवितात अंतरास सूर या !

असह्य एकलेपणा, आस आंसवीं मिळे
काय अंतरांत तें अजुन ना कुणा कळे
झांकळून जाय गांव, ये तमास पूर या !

दूर वास रे तुझा, ध्यास लागला मनीं
दृष्टिभेटही नसे, काय सांगणें जनीं
एकवार तूंच ये सखीस धीर द्यावया !

सलत सूर सनईचा वारियांत कांपरा
सुकून पाकळी मिटे, मुग्ध भाव लाजरा
फुलांत गंध कोंदला, वाट ना उरे तया !

अंमलदार

## नको नको ग लाजूं सीते

नको नको ग लाजूं सीते !
सभेंत बघ या कोण आलें तें —
आले मेघश्याम !

रात्रंदिन केलें ज्यांचें तूं चिंतन
आले ग आले ते दशरथनंदन !
पापणी आतां कां तुझी लवते ?

चालणें पहा तें — हादरे धरा
उंचवी भुंवई जानकी जरा
डोळ्यांत बघ त्या वीज खेळते !

शिवाचें धनुष्य दाविती तात
सखे ग लाविला रामांनीं हात
उचलुनी जोडिली दोरी तयातें !

ओढिली प्रत्यंचा, मोडिलें धनू
बाई, या शौर्याला काय मी म्हणूं ?
तेजाचा झळाळ, दृश्य कुठें तें !

उभे ग, समोरी विजयी वीर
घाल जा माळ ग धरून धीर
कळेना मला मी काय सांगतें !

अंमलदार

# फुलांपरी वेंचिन

फुलांपरी वेंचिन
प्रीतिचे रम्य आपुल्या क्षण !

भेट चोरटी, भाव लाजरे
ओंठ कांपरे, डोळे हंसरे
पुसट प्रश्न ते, तुटक उत्तरें
काव्यसम भाषण !

एकांतांतिल रात चांदणी
भावमधुर तीं मंजुळ गाणीं
उरल्या नजरा, सरली वाणी
स्पर्शाविण मीलन !

सहवासांतिल अपुल्या कूजित
भावि सुखाचीं स्वप्नें रंगित
अर्धोन्मीलित फुलें सुगंधित –
स्मृतींत मी गुंफिन !

सौभाग्य

## काय करूं मी ?

काय करूं मी ? कसें करूं ?
कुठें दिसेना प्रीत-पांखरूं !

मूठ झांकिली केवीं उघडूं ?
गूज गोपिलें कसें उलगडूं ?
हांक मारल्यावांचुन आतां –
अशी मुक्यानें किती झुरूं ?

ऐलथडीं मी, पैलथडीं तूं
मधें धुक्याला पूर परंतू
पंख गळाले तरी उडे मन
कशी धरूं त्या कशी सांवरूं ?

पंखबळानें ये तूं जवळीं
अलगद उचली तनू कोवळी
जगापासुनी दूर जाउं चल
दूरच घरकुल नवें करूं

सौभाग्य

# राहिलें दूर घर माझें

घट भरलेलें माथ्यावरती, सोसेना ओझें
राहिलें दूर घर माझें !

लांब लांब हा पथ एकाकी
भिउन दिवसहि डोळे झांकी
दिसे न सोबत, पथिक गुराखी
किर्र जंगलामधुनी वारा घोंगावत वाजे !

वाट चांदणी, तम झांकळलें
मुसळधार जळ, वादळ सुटलें
गांव दिसेना, घरकुल कुठलें ?
क्लांत भयाकुल थकलें खिळलें पाउल हें माझें !

सौभाग्य

## लंगडा ग बाई

लंगडा ग बाई, लंगडा
नंदाचा कान्हा लंगडा !

रंगानें काळा,
वाणीनें बोबडा
त्या काळ्याचा लळा
राधिके, काय तुला एवढा ?

बालकृष्ण हा दिसे लंगडा
परी मला ज्ञात
तिन्ही जगाला घाली वळसा
तीन पावलांत
वेद जयाचीं वचनें गातीं –
तो कैसा बोबडा ?

काळा म्हणतां घननीळाला
का हो गोपीजन ?
सूर्यचंद्रही वंचित फिरती
त्याचे तेजःकण !
चैतन्याची अतर्क्य माया
काय कळावी जडा ?

सौभाग्य

# आल्या वसंतगौरी

आल्या वसंत-गौरी सांगे फुलास वारा
वाऱ्यास गंध येतो – म्हणती ढगास तारा !

जाई जुईंत नाचे मृदु पांढरा फुलोरा
गुलमोहरांत झुलतो कां तांबडा मनोरा ?
डोळ्यांत सुंदरीच्या रसराज घे निवारा !

सौभाग्यपूजनाची आली सुवेळ बाई
अर्पी सुवासिनींना फलभार आंबराई
ओव्या भरा सुखानें – करि कोकिळा पुकारा !

नाथास सौख्य द्याया घे कालिकाव्रतासी
गौरांग होउनी ती प्रिय होय शंकरासी
पूजा शिवप्रियेची आणील भाग्य दारा !

सौभाग्य

# लंगडा ग बाई

लंगडा ग बाई, लंगडा
नंदाचा कान्हा लंगडा !

रंगानें काळा,
वाणीनें बोबडा
त्या काळ्याचा लळा
राधिके, काय तुला एवढा ?

बालकृष्ण हा दिसे लंगडा
परी मला ज्ञात
तिन्ही जगाला चाली वळसा
तीन पावलांत
वेद जयाचीं वचनें गातीं –
तो कैसा बोबडा ?

काळा म्हणतां घननीळाला
का हो गोपीजन ?
सूर्यचंद्रही वेंचित फिरती
त्याचे तेजःकण !
चैतन्याची अतर्क्य माया
काय कळावी जडा ?

सौभाग्य

## आल्या वसंतगौरी

आल्या वसंत-गौरी सांगे फुलास वारा
वाऱ्यास गंध येतो — म्हणती ढगास तारा !

जाई जुईंत नाचे मृदु पांढरा फुलोरा
गुलमोहरांत झुलतो कां तांबडा मनोरा ?
डोळ्यांत सुंदरीच्या रसराज घे निवारा !

सौभाग्यपूजनाची आली सुवेळ बाई
अर्पी सुवासिनींना फलभार आंबराई
ओव्या भरा सुखानें — करि कोकिळा पुकारा !

नाथास सौख्य द्याया घे कालिकाव्रतासी
गौरांग होउनी ती प्रिय होय शंकरासी
पूजा शिवप्रियेची आणील भाग्य दारा !

सौभाग्य

## ओळखिलें मी तुला

नाथा, ओळखिलें मी तुला
कुरुप सांवळ्या मूर्तीमधला देवपणा जाणिला !

सौधावरतीं पडे चांदणें
अर्ध्या मिटल्या माझ्या नयनें
टिपले क्षण ते अधिरपणानें
सतार अंकीं वेउनिया तूं अनुरागचि छेडिला !

कला करीं तव, उदारता मनिं
भीती रमली अंतीं पूजनीं
तव सहवासीं मधु दिनरजनी
काल सुगंधित, देह सुगंधित, सुगंध उरिं दाटला !

तुझ्यासारखा नाथ असावा
तुझ्या छातिवर घेत विसांवा
उरलासुरला राग हंसावा
ठसा मूर्तिचा तुझ्या सानसा पोटीं मी गोपिला !

सौभाग्य

## कळीचें होउं लागलें फूल

मधुलहरींसह मधुमासाची आली ग चाहूल
कळीचें होउं लागलें फूल !

एक एक ही फुले पाकळी
कळींत तरिही, जरा मोकळी
हिरा तोच पण प्रभा वेगळी
प्रेमवेडिच्या कानामधला जसा डोलतो डूल !

वाट प्रियाची बघतां रमणी
उघडझांप करि जशी पापणी
तशी थरथरे ही फुलराणी
किंचित् हलती, किंचित् फुलती, किंचित् भयव्याकूल !

प्रियकर आला दिसे समोरी
नयनिं हास्य पण भीति अंतरीं
श्वास सोडिते मंद बावरी
तसेच सुटती परिमल, येतां कानीं तें पाऊल !

बोलविता धनी

## ही कुणी छेडिली तार ?

ती :– ही कुणी छेडिली तार
प्राजक्ताच्या मधुगंधासम कुठुनी ये केदार ?

तो :– तूंच छेड ती, तूंच ऐक ती
आत सुरावट तुझ्याच हातीं
स्पर्शावांचुन तूंच छेडिसी माझी हृदय-सतार !

ती :– जागृत मी का आहे स्वप्नीं ?
श्रवणिं पडे, पण दिसे न नयनीं
स्वप्नांतच का मजसि बोलले माझे राजकुमार ?

तो :– स्वप्नासम मज झालें जीवन
स्वप्नहि नीरस सखी, तुझ्याविण !
अर्ध्या रात्रीं शोधित आलों तुझें प्रियतमे, दार !

ती :– वेलीवर त्या नका, चढुं नका —

तो :– चढा सूर नच लवे गायका !
तूंच चढविला तारस्वर हा —
तूंच तोड ही तार !

दोघें :– ही कुणी छेडिली तार ?

गुळाचा गणपति

## इथेंच टाका तंबू !

चला जाऊं द्या काफिला
अजुनी नाहीं मार्ग संपला
इथेंच टाका तंबू !

जातां जातां जरा विसांवा
एक रात्र थांबू –
इथेंच टाका तंबू !

थोडी हिरवळ, थोडें पाणी
मस्त त्यांत ही रात चांदणी
उतरा ओझीं, विसरा थकवा
सुखास पळभर चुंबूं !

अंग शहारे जशी खंजिरी
चांदहि हलला, हलल्या खजुरी
हलल्या तारा, हलला वारा
नृत्य लागलें रंगूं !

निवल्या वाळूवरी सांवली
मदमस्तानी नाचुं लागली
लयींत डुलतीं थकलीं शरिरें
नयन लागले झिंगूं !

गुळाचा गणपति

# श्रीहरी विदुराघरिं पाहुणा !

सुवर्ण द्वारावतिचा राणा
श्रीहरी विदुराघरिं पाहुणा !

‘ मिष्टान्नें कोठुन ?
आणिला कणिकोंडा रांधुन
सांगे आवर्जुन
भावडी विदुराची सुगरण
वानी रुचकरपणा !

कवळ मुखीं नेतसे
मागुनी पुन्हा पुन्हा घेतसे
तृप्त मनीं होतसे
तृप्तिची ढेंकर वर देतसे
विसरे जलपाना !

प्रेमळपण आगळें
चाटितो उरलींसुरलीं दळें
योग्यांना ना मिळे
मूर्त तें परब्रह्म सांवळें !
काय लाडकेपणा !

गुळाचा गणपति

## जपून जा

केतकीच्या वनांत
उतरत्या उन्हांत
सळसळ पानांत–
जपून जा !
जपून गा गडे जपून जा–
कुठें निघेल नाग !

पायवाट लपेल
कांटाकुटा रुपेल
तळव्यांत खुपेल–
जपून जा !

ढग येतां दाटून
मग वाट कोठून
पाय ठेव रेटून–
जपून जा !

उसळत्या वयांत
बळ तुझ्या पायांत
चल ठेव कह्यांत
जपून जा !

फसूं नको मोहांत
जरा उभी रहात
मागेंपुढें पहात–
जपून जा !

वादळाच्या वाऱ्यांत
नको चालू तोऱ्यांत
पडशिल भोऱ्यांत–
जपून जा!

जाऊं नको गुंगत
स्वप्नांत रंगत
तुझी तुला संगत
जपून जा!

गुळाचा गणपति

## सौंगडी छोटा माझा

सौंगडी छोटा माझा चेंडू खेळतो
माझिया जिवाचा राजा नंदबाळ तो !

मोरपिसें मुकुटीं डुलतीं
केश कुरळ भाळीं रुळती
भान नाहि बाई डोईं सूर्य तापतो !

सांवळ्या मुखावर बाई
घाम किती डंवरुनि येई
वाळवंटिं कोमल त्याचा पाय पोळतो !

वाटतें ग जवळीं जावें
कडेवरी उचलुनि घ्यावें
पोर परी थोरापरि हा खेळ खेळतो !

औक्षवंत हो बाळ

## तूं रुसूं नको रे

तूं रुसूं नकोरे असा मुला
मारिलें तुला, पण जखम मला !

शेंडे खुडित मी रोपाचें
झाड बघाया उंच उद्यांचें
धनि तुझा तूंच रे फळाफुलां !

फूल दुखवितें सुई टोंचुनी
माळ गुंफितां यावी म्हणुनी
कुणि गळयांत मिरविल पुढें तुला !

घाव घालितें संगमरवरीं
मूर्त घडविण्या सुबक साजिरी
जग देव म्हणुनिया पुजिल तुला !

ओक्षवंत हो बाळ

# कधीं ऊन, तर कधीं सांवली !

अशीच दुनिया जगेल, जगली
कधीं ऊन, तर कधीं सांवली !

उजेड शीतळ कधिं चांदाचा
कधिं अंधारीं लागति ठेंचा
कठिण वेळ कधिं, कधीं चांगली !

सुख येउनि कधिं करिल चाकरी
अश्रुंत भिजली कधीं भाकरी
गाढ झोंप कधिं, कधीं काहिली !

दैवानें हा नियम पाडिला
रात्रीमागें दिवस जोडिला
दुःखामागें सुखें योजिलीं !

औक्षवंत हो बाळ

# सांग तूं माझा होशिल कां ?

सांग तूं माझा होशिल कां ?

एकदांच मी तुला पाहिलें
बघतां माझी मी न राहिलें
सहवासाचें सौख्य राजसा, मजसी देशिल कां ?

स्वप्नीं गांठुनि मला एकटी
गूज बोलसी धरुनि हनुवटी
जागेपणीं पण रविकिरणासम दारीं येशिल कां ?

एकटीच मी नाहीं आतां
हंसेन फुलुनी तुला पाहतां
फुलापरी मज अलगद उचलुनि जवळीं घेशिल कां ?

औक्षवंत हो बाळ

## गळ्यांतिल काढुं नको रे हात !

मराठी ... संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 3... दि ...
क्रमांक 9443 नों दि ...

प्रीतगांठ मी बांधियली ती सोडुं नको जन्मांत
गळ्यांतिल काढुं नको रे हात !

कठिण काष्ठ जो भ्रमर पोखरी
अलगद बसतो कमलदलावरि
स्वतःच बंदी होउनि नांदे मिटलेल्या कमळांत !

क्षणांत हांसुन, क्षणांत भांडुन
डोळ्यांतच तुज ठेविन कोंडुन
करूं न शकशिल पापणीस तूं शक्तीचा आघात !

मार्ग यशाचे तुला मोकळे
येतिल मागें माझे डोळे
हवा तेधवां धरून ठेविन माझ्या मी पाशांत !

औक्षवंत हो बाळ

# पांच प्राणांचा रे पांवा

पांच प्राणांचा रे पांवा, तुला गाईन मी गाणीं !
उतरूनिया टाकिन जीव-भाव ओवाळणी !

मऊ मांडी अंथरूण
पदराचें पांघरूण
एक साखरेचा पापा देई बोबड्या हांसुनी !

पाणी डोळ्यांचें घालिन
रोप तुझें वाढवीन
वाढवितां मेल्यें बाळा, तरी येईन फिरुनी !

जन्म अनंत घेईन
गात तुला जोजवीन
तुझ्या विळख्यांत राजा, सात स्वर्गांच्या कमानी !

ओवाळणी

# असशील कोण गे तूं ?

असशील कोण गे तूं ?
दिससी मनास माझ्या, अससी कुठें परंतू ?

ती गौर अंगकांती सोलीव कर्दळीची
डोळे नव्हेत सुमनें तीं कृष्णकमळणीचीं
सुमनांस वासनांच्या ना वास तो परंतू !

उत्फुल्ल मोगरीच्या झाल्या कळ्या मुखांत
दिसते न ऐकुं येई ही न्यूनता सुखांत
तें हास्य भासताहे, अभासिंही परंतू !

ती ओठ-पाकळ्यांची हलचाल कांपरी कां ?
जाणीव यौवनाची प्रीतीस देइ हांका
हें स्वप्न कां म्हणावें ? – ना झोंपही परंतू !

ओवाळणी

# वनवास मला आवडे !

वनवास मला आवडे !

उन्हें निवालीं, होय चांदणें !
थकवा झाला पदीं पैंजणें
मऊ लागली फुलापरी मज कंटक आणि खडे !

प्रासादाहुन रम्य झोंपडी
कंदमुळांना आली गोडी
साम्राज्याहुन हें दोघांचें राज्य सुखाचें गडे !

या राज्याचें करण्या रक्षण
सज्ज भाउजी धनुष्य घेऊन
वळुन पाहण्या धजे न संकट बळ त्यांचें एवढें !

ओवाळणी

## खेळतें हिरवळींत चांदणें

खेळतें हिरवळींत चांदणें
माझ्या कानीं उगिचच येतीं बाळाचीं पैंजणें !

संख्या मोजित ताऱ्यांची
झुळुक पळे ग वाऱ्याची
नयनीं माझ्या दिसतें अवखळ बाळाचें धांवणें !

हलतीं पानें वृक्षांचीं
कुजबुज होते पक्ष्यांची
मला वाटतें, झोंपेंतील हें बाळाचें बोलणें !

खळखळ चाले पाण्याची
छबी हांसते चंद्राची
गोजिरवाणें पाळण्यांतलें बाळाचें हंसणें !

ओवाळणी

# लागली आज सतार स्वरांत

लागली आज सतार स्वरांत!

आज स्पर्शितां अलगद पडदा
उठे हवा तो दिड्दा दिड्दा
फुलुनी येती भाव, कधीं जे रुतले खोल उरांत!

माझी असुनी माझी नव्हती
ती माझी हो, सूर संगतीं
वाहत वाहत जीव मिसळला सौख्याच्याच पुरांत!

साद लागला, साथ लाभली
नवगीतांच्या अतां मैफली
बेसुर, कणसुर कधींच दडले काळाच्या उदरांत!

ओवाळणी

## माझं गोजिरवाणं मूल

माझं गोजिरवाणं मूल, ग सइ
प्राजक्ताचं फूल !

उन्हा, नको तूं येऊं रे
हात नको या लावूं रे
तुझ्या हातची ऊब लागतां
होइल बाळ मलूल !

नकोस वाऱ्या, येऊं रे
नकोस गिरक्या घेऊं रे
थरारेल रे उठून कांटा
याचें अंग मृदूल !

पदरीं याला झांकूं दे
मला जराशी वाकूं दे
चांदण्यांत रे या डोळ्यांच्या
उमलूं दे हें फूल !

उन्हा, येइ पण हातांतुन
येई वाऱ्या, या पदरांतुन
वात्सल्याविण नकोच याला
जगताची चाहूल !

ओवाळणी

# तयाला व्यसन म्हणतात !

स्वर्ग मेल्याविना दावी, तयाला व्यसन म्हणतात !
झांकतें अंग जें उघडें, तयाला वसन म्हणतात
आवडे सारखा चाळा, तयाला छंद म्हणतात
कोंसळे अंगावरी जो, तयाला फंद म्हणतात
दूरचा मार्ग स्वर्गाचा, तयाला भजन म्हणतात
स्वर्ग मेल्याविना दावी, तयाला व्यसन म्हणतात !

व्यसन कां त्याला म्हणावें, घोड्यासवें जे धांवतें ?
लाख मरती व्यर्थ, आणी भाग्य एका गावतें
व्यसन कां त्याला म्हणावें, जें वीष जीवा पाजतें ?
मद्य प्यालेल्या जिवाला श्वान लुतरें लाजतें !
व्यसन कां त्याला म्हणावें, बंधनें जें मोडितें ?
तोडितें संसार-वेली अन् पाप माथां जोडितें
धुरांतुनि दाखवी तारा, तयाला व्यसन म्हणतात
स्वर्ग मेल्याविना दावी तयाला व्यसन म्हणतात !

तारका धुम्रांतूनी ये हांसरी अन् लाजरी
तंग ल्याली शुभ्र वेषा अन् सैल झुलती झालरी
देतसे आलिंगना ती ओठ थोडे भाजती
शरिर हलकें फूल होई अन् रुइ फुलें त्या लाजती
अंतराळीं का तरंगे जीव वेडा रंगला ?
धूम्रनलिका, ओठ, अग्नी अन् धुराचा बंगला
'धूम्रपानं महत्पुण्यं' शहाणे रसिक म्हणतात
स्वर्ग मेल्याविना दावी तयाला व्यसन म्हणतात !

इन मिन साडेतीन

# पांखराचें विश्व माझें

पांखरांचें विश्व माझें, घरहि घरटें शांतिचें
पारवा तूं घुमसि मागें, मी कबूतर प्रीतिचें!

एकमेकां सोडुनी ना एक क्षणही राहवें
राग एकाचा दुजाला एक पळ ना साहवें
एक अपुलीं दोन हृदयें, अपण हळव्या जातिचे!

अंबरी मी बागडावें मेघमाला हुंगित
आणि गेहीं तूं रहावें घुमत वेडें संगित
संगितानें त्या फुलावे पंख माझ्या कीर्तिचे!

रुसुन बसतां मी जराशी आपुल्या अन् वर्तनें
हांसवावा राग माझा, रंगवावीं नर्तनें
नाचतांना एक व्हावे रंग डुलत्या ज्योतिचे!

इन मिन साडेतीन

# बहर आला, बहर ग !

बहर आला, बहर ग !
हिरव्यावरती लाल फुलवरा, मोहरला गुलमोहर ग !

नवी पालवी, नवी टवटवी
नवींच वाटे गाणीं गावीं
रागावरती अनुरागाची उठे गुलाबी लहर ग !

कशी थांबवूं ? कशी आडवूं ?
भाव लागले गीतें गाऊं
पाय धांवती जवळ कराया तें प्रणयाचें नगर ग !

उद्यानांतिल वारा शीतल
वाटेवरती हिरवी मखमल
जाणें नव्हतें त्या वाटेवर जिवा खेंचतो पदर ग !

इन मिन साडेतीन

# राधेपरि मी रंगणार ग

राधेपरि मी रंगणार ग मुरलीच्या गाण्यांत
चांदण्यांत चांदण्यांत उद्यां रातिला चांदण्यांत !

कानावरती मंजुळ सूर
प्रीतीनें हा भरेल ऊर
सखा लाडका दिसेल दूर
वसुधेपरि मी बिंब सांठविन नयनांच्या पाण्यांत !

राधेपरि मी लेइन साज
अधरीं हांसूं, गालीं लाज
चित्र उद्यांचें दिसतें आज
आंब्याचा मी मोहर गुंफिन दोन्हीही वेण्यांत !

मुरलीरवा मी देईन ताल
तळहातीं या ठेविन गाल
दुरूनी पाहिन हरिगोपाळ
कळायचें तें कळेल त्याला माझ्या या बघण्यांत !

इन मिन साडेतीन

# खेड्यामधलें घर कौलारूं

आठवणींच्या आधीं जातें —
तिथें मनाचें निळें पांखरूं
खेड्यामधलें घर कौलारूं !

हिरवी श्यामल भंवतीं शेती
पाउलवाटा अंगणिं मिळती
लव फुलवंती, जुइ शेवंती
शेंदरि अंबा सजे मोहरूं !

चौकट तीवर बाल गणपती
चौसोपी खण स्वागत करती
झोंपाळयावर अभंग कातर
सर्वे लागती कड्या करकरूं !

माजघरांतील उजेड मिणमिण
वृद्ध कांकणें करिती किणकिण
किणकिण ती हळुं, ये कुरवाळूं
दूर देशिंचें प्रौढ लेंकरूं !

ऊनपाऊस

# या कातरवेळीं

या कातरवेळीं पाहिजेस तूं जवळी !

दिवस जाय बुडुन पार
ललित नभीं मेघ चार
पुसट त्यास जरिकिनार—
उसवि तीच सांज खुळी !

शेष तेज वलय वलय
पावे तमिं सहज विलय
कसलें तरि दाटे भय
येइ तूंच तम उजळी !

येइ, बैस, ये समीप
अधरें हे नयन टीप
दोन ज्योती एक दीप
मंद प्रभा मग पिवळी !

ऊनपाऊस

## गा एक एकतारी

गा एक एकतारी गा गीत चालण्याचें
या जीवनांत वेडे, कोणी नव्हे कुणाचें!

ही एक धर्मशाळा, सारे इथें प्रवासी
दिनरात दोन दारें येण्यास जावयासी
आले निघून गेले सम्राट लौकिकाचे !

ये एकलाच प्राणी, तो एकलाच जाई
गे भोग त्याग त्यांना तिळभाव अर्थ नाहीं
येती तसेच घ्यावे घणघाव संकटांचे

सुखदुःख दोन नांवें एकाच कल्पनेचीं
ही एक स्वप्नमाला कोमेजल्या क्षणांची
चित्रांतल्या जळांत हें चित्र तारवांचें !

ऊनपाऊस

## नाहीं गडे कुणाशीं माझें जगांत नातें

नाहीं गडे कुणाशीं माझें जगांत नातें
पाऊलवाट माझी दारीं तुझ्याच येते !
नाहीं म्हणूं नको ग, उघडी सखी कवाडा
दारीं उभा कधींचा मी एक प्रेमवेडा !

झिडकारिलें कितीदां पीडा फिरून आली
माझा गुन्हा नसे हा, फिर्याद मीच केली
कर न्यायदेवते, तूं येऊनिया निवाडा !

बंधाविना सुटेना ही खोड जन्मजात
भोगीन मी सजा ती तव दृष्टिच्या गजांत
होतां सजा हवी ती, हा संपला बखेडा !

दावी दया जराशी, मजसी कधीं न सोडी
घालून ठेव पायीं भरघोंस लग्नबेडी
आणी पुन्हां कधीं तूं उघडूं नको कवाडा !

पोस्टांतली मुलगी

# माझें मन सुरेख फुलपांखरूं!

माझें मन सुरेख फुलपांखरूं!

रंगित गहिरें, सान गोजिरें
धीट लाजरें, सदा नाचरें
उगिच संचरे, उगिच भिरभिरे
कळ्याकळ्यांतुन फुलाफुलांतुन स्वैर लागतें फिरूं !

रजनी मिटतां, पहांट फुटतां
उभ्या तरुलता झोंपुन उठतां
पुसटनिसटता सुगंध सुटतां
उषागमासह विहंगमांसह प्रभातफेरी सुरू !

क्षण चांफ्यावर, क्षण अंब्यावर
बकुल फुलांवर, कडु निंबावर
सुंदर सुगंध जे जे त्यावर
प्रीती जुळवित, मधुकण मिळवित लागतसे विहरूं !

पोस्टांतली मुलगी

## तें माझें घर

तें माझें घर
जगावेगळें असेल सुंदर !

नक्षिदार अति दार तयाचें
शिल्प तयावर बुद्धकलेचें
चक्रें, वेली, मूर्ति मनोहर !

अंगणिं कमलाकृति कारंजें
वरी अप्सरा एक विराजे
झरतिल धारा ओलेतीवर !

अकार मोठा, तरिही बैठा
आंतुन वेरूळ आणि अजंठा
वरी लालसर असेल छप्पर !

पागोड्यांचीं शिखरें वळतीं
तशीं छप्परें छपरावरती
कृष्णकमळिच्या वेली त्यांवर !

पोस्टांतली मुलगी

# माझें मन सुरेख फुलपांखरूं !

माझें मन सुरेख फुलपांखरूं !

रंगित गहिरें, सान गोजिरें
धीट लाजरें, सदा नाचरें
उगिच संचरे, उगिच भिरभिरे
कळ्याकळ्यांतुन फुलाफुलांतुन स्वैर लागतें फिरूं !

रजनी मिटतां, पहांट फुटतां
उभ्या तरूलता झोंपुन उठतां
पुसटनिसटता सुगंध सुटतां
उषागमासह विहंगमांसह प्रभातफेरी सुरू !

क्षण चांफ्यावर, क्षण अंब्यावर
बकुल फुलांवर, कडु निंबावर
सुंदर सुगंध जे जे त्यावर
प्रीती जुळवित, मधुकण मिळवित लागतसे विहरूं !

पोस्टांतली मुलगी

## तें माझें घर

तें माझें घर
जगावेगळें असेल सुंदर !

नक्षिदार अति दार तयाचें
शिल्प तयावर बुद्धकलेचें
चक्रें, वेली, मूर्ति मनोहर !

अंगणि कमलाकृति कारंजें
वरी अप्सरा एक विराजे
झरतिल धारा ओलेतीवर !

अकार मोठा, तरिही बैठा
आंतुन वेरूळ आणि अजंठा
वरी लालसर असेल छप्पर !

पागोड्यांचीं शिखरें वळतीं
तशीं छप्परें छपरावरती
कृष्णकमळिच्या वेली त्यांवर !

पोस्टांतली मुलगी

## पाण्या, तुझा रंग कसा ?

पाण्या, तुझा रंग कसा ?
ज्याला जसा हवा तसा !

चांदरातीं चंद्रापरी
काळ्या रातीं कृष्णापरी
या रे कुणी तीरीं बसा
ज्याचा त्याला दिसेल ठसा !

पाण्या, तुझा गंध कसा ?
मेळ ज्यासी घडे तसा !
फेंका तरी हार ताजा
मोगऱ्याचा वास माझा
चंदनानें चंदनसा
गंधकानें गंधकसा !

पाण्या, तुझा स्वाद कसा ?
ज्याला जसा हवा तसा !
साखरेनें गोड करा
द्राक्षरसें मधुर जरा
अमृतानें अमृतसा
विषासवें विष जसा !

येती किती, जाती किती
त्याची मला नाहीं भीती
वाहतसे नित्य असा
कुणी हंसा रे कुणी रुसा !

पोस्टांतली मुलगी

# शपथ तुला प्रेमा

शपथ तुला प्रेमा, नको त्या मंदिरांत जाऊं !

यौवनमंदिर नाम तयाचें
मायावी हें कसब मयाचें
लोभस कपटी शोभा इथली चुकुन नको पाहूं !

दिसतें तैस येथें नाहीं
आसन दिसतें तेथं खाई
अपघाती या सोपानावर पाय नको ठेवूं !

या, या म्हणती जरि युवराजे
हंसूंच करतिल तुझें नि माझें
बाळपणींच्या झोंपडींत ये जन्मभरी राहूं !

पोस्टांतली मुलगी

## वाजवि मुरली श्यामसुंदरा

वाजवि मुरली श्यामसुंदरा
तुझ्या मंदिरीं नाचे मीरा !

करिं करताळा, पायीं घुंगरू
जन्म तुडविते हा क्षणभंगुर
देह नव्हे हा मोरपिसारा !

कसलें कलियुग ? — मी द्वापारीं
गोपवधू मी, तूं कंसारी
कालिंदीचा रम्य किनारा !

गोपिनाथ तूं, मी तर गोपी
पुण्यशील तुज, जगास पापी
आलें, आलें मी अभिसारा !

मिठीत मिटलें विश्वमुकुंदा
मी आपणिलें ब्रह्मानंदा
तूं मी दोघें — अमृतधारा !

पोस्टांतली मुलगी

## सांगडी कृष्ण सुदाम्याचा

थोर हा महिमा प्रीतीचा
सांगडी कृष्ण सुदाम्याचा !

एक भूपती, एक भिकारी
दीन सुदामा, बळी श्रीहरी
आगळा स्नेह उभयतांचा !

मनिंच्या नयनें माधव पाही
सुदाम्यास सुख तिळभर नाहीं
गहिंवरे नाथ रुक्मिणीचा !

सुखशयनींही श्याम तळमळे
कंठ दाटला, गळती डोळे
आठवे काळ बाळपणिंचा!

तपांत नाहीं घडल्या भेटी
तरि न सुटल्या रेशिमगांठी
लागला ध्यास भेटण्याचा !

रेशमाच्या गांठी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 329 दि: ...
क्रमांक 75413 नों. दि. 21/5/62

## राया, उजाडलं!

इष्काच्या रंगांत
वीज भरे अंगांत
सोड माझा हात, राया उजाडलं!

सोडवेना संगत
मोडवेना रंगत
लाज करी घात, तिनं पछाडलं!

खिडकींतून दिसे दिस तांबडा तांबडा
कुकूचकू करी शेजीबाईचा कोंबडा
पहांटेच्या वाऱ्यांत
थंडी आली तोऱ्यांत
उबदार सुख तिनं लुबाडलं!

रात गेली सरून
डोळे आले भरून
उजेडानं गांव सारं चिताडलं!

नको सांगूं जनांत
गूज ठेव मनांत
परसाचं दार बघ उघडलं!

एका रात्रीची ओळख, एका रात्रीचा संसार
एका रात्रींत दिलाचा गेला झडुनी बहार
बघूं नको मागं
जग झालं जागं
तुझ्या मागं मन माझं उनाडलं !

रेशमाच्या गांठी

# बदलती नभाचे रंग कसे

बदलती नभाचे रंग कसे !
क्षणांत निळसर, क्षणांत लालसर, क्षण सोनेरी दिसे !

अशा बदलत्या नभाखालती
वसते अवनी सदा बदलती
कळी कालाची आज टपोरें फूल होउनी हंसे !

मेघ मवां जे लवले माथीं
क्षणांत झाले धार वाहती
फूल कालचें फळ होउनियां भरलें मधुर रसें !

काल वाटलें स्पर्श नच करूं
त्या कीटाचें होय पांखरूं
वेगवेगळे रंग तयाचे, इंद्रधनू उडतसे !

ये रे माझ्या मागल्या

# प्रेमांत तुझ्या मी पडलें

कळलें नाहीं केव्हां घडलें
प्रेमांत तुझ्या मी पडलें !

भेट एकदां ती ओझरती
क्षण संभाषण, ओळख नुसती
परी परततां पाउल अडलें !

कुठेंच माझें मन लागेना
तहान त्याची लव भागेना
अबोध कांहीं वेडच जडलें !

उगा वाटतें तुज भेटावें
तुझें मनोगत तुलाच ठावें
संभ्रमांत मी अर्धी बुडलें !

गंगेंत घोडं न्हालं

# एक भेट, ताटातुटी

काल गाइलेली ओवी, आज हो विराणी
एक भेट, ताटातूटी – संपली कहाणी !

कधीं नाहीं झाली राया चांदण्यांत भेट
कधीं आड आली नाहीं धुक्याची पहांट
कधीं नाहीं झाली गालीं गुलाबी निशाणी !

कधीं राग आला नाहीं लटका घडीचा
कधीं योग आला नाहीं अबोल्या अढीचा
कधीं आर्जवूनी नाहीं बोललास कानीं !

कधीं चारचौघांमाजीं निंदिता न झालें
दूर फेंकले ना तूंही सुगंधित झेले
दूर मात्र जन्माचे हे खुळे जीव दोन्ही !

निराधार झालें तारू जळीं लोटतांना
एक झोत वाऱ्याचा ये दीप पेटतांना
काय सांगूं बोलाआधीं मुकी होय वाणी !

गंगेंत घोडं न्हालं

# जगन्नाथाहुनी थोर

जगन्नाथाहुनी थोर माउलीची थोरी
जिच्या हातीं हाले बाळा, पाळण्याची दोरी !

सूर्य चंद्रमा दोन्हीं नयनीं
उषा पूर्णिमा दोघी वदनीं
तिच्या उरीं ओथंबते सुधेची शिदोरी !

बोल पहिला तीच बोलवी
हातीं धरुनी तीच चालवी
तीच गुरु बालकाचा पहिला संसारीं !

राम न झाला कौसल्येविण
कृष्ण कोण रे देवकिनंदन
बीजरूप सांभाळी ती पुरुषार्थ चारी !

गंगेत घोडं न्हालं

## हरि, थेंब घे रे —

हरि थेंब घे रे दुधाचा
चांदण्याचा रंग याचा, गोडवा रे मधाचा!

सोनियाची बाळवाटी
सोनियाची शिंप छोटी
वाटीमध्यें ओघ सांचे वात्सल्याच्या नदाचा!

फूल फुले आपसूक
उघडी रे तसें मुख
थांबुं दे ना चाळा थोडा सांवळ्या या पदांचा!

गोकुळींच्या गाउलीचा
नंदिनीच्या माउलीचा
तुझियासाठीं अमृताचा घडा भरे रे सदाचा!

गंगेंत घोडं न्हालं

## थांबला देव वाळवंटीं !

लाडक्या पुंडलिका-भेटी
थांबला देव वाळवंटीं !

मायपित्याची करितां सेवा
पुंडलिका तो कसा दिसावा ?
अर्ध्या रातीं घेत विसांवा—
जोडपें करी कानगोठी !

चुरतां चुरतां चरण आइचे
भक्त करी तो स्मरण हरीचें
कौतुक पाहत मातृप्रीतिचें—
पंढरीराव उभा पाठीं !

थकली कुजबुज जेव्हां थोडी
पांघरूं घाली सुत-पासोडी
करितां किंचित् मान वाकडी
पाहिला श्रीवर जगजेठी !

‘ देवा, येथुन उठूं कसा रे ?
जागीं होतिल मातापितरें ’
शब्दांविण हें सांगुन सारें
फेंकली वीट हरीसाठीं !

गंगेंत घोडं न्हालं

## तुम्ही माझे, माझे हो रंगलाल

उठउठुनी रातींची रडतें
तळमळत पलंगीं पडतें
माझ्या संगतीं जळती समया
मी जागी–निजतां दुनिया !
कुठें असाल, कधीं याल, जवळीं घ्याल ?
तुम्ही माझे, माझे हो रंगलाल !

चैत्र-वैशाख नाहीं कळला
माझा दिमाख फुलुनी जळला
आखाडांत बरसले ढग
उलघाल माझी तगमग !
किती कराल, माझे हाल, सुकलं गाल !

भादव्यांत आल्या हो गौरी
मी निराश तुमची नवरी
दसरा दिवाळी आली गेली
कां हो पातळ माया केली ?
झाली कमाल, गेलें साल, कधीं याल ?

मार्गेसर मार्गी लागला
थंडीचा कडाका पडला
भर पुसांत मी एकली !
उसळते आस झांकली !
कधिं दिसाल, कधिं याल, विडा घ्याल ?

मी तुळस तुझ्या अंगणीं

# मज पाहुं पाहुं वाटतो

अनया गवळ्याची मी राधिका
आम्हीं साध्याभोळ्या गवळ्यांच्या वायका
जलभरणा गेलों होतों यमुनातटाका
ऐकिली हरीची मुरली
कानीं ती भरली
तहानभूक हरली
लाज मज नुरली —
झालें निःसंग !
मज पाहुं पाहुं वाटतो गडे श्रीरंग !

कधीं नाहीं पाहिला हरी
दिवसभर तरी
राही तो उरीं
मुरलि-रव करी
शरीरीं भरी नित्य नवरंग !

पाहिल्याविना तो दिसे
लाडकें हंसे
गूज मज पुसे
सांगूं तुज कसें ?
मला घडतसे तयाचा संग !

मी मूर्त तयाची एक घडविली
भगवंत-भूषणें त्यास चढविलीं
भक्तींत प्रीतिची पूजा मढविली
        द्या वाट, मला जाऊं द्या
        कृष्ण पाहुं द्या
        धन्य होउं द्या
        देह वाहुं द्या
जरा कान द्या, घुमे सारंग !

मी तुळस तुझ्या अंगणीं

## झाली चित्तरकथा!

एका पायावर भार ठेवुनी अशी उभी राहिलें
नजरेशीं नजर भिडली ... आणि खालीं मी पाहिलें!
काय सांगूं आतां?—
झाली चित्तरकथा!

नाहीं सोसली नेटकी नजर
खांद्यावरून गळला पदर!
त्याला आवरितां
झाली चित्तरकथा!

चहूं बाजूच्या लपल्या वाटा
साऱ्या शरीरीं भरला कांटा!
मान उंचावितां–
झाली चित्तरकथा!

पायाखालीं ठरेना जागा
नखें काढतीं भुईवरती रेघा
केतकी भुलली ग नागा!
अशी उलटी कथा–
झाली चित्तरकथा?

कधीं नाहीं लाजलें कुणा
आज तोऱ्याचा लवला फणा
माझ्या नखऱ्याचा मोडला कणा !
माझी गेली सत्ता—
झाली चित्तरकथा !

मी तुळस तुझ्या अंगणीं

# सख्या, मी तुळस तुझ्या अंगणीं !

माझ्यासाठीं बोल न लाविल तुला राजसा कुणी
सख्या, मी तुळस तुझ्या अंगणीं !

तुझ्या जागीं तूं बैस ध्रुवपदीं
पुरे माझि मज प्रीति-समाधि
मी नच मार्गीं येइन अगदीं
तुझ्या प्रीतिनें फिकट निळी मी शुक्राची चांदणी !

उभव नगा, तूं मान आपुली
नद्या वाहतिल तुझ्या पाउलीं
दुरुन करिन मी निळी साउली
एक सांवळी माळ ढगांची दिसेल केवळ जनीं !

सुखी रहा तूं तव संसारीं
वृंदावन मज पुरे समोरी
डुलतिल सुकतिल लाख मंजिरी
कधींमधीं तूं पान खुडावें इतुकी आशा मनीं !

मी तुळस तुझ्या अंगणीं

# वासवदत्ता

'मी तुळस तुझ्या अंगणीं' या चित्रपटांतील संगीतिकेची ही मूळ लेखन-प्रत चित्रपटसृष्टींतील गीतलेखन आणि संगीत-नियोजन यांचे परस्परसंबंध समजून घेण्याची उत्सुकता अनेक रसिकांना असते. त्यांना श्री. माडगूळकरांची लेखन-पद्धति कळावी या हेतूनें ही लेखन-प्रत मुद्दाम प्रसिद्ध केली आहे.

या संगीतिकेंत प्रत्यक्ष चित्रपटामध्यें केलेले फेरबदल तळटीपांत नमूद केले आहेत.

—संपादक

[आपल्या महालांत वासवदत्ता नृत्यगायनांत दंग आहे— ]

**वासवदत्ता :—**

**लालस लालस होउं लागली कांती माझी गोरी ग**
**ऐन वसंतीं वनीं वयाच्या मदन खेळतो होरी ग**

**मदन-रतींच्या रंगांत**
**संग उसळती अंगांत[1]**
**नसेंत निळसर अवचित उडली लज्जेची पिचकारी ग !**

**उरांत भरला रंग कुंसुंबी**
**ओठीं फुटला सुम डाळिंबी[2]**
**तन्वंगावर रंग प्रीतिचा, भिजली काया सारी ग !**

---

१. चित्रपटांतील ओळ :— "रंग मातला अंगांत"
२. ,, :— "ओठीं फुललें सुम डाळिंबी"

[ तिन्हीसांजची निजलें मी
अर्ध्या रात्रीं भिजलें मी
चंद्रकलंकित रात्रीं झाली इंद्रनयनिंची चोरी ग ! ][3]

[ या गीताशीं विसंगत असा एका वृद्धाचा स्वर ऐकूं येऊं लागतो — ]

**भिकारी :—** भीक वाढ, माई !
तृप्त जाहला मदन घरोघर, धर्म उपाशी राही !
[ दिसे दिवा, पण दया दिसेना
हंसें ऐकतों, कुणिहि पुसेना ][4]
वार्धक्याला जगांत का कुणि आप्तच या नाहीं ?

[ वासवदत्ता दाराशीं येते. वृद्धाला पहातांच — ]

**वासवदत्ता :—** जा पुढच्या दारीं ! —
उदास स्वर कां तुझा काढिसी या मंगल प्रहरीं ?
विकलांगा, तव होतां दर्शन
सचिंत झालें माझें नर्तन
तुला पहातां उरीं थांबली प्रणयाची होरी !
[ जा, जा ] जा पुढच्या दारीं ! [५]

**भिकारी :—** जातों, जातों, थांब मुली
तुझ्यासारखा होतों मीही तरुण एककाळीं !

---

३. आणि ४. या ओळी चित्रपटांत गाळल्या आहेत.
५. संगीताच्या सोयीसाठीं ' जा ' हा शब्द चित्रपटांत त्रिवार योजिला आहे : — [ " जा, जा, जा पुढच्या दारीं " ]

वासवदत्ता :—

मला ऐकवूं नकोस वृद्धा, भलतें या काळीं[६]
मुक्या कळीसम अबोधसुंदर विश्वच या वेळीं !
जा, येथुन जा, लेवुं लागली लाल वसन प्राची
वाट पाहते मंदिरांत मी माझ्या प्रीतीची !

भिकारी :— जातों, जातों, जातों !

[ असें त्रिवार सांगत भिकारी निघून जातो. वासवदत्ता पुनः महालांत येते आणि एका प्रतिमेसमोर जाते. प्रतिमेंतल्या तरुणाला उद्देशून गाऊं लागते — ]

वासवदत्ता :—

या सखया, या ऐशा समयीं
तनू फिकटली, विझली समई
वाट पाहतां मिटे पापणी
रसराजाची राणिव स्वप्नीं
नीज दचकली, येइ जांभई ! —

६. संगीताच्या सोयीसाठीं ओळीच्या प्रारंभीं 'नको' हा शब्द योजिला आहे :— [नको, मला ऐकवूं नकोस वृद्धा, भलतें या काळीं "]

[ इतक्यांत माधवगुप्त प्रवेश करतो. त्याच्या हातांत रक्ताळलेली तलवार आणि अंगावर रक्ताचे डाग आहेत — ]

**माधवगुप्त :—** पहा, मी आलों वासवदत्ते !

**वासवदत्ता :—** प्रिया, प्रियकरा, रुधिरस्नान हें कसलें मी म्हणतें ? –

**माधवगुप्त :—**

— तृप्त या तलवारीचें पातें !
तुझी नि माझी जडतां प्रीती
मत्सर शिरला रिपुच्या चित्तीं
तुझ्याचसाठीं प्रिये, घातलें कंठस्नान त्यातें ! –

**वासवदत्ता :—** ( घाबरून )

उतरिलें शिर हो कवणाचें ?

**माधवगुप्त :—** रक्त लावुनी बघ हें भाळीं तुझ्या ओळखीचें !

[ रक्ताचा टिळा तिच्या कपाळीं लावूं पहातो – ]

वासवदत्ता :— (एकदम संतापून)

हाच का माझ्यावर विश्वास ?
या श्वासाविण मी न कुणाचा अजुन हुंगिला श्वास !
कळी उमलते देवासाठीं
भृंग लागला तिचिया पाठीं
काय कळीचा दोष त्यांत, हें पुसा तरी हृदयास !

माधवगुप्त :— रुसुं नको अशी ग चंद्रमुखी !
तुज सौख्य ज्यांत, मी त्यांत सुखी !
तुझिया रूपावरती भुलला
विष्णुगुप्त मी म्हणुनि मारला
मीच एकला प्रियतम तुजसी, तूं माझी प्रियसखी !

वासवदत्ता :— मीं न पाहिला विष्णुगुप्त तो —

माधवगुप्त :— — धाडिलाच मी नरकिं आज तो !
स्वर्गसौख्य तव सहवासाचें, मीच एकला धनी !

वासवदत्ता :— — नाहिं ना शंका भलती मनीं ?

माधवगुप्त :— नाहिं ग, रुसूं नको मानिनी !

[ तो तिला जवळ ओढतो. इतक्यांत बाहेरून एक धीरगंभीर आवाज उमटूं लागतो — ]

उपगुप्त :— *बुद्धं सरणं गच्छामि ।*
*धम्मं सरणं गच्छामि ।*
*सङ्घं सरणं गच्छामि ।*

[ त्या आवाजानें आकर्षित होऊन वासवदत्ता आपल्या प्रियकराला सोडून महालांतून बाहेर येते. भिक्षु उपगुप्ताची तरुण, देखणी मूर्ति दिसतांक्षणींच तिला भूल पडते. आणि त्याला ती विनवूं लागते – ]

**वासवदत्ता :—**

**भिक्कुवराजी, थांबा थोडें, सेवा घ्यावी जरा**
**चलावें घटकाभर मंदिरा ! –**

**उपगुप्त :—** ( उदासपणें )

**मठाविहारावांचुन आम्ही कधिं न थांबतों, देवी !**
**' चला मंदिरा ' म्हणुनि विनविसी भिक्कुस तूं कैंवी ?**

[ आणि तो पाऊल उचलतो – ]

**वासवदत्ता :—** ( त्याच्यामागें धांवत )

**—ओळखिलें कां मला ?**

**उपगुप्त :—** **बुद्ध आणखी धर्म याविना आप्त नसे मजला !**

**वासवदत्ता :—** **या नगरांतिल तरुण-मनांवर गाजविते सत्ता**
**रूपगर्विता, अतुल नर्तकी, मी . . . वासवदत्ता !**

उपगुप्त :— निर्वाणाचा पथिक असे मी, मला तुझी ना क्षिती

वासवदत्ता :— बघतां क्षणिं पण तुम्हां मानलें या रूपाचे पति

उपगुप्त :— अतीच घाई केलिस मूढे ! मला जाउं दे पुढें
बोधिसत्त्वहि लंघुन गेला असेच पर्वत-कडे !
भासमात्र हें जीवन इथले, भासमात्र हें सुख ! —

वासवदत्ता :— — तुम्हावर भुललें पाहुन मुख !
तुमची प्रीती निर्वाणाहुनि थोर वाटते मला
प्रियकरा, चला, मंदिरा चला !

[ राजदूत अकस्मात् तिथें येतात – ]

राजदूत :— मंदिरीं लपला तुझ्या नर्तकी, कोणी अपराधी
राजमार्गि जो तलवारीनें विष्णुगुप्ता वधी !
माधव त्याचें नाम, तरुण तो सामंताचा सुत
राजदूत गे आम्ही त्याला शोधतसूं सांप्रत !

वासवदत्ता :—

पकडा त्याला, आंत असे तो मंदिरांत माझ्या
[ देहदंड त्या सुखेन देवो नगरीचा राजा !
असे असे व्हा पुढें — ][7]

७. या ओळी चित्रपटांत गाळल्या आहेत.

[ राजदूत तिच्या महालांत शिरतात. नंतर ती उपगुप्ताला सांगते — ]

**वासवदत्ता :—** — बघा हें वैभव माझें गडे !
माझ्यासाठीं तरुणांमाजी द्वंद्व नित्य कीं घडे !

ज्योतीवरती पतंग मरती ऐसे प्रीतीकरितां !
जिवंत ज्योती तुम्हांस भुलली ही वासवदत्ता !
[ चला मंदिरीं, नातरि येइन मी तुमच्यामागें
तुमच्या रूपीं रंग मिसळला माझ्या अनुरागें ! ][८]

[ राजदूत माधवगुप्ताला काढण्या बांधून घेऊन येतात. त्याच्या चेहऱ्यावर पश्चात्तापाचा लवलेश नाहीं. उलट राजदूत ओढून नेत असतां तो म्हणतो — ]

**माधवगुप्त :—**

आयतनयने, तुजसाठीं मज सह्य असे बंधन !
जातां जातां तरी एक दे डोळ्यांचें चुंबन !

[ राजदूत त्याला ओढून नेतात. वासवदत्ता विजयोन्मादानें हंसते. पुनः वळून पहाते तों उपगुप्त निघून गेलेला असतो ! — ]

---

८. या ओळी चित्रपटांत गाळल्या आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र
अनुक्रम 32968 वि: ...
क्रमांक 1543 नों दि: ...

वासवदत्ता :— — माझे देव कुठें गेले ?
अतांच ना मी सर्वस्वातें पायावर वाहिलें !
देव कुठें गेले ?... देव कुठें गेले ?...

[ असें म्हणत म्हणत, निराश मनानें ती महालांत शिरते. यावर अनेक दिवस उलटून जातात. उपगुप्ताविषयीं तिला वाटलेलें आकर्षण क्षणभंगुर नव्हतें. त्याचें रूपांतर चिरंतन प्रीतींत झालेलें आहे. पण त्यानंतर तो मात्र तिला पुनः भेटलेला नाहीं !—वासवदत्ता दिसते ती आपल्या सौधावर, एकटीच विमनस्क अवस्थेंत वीणा छेडित वसलेली.

वासवदत्ता :—

वीणा छेडित बैसतां गुणगुणूं
आसावरी लागते
माझीया नयनीं उदास थकली
आशा पुन्हां जागते
मौनी नूपुरही शहारुनि करी
जागेवरी नर्तन
ओठींही अपसूक शब्द फुटती –
'होईल गे दर्शन !'
तुझ्याविण वैरी हें जीवन !
तुझ्याजवळिं जे जाऊं न शकतें, कसलें तें नर्तन ?
न्याहळूं न शकती रूप आगळें
नकोत मज हे टपोर डोळे
कुंडलमंडित कर्ण कशाला ? – श्रवणीं नच भाषण !

[ हुंकार न दे तुझिया श्रवणीं
हवी कशाला मज ही वाणी ?
कशास कर हे, जयां न लाभे मंगल आलिंगन ? ][१]

तूं योगी, तर मीहि योगिनी
पायीं घालिन स्वर्ग-मेदिनी
अभिसाराचें घेउनिया व्रत, धरणी परि हिंडिन !
तुझ्याविण वैरी हें जीवन !

[ उपगुप्त येतो – त्याला मिठी मारून ती रडूं लागते. तो तिचें सांत्वन करूं पहातो — ]

**उपगुप्त :—**

तुझ्या प्रीतिची दिव्य आर्तता जाणुनिया दयिते
एकच देतों वचन तुला मी, सखि वासवदत्ते –
खरीच जेव्हां पडेल माझी तुजसी आवश्यकता
क्षणीं त्याच मी अचूक येइन, कुणि ना बोलाविता !

[ एवढें अभिवचन देऊन आणि तिच्या आलिंगनाचे पाश झिडकारून तो निघून जातो.
यालाहि अनेक वर्षें होऊन जातात. — आणि नंतर तो क्षण येतो! रोगजर्जर झालेली वासवदत्ता मरणाची वाट पहात राजरस्त्याच्या कडेला पडलेली आहे. रस्त्यावरून पालख्या-मेणे जात आहेत. लोकांचे व्यवहार सुरळित सुरू आहेत. तिच्याकडे कुणाचेंहि लक्ष जात नाहीं ! ]

१. या ओळी चित्रपटांत गाळल्या आहेत.

**वासवदत्ता :—** ... मरणा, वाट तुझी पाहते !
गळले पद, तरि तुझ्या स्वागता उठुन उभी राहते !

देह विकुनि मी महाल केले
यौवन गेलें, महाल गेले
मन रस्त्याला सडत राहिलें
ओलांडुनि मज जाती पुढती पूर्वींचे चाहते !

[ एक पालखी थांबते. तींतून खालीं उतरणारी व्यक्ति माधवगुप्त आहे ! वासवदत्तेची ती अवस्था पाहून त्याला करुणा तर येत नाहींच ; उलट तो हिणवतो – ]

**माधवगुप्त :—**

पहा, पहा, ही वासवदत्ता मरते रस्त्याकाठीं
कारावासीं मी तळमळलों ज्या मूढेसाठीं !
याचि देहीं, याचि डोळां
बघा हा नरकांतिल गोळा ! —

[ आणि पुनः पालखींत बसून तो खुशाल निघून जातो. ]

**वासवदत्ता :—** ( विव्हळते )

— ये लवकर काळा !

[ रस्त्यावरून जाणारी एक विधवा तिला पाहतांच क्षणभर थबकते. आणि – ]

**विधवा :—** —असे तुला ही योग्य अवकळा !
तूंच अवदसे, चिरिला माझ्या सौभाग्याचा गळा !

[ आणि तीहि वैतागानें निघून जाते. ]

**वासवदत्ता :—** ( विव्हळत )

—ये लवकर काळा !

[ मार्गानें जात असलेला एक वृद्ध भिकारी थांबतो. – ]

**भिकारी :—** तारुण्याच्या भरांत असतां तरुण लाविले नादीं
नादाइतुक्या आज भोंवती जारिणि, तुज व्याधी !
अमंगले मूढे ! —
—शिवति न तुजसी नरकामधले किडे !

[ आणि तोहि आला तसा निघून जातो – सारें असह्य होऊन वासवदत्ता कशीबशी उठून उभी रहाते. जाऊं लागते – ]

**वासवदत्ता :—** —जाऊं कोणीकडे ?
ने मज निजधामीं !
मरणा, जिवंत मरत्यें मी !

[ चालतां चालतां कोसळते. तोंच उपगुप्ताचा आवाज दुरून ऐकूं येतो – पाठोपाठ उपगुप्त ! – ]

**उपगुप्त :—** *बुद्धं सरणं गच्छामि ।*
*धम्मं सरणं गच्छामि ।*
*सङ्घं सरणं गच्छामि ।*

**वचन दिलें मी तुजसी पूर्वी, योग्य क्षणीं येतों**
**मठांत माझ्या वासवदत्ते, मी तुजसी नेतों !**

[ आणि तो तिला उचलूं लागतो— ]

*बुद्धं सरणं गच्छामि ।*
*धम्मं सरणं गच्छामि ।*
*सङ्घं सरणं गच्छामि ।*

[ पश्चात्तापदग्ध वाणीनें वासवदत्ताहि त्याच्या आवाजांत आपला आवाज मिसळते — ]

**वासवदत्ता :—** *बुद्धं सरणं गच्छामि ।*
*धम्मं सरणं गच्छामि ।*
*सङ्घं सरणं गच्छामि ।*

[ – आणि तिला उचलून घेऊन उपगुप्त आपल्या मठाच्या दिशेनें जाऊं लागतो — ]

मी तुळस तुझ्या अंगणीं

# रात चैताची जाते सुनी

अनोळखी मी हांक मारतें चढत्या उंच स्वरांत
दे सादाला साद राजसा, सुनी चालली रात !
रात चैताची जाते सुनी, ग
माझ्या रायाला कळवा कुणी !

भिजविले खसाचे पडदे पाण्यामधीं
कितीतरी वास या अत्तरदाण्यामधीं
वेगळी धुंदता माझ्या गाण्यामधीं
भरे शराब या लोचनीं !

मज उचकी लागे गातांना सारखी
वरखालिं होतसे हृदयाची पालखी
ये बैस तीमधें – तुझीच ती मालकी !
आशा धरून बसलें मनीं !

पुनवेची रात

# कडकड बिजली मारी तोडा –

कडकड बिजली मारी तोडा गणगौळण हो सुरू
पायीं माझ्या बोले ना घुंगरू !

टिपेंत वारा म्हणे लावणी, झील धरी वादळ
खदखद हांसे फेंस पुराचा, चढूं लागलें जळ
पावसांत या तुझ्यावांचुनी नाच कशाला करूं ?

समेवरी जरि नाहीं टाळी तुझी गडे अवखळ
कुठली माझ्या गळीं सुरावट ? कुठलें पायीं बळ ?
तूं नसतांना समोर कुठुनी स्वरीं गोडवा भरूं ?

हा पूर पोहणें तुझ्या हातचा मळ
अडवील प्रेम का पाणी हें दुर्बळ ?
ये, पिऊन घेऊं प्रीतीची ओंजळ
इष्काच्या कैफांत गात या ओघ नदीचा तरूं !

पुनवेची रात

## माझ्या नथीच्या आंकड्यामधीं –

माझ्या नथीच्या आंकड्यामधीं गुंतली तुझी बाही
सुटका आतां नाहीं !

ज्याचा त्यालाच पडला फांसा
कसा गळास लागला मासा
आरपार रुते अणकुची, तळमळी ग होई !

दूरदुरून पोहत होता
कसा हातास आला आतां
विसरला पार सुरकांडी, लटकुनी ग राही !

कल्ले हलवीत हलतो बायां
तुला वाकूंत फेंकीन राया
पाण्यांतुनी येई बाहेरी, मजा तरी पाही !

दिस सोन्याचा दिसतो ग बाई
झाली शिकार बसल्या ठायीं
शिकाऱ्याच्या बसुन मनगटीं पांखरूंच गाई !

पुनवेची रात

## तुझी नि माझी प्रीत विजेची

ढगावरी धडकला ढग सख्या रे, ठिणगी त्यांतुन उडे
तुझी नि माझी प्रित विजेची, उजेड भूतळीं पडे !

अस्मानांतिल आग कोण ही सोशिल धरणीवर ?
या आगींतच जळून जायचं तुझं नी माझं घर
घडूं नये तें घडलं, राया, माया आपुली जडे !

खरंच सांगतें अतां न अपुलें पृथ्वीवर पाउल
गणगोताला भरविल धडकी बिजलीची चाहुल
धरणी नाहीं, अभाळ नाहीं, न्यारी दुनिया गडे !

ही दुबळ्यांची दुनिया राया, उंच आपुली उडी
एकमेकांच्या नयनीं घेऊं सात जन्माची बुडी !
एक वाकडी जळती रेषा इतुकी किमया घडे !

पुनवेची रात

# माझ्या रंगांत तुझी साउली

माझ्या रंगांत तुझी साउली
तुझ्या डोळ्यांत मी बाहुली !
खांब पोखरील ऐसा बळी
शिरे भुंगा न् मिटली कळी
चिरूं शके न मऊ पाकळी
सांगे ज्ञानेश्वर माउली !

पावसांत मी भिजलें नाथा, गाल निथळती जळीं
ओठांनीं ते टिपा नि सांगा शराब का वेगळी !
तो कैफ उतरतो एका घटकेमधीं
या धुंदपणाला उतार नाहीं कधीं
लक्ष्मीनंतर मद्य गावलें क्षीरसागरातळीं !

संपला बोलांचा फुलवरा
होता तितुका वाहुन पुजिलें प्रीतीच्या शंकरा !
मज म्हणा आपुली किंवा टाका दुरी
मी छाया होउनि फिरेन मागावरी
रानांत असा वा बसा सुखानें घरीं
धरा मस्तकीं किंवा प्रीती पायदळीं अंथरा !

पुनवेची रात

## केली मी चांफ्याची शय्या !

घे प्याला हा भरला मिसळुन लाजेची लाली
सरली लज्जा, नीती भीती त्यांतच विरघळली
केली मी चांफ्याची शय्या !

ना झोंप, जांभई आली
हो रात दंवानें ओली
दरवळे धुंद मोतिया !

पुन्हां पुन्हां झुकुनी सुरई
प्याल्याचें चुंबन घेई
लागली रात झिंगाया !

आपुलें गुपित हुडकीत
पोंचला चांद खिडकींत
ओढितें सरपडदा सैय्यां !

महाराणी येसूबाई

## रात अर्धी, चांद अर्धा –

तो :— रात अर्धी, चांद अर्धा, त्यांत सुटला गारवा
कोटराची ऊब घेतां साद घाली पारवा

ती :— पारव्या रे, पांखरूं तूं, प्रीत तुमची वेगळी

तो :— जवळ असुनी दूर झाली धनिण माझी सांवळी

ती :— आगळा भेटीहुनी ताटातुटीचा गोडवा !

तो :— एक पुरतें साधण्यासी एक अर्धें सोडिलें
जोडण्याआधींच धागे रेशमाचे तोडिले

ती :— त्या सईनें हंसविलें मी दाटलेल्या आंसवा !

तो :— खेळ अर्धा राहिला पण डाव पुरता जिंकला

ती :— हात हातीं घेतला ना जीव जीवीं गुंतला

दोघं :— काळजाचे कोंपरे या जपतिल या आठवा
रात अर्धी, चांद अर्धा, त्यांत सुटला गारवा !

महाराणी येसूबाई

# सरला बाळपणा

सरला बाळपणा अजुनि ना सरली भातुकली !
नशिबाचा चकवा, वाट ग सासरची चुकली !

जुळलेलें नातें दुरावें देवाच्या हातें
सासरची मैना मनीं पण गोड गीत गाते
एक व्हायचीं पुन्हां पांखरें भेटिस जीं मुकलीं !

खेळ जरी हा जुना, नव्याची त्यावरी छाया
फुलतो तरुणपणा, लागली अनोळखी माया
आठव ये त्याचा, पापणी लाजेनें झुकली !

कोणासाठीं तरी येतसे खेळाला गोडी
जमेल केव्हांतरी आमुची प्रीतीची जोडी
परत यायची घडी एकदां अवचित जी हुकली !

महाराणी येसूबाई

## रात विरहाची

रात विरहाची राजा, कटतां कटेना
खपा तुझी मर्जी झाली, पटतां पटेना !

मध्यरात्र टळुनी गेली
झुळुक पहांटेची आली
पापणिचा पडदा माझ्या मिटतां मिटेना !

चुरचुरती डोळे ओले
धुउन पार काजळिं गेले
तुला पाहण्याची आशा सुटतां सुटेना !

तुझी माझि प्रीती चाले
लाख तुला वैरी झाले
राजहंस अपुली जोडी फुटतां फुटेना !

एकटाच तुजला बघुनी
वैरि काय आले कोणी
मनोमनीं लागे चिंता, तुटतां तुटेना !

महाराणी येसूबाई

## यत्न तो देव जाण राणी !

उदंड आली उदासीनता, जळ दाटे नयनीं
यत्न तो देव जाण राणी !

शिवरायाच्या आठव रूपा
आठव त्याच्या पुण्यप्रतापा
विझता वन्ही चेतव फिरुनी अनंदवनभुवनीं !

पुन्हां मराठा तितुका मेळव
तुझ्या पाठिशीं रघुपति राघव
वानरसेना जाइल तरुनी सिंधूचें पाणी !

लंकापतिसम म्लेंच्छा बुडवी
निशाण भगवें गगनीं चढवी
धर्मरक्षिता नाहीं तुजविण भूमंडळीं कोणी !

महाराणी येसूबाई

## डोलतो उरीं हिंडोल

मी गुणगुणतें अबोध कांहीं बोल
डोलतो उरीं हिंडोल !

कळिकळी उमलुनी आली
तारका उतरल्या खालीं
हिरवाळ दंवानें न्हाली
करि घमघमता पारिजातहि डोल !

ओठांचा उघडे पडदा
ये अस्फुट दिड्दा दिड्दा
विस्तार स्वरांचा उमदा
या गीताचा अर्थ मनाहुन खोल !

हें मनोगताचें गीत
शब्दांच्या पार अतीत
जाणते एक या प्रीत
ती प्रीती दे यास लाजरा ताल !

आंधळा मागतो एक डोळा

# दोन्ही मनांत प्रीती

नाहींस बोलला तूं, नाहींच बोललें मी
दोन्ही मनांत प्रीती हें आज जाणिलें मी !

स्पर्शाविना तुझ्या कां बेचैन जागलें मी
माझ्याच कल्पनांच्या वेडांत वागलें मी
झोंपेविना कशी रे स्वप्नांत राहिलें मी !

शालीन वागण्यानें तूं घातल्यास सीमा
त्या बंधनांत वाचा आली कधीं न प्रेमा
घेऊन आर्जवें ना आलें तुझ्याकडे मी !

झालें सजीव कांहीं माझ्या मनीं अनामी
माझें मला न ठावें, सांगूं कशी तुला मी ?
गौप्यांत रेशमाच्या तें गूज ठेविलें मी !

तें गूज आज आलें ओठांवरी सपंख
ओठीं तुझ्या करी तें लाडीक गोड डंख
हा येथल्या इथें घे संदेश धाडिला मी !

आंधळा मागतो एक डोळा

## अय्याबाई इश्शबाई

अय्याबाई ! इश्शबाई ! सांगूं काय पुढें ?
गुलाबाचा रंग माझ्या गालावर चढे !

कांहींतरी झालें आहे
कोणीतरी आलें आहे
त्याचें हंसूं गोड आहे
मला त्याची ओढ आहे
त्याची माझी जोड आहे
सांगतांना बोल बाई ओठांवर अडे !

माझ्यापाशीं झेंप आहे
त्याच्या डोळ्यांत झोंप आहे
माझ्यापाशीं वाण नाहीं
त्याच्यापाशीं जाण नाहीं
साहसाचें त्राण नाहीं
काय सांगूं भलतेंच वेड मला जडे !

माझें मन गात आहे
त्याच्या हातीं साथ आहे
माझ्या पायीं चाल आहे
त्याच्या हातीं ताल आहे
अशी कांहीं धमाल आहे
त्याच्या मनाआड जाऊन माझें मन दडे !

माझ्या शेजारीं तो आहे
त्याच्या शेजारीं मी आहें
त्याला कांहीं मागायचें आहे
मला कांहीं द्यायचें आहे
दोघांना कांहीं प्यायचें आहे
आधीं कोणी बोलावें हें जरा कोडें पडे !

आंधळा मागतो एक डोळा

## उभी ती जळीं देवता जणूं

उभी ती जळीं देवता जणूं
न्याहळी राजा तिज शंतनू !

भरांत आल्या तरुणपणाची
रूपवती ही लेक कुणाची
भुंवइचें करी वाकडें धनू ?

ती कोळ्याची लेक सांवळी
धरीत होती जळीं मासळी
लागली गीत उगा गुणगुणूं !

नकळत मिळल्या दोन्ही नजरा
तिच्या वेणिंतून गळला गजरा
लागले कांकण कां रुणुझुणूं ?

थकल्या दिवसापरी भाळली
तरुण सांवळी सांज साउली
काय या प्रीतीला मी म्हणूं ?

जगावेगळी गोष्ट

## दुःख द्यावें वाटे

दुःख द्यावें वाटे
तरी देई देवा
अंतरीं रहावा
धीर माझ्या !

पडतां पर्वत
कोसळून माथीं
सोसण्यास शक्ति
देई देवा !

सुख द्यावें वाटे
तरी देई देवा
अंतरीं नसावा
गर्व माझ्या !

संपत्तीच्या राशी
वाहूं देत दारीं
ठेव या अंतरीं
उदारता !

सौख्य दुःख दोन्हीं
मज सारखींच
देता-घेता तूंच
नारायणा !

जगावेगळी गोष्ट

## रहाट फिरतो रहाट ग

रहाट फिरतो रहाट ग
दिवस संपतां पडते झांजड, पुन्हां उगवते पहांट ग !

दिसे पोहरा जातां येतां
खालीं भरतो, वरी पालथा
कोण चालवी रहाट असला ? कसलें त्याला चऱ्हाट ग

सूर्य समुद्रीं असाच बुडतो
उजेड सांडित वरती चढतो
पिढ्या संपल्या तरी फिरतसे रहाट ऐसा जुनाट ग !

फुलवतीचें जिणें देखणें
सहज उमलणें आणिक हंसणें
एका हंसण्यावरी शेवटीं मातीसंगें सपाट ग

जगावेगळी गोष्ट

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 32958 वि: 3104
क्रमांक 2443 नों दि 2452

बघुन बघुन वाट तुझी नयन थांबले
परत निघुन जावया न वळतिं पाउलें !

भिरभिरता तळिं वारा
लुकलुकत्या वरि तारा
क्षण क्षण मी गणत इथें स्तब्ध राहिलें !

भास तरी किति वेळां
सोडी ना मनचाळा
पदरव मज वाटे जरि पान वाजलें !

बोले जरि खग कोणी
मज वाटे तव वाणी
वेडी मी, मजसि तुझें वेड लागलें !

मनिं येतें रे नाथा –
येशिल तूं, मी जातां
सोसशील दुःख कसें मज न सोसलें ?

माझं घर, माझीं माणसं

## आज सुगंधित झालें जीवन

आज सुगंधित झालें जीवन
वसंत फुलले तव स्पर्शांतुन !

फुलें सुगंधित, लता सुगंधित
कोकिल कूजित–कथा सुगंधित
सौख्य सुगंधित, व्यथा सुगंधित
सुगंध सुटतो उच्छ्वासांतुन !

गगन सुगंधित, मेघ सुगंधित
स्थैर्य सुगंधित, वेग सुगंधित
मम भाग्याची रेघ सुगंधित
सुगंध हिरवा झरे धरेंतुन !

हार सुगंधित, जीत सुगंधित
उष्ण सुगंधित, शीत सुगंधित
प्रीत सुगंधित, गीत सुगंधित
सुगंध गळतो या नयनांतुन !

माझं घर, माझीं माणसं

## श्रावण येतो आहे !

फुलव पिसारा मोरा, श्रावण येतो आहे !
उंच स्वरानें वारा ‘ स्वागत ’ गातो आहे !

तूं धरणीचा मानसभाव
सहजनृत्य हा तुझा स्वभाव
आजवरीच्या उच्छ्वासांचा सौरभ होतो आहे !

सरे प्रतीक्षा, आर्जवगीत
गगनामधुनी येते प्रीत
ही प्रीतीची दौलत राजा मन्मथ देतो आहे !

थेंब कशाचे ? – जलवर्षाव
तृप्तीमाजीं बुडेल गांव
वसुंधरेचा प्रियकर वेगें दौडत येतो आहे !

लवते वेली, हलतें झाड
विजयाआधीं धुंद पवाड
संधनृत्विं या उडते माती, गुलाल होतो आहे !

माझं घर, माझीं माणसं

## डोहांत बुडाला श्याम

तुज वेड लावुनी अपुल्या वेणू नादें
डोहांत बुडाला श्याम अचानक राधे !

जाशील कुणास्तव सजुनी संध्याकाळीं ?
बघशील कुणाची वाट कदंबाखालीं ?
हंसवील कोण तव लटका राग विनोदें ?

इतक्यांत मनोहर खेळत होता येथें
तव नयन तयाच्या तेजा प्राशित होते
हें सत्य म्हणूं कीं क्रूर स्वप्न एकादें ?

बुडविला कृष्ण का निदय यमुनामाई ?
ठेविली कशाला जिवंत छाया मग ही ?
पोटांत तुझ्या मज ठाव दयेनें दे दे !

माझं घर, माझीं माणसं

# रायें हिरावून नेली

रायें हिरावून नेली मूर्त माझ्या विठ्ठलाची
कां रे लावितां कवाडें सांवळ्याच्या राउळाची ?

त्याच्या चरणींची धूळ मज लावूं द्या रे भाळीं
त्याच्या पाउलाची वीट माझ्या जडवा कपाळीं

त्याच्या पूजेचें निर्माल्य मज ओटींत घेऊं द्या
त्याचें रिकामें आसन डोळां भरून पाहूं द्या

आस उरे माझ्या उरीं रंगशिळे लोळण्याची
एकवार घेऊं द्या रे, मिठी गरूड-खांबाची

करी उघडीं कवाडें, हांक मारली शेवटची
भानुदास म्हणे, तुम्हां आण घालितो देवाची !

माझं घर, माझीं माणसं

## या, बसा हो पाहुणे

शोभलें का हें तुम्हांला दूर ऐसें राहणें ?
या, बसा हो पाहुणे ?

बावरी कां नजर तुमची होतसे ही सारखी ?
बोलल्यावांचून कोठें होतसे का ओळखी ?
आपुल्यासाठींच ना या मखमलीच्या बैठकी ?
श्रावणावांचून मोरा काय सुचतें नाचणें ?

श्रावणाचे मेघ तुमच्या लोचनीं मी पाहिलें
चाळ पायीं बांधले अन् ही उभी मी राहिलें
अधर स्फुरती गीत गाया, अधिर नृत्या पाउलें
ओळखीचें मजसि वाटे धुंद तुमचें चालणें ?

आवडीचा राग सांगा, दाविते मी गाउनी
या गुलाबी अंगुलींनीं पान देते लावुनी
फुलुन आला जीव माझा खरंच तुम्हां पाहुनी !
आज तुमच्या संगतीनें आंत आलें चांदणें !

दिसतं तसं नसतं

## जळतो पतंग

पाणी जळून जातें, येती नभांत मेघ
मेघास आग लागे, ती वीज लाल रेघ
ती वीज कोंसळे अन् होतें उजाड सारें !
जळतो पतंग, त्याचा ज्योतीस दोष कां रे ?

त्या ज्योतिनें कधीं कां बोलाविलें पतंगा ?
मृगनीर का कधीं तें आमंत्रितें कुरंगा ?
ना पाड पांखरांचा तुटतात जेथ तारे !

माझ्या भलेपणाला तूं मानिलीस प्रीती
केलास घात वेड्या, तूं आपुल्याच हातीं
कां निंदतोस आतां लावण्य हे बिचारें ?

म्हणतात लोक लोकीं, मी मारितें पतंगा
होऊं दिला कधीं ना मी स्पर्शही मदंगा
माझ्या शहारण्याचे झाले जगीं इशारे !

माझें मलाच ठावें आंतील दुःख काळें
लावण्यसुंदरी कां म्हणतात लोक भोळे
पोटांत राख माझ्या, वरतीं स्वरूप गोरें !

दिसतं तसं नसतं

## कधीं रे येशिल रामा, वनीं ?

मानस-पूजा करिते शबरी जागेपणीं स्वप्नीं
कधीं रे येशिल रामा, वनीं ?

उरलासी तूं जलस्थल व्यापुन
कसें करूं मी तुज आवाहन
सर्वाधारा तुला बैसवूं कसल्या सिंहासनीं ?

आचमना तव अपुरे सागर
अमल अमर तूं त्रिभुवनसुंदर
तुझ्या कपाळीं कशास करूं मी तिलक उगा चंदनी ?

कमलचरण तूं कमललोचना
काय पुजूं तुज वाहुनि सुमनां ?
काय आरती करते, रविशशी असति तुझ्या वदनीं ?

तूं राजा, मी दीन दरिद्री
तुषार मी तर तुझ्या समुद्रीं
सगुणरूप तव तरी बघावें वाटे या नयनीं

पसंत आहे मुलगी

## मी राजाची राणी झालें

आज चांदण्याहुनि शीतळलें वैशाखाचें ऊन ग
मी राजाची राणी झालें, श्रीमंताची सून ग !

आज रुजामे पायाखालीं, हाताखालीं दासी ग
मीच माझिया मनास पुसतें, कुठें सुंदरी जासी ग ?
स्वर्गसुखीं मज घेउनि जाते सुखसनईची धून ग !

संगमरवरी रुंद पायरीवरती पाउल एकच ग
कोण उभें हे समोर तिकडे ? नजर लाजरी फेंकच ग
त्यांच्या पुढती भेट प्रीतिची सुंदर स्वप्नाहून ग !

अंगकांतिहुनि नितळ नेसणें, पदर भर्जरी सोड ग
अलिंगनांतिल आनंदाहुनि अमृत कुठलें गोड ग ?
अननुभूत तो अनुभव आला दैवी आपणहून ग !

पाउल तेथें फूल बाई ग, बोलशील तें गाणें ग
दिसेल तें तें हंसेल, होइल हात लावितां सोनें ग
आज सुखाला अंकुर फुटले अंगाअंगांतून ग !

पसंत आहे मुलगी

## सांगते मीरा

सांगते मीरा— माइ, मी वरिलें यदुवीरा !

मी सर्वांगीं झालें पिवळी
उभा मनोहर माझ्याजवळीं
त्रिभुवनसुंदर शंखचक्रधर शोभे मज नवरा !

अक्रुर, उद्धव, आप्तमंडळी
नणंद राधा, व्याही गवळी
देव हर्षती, शिरीं वर्षती अमृतरसधारा !

आनंदाची धून लागली
मी नंदाची सून सानुली
सासरिं जातें मी मथुरेतें कालिंदीतीरा !

पसंत आहे मुलगी

# ही आस म्हणूं कीं ध्यास म्हणूं ?

ही आस म्हणूं कीं ध्यास म्हणूं ?
कीं उगा मनाचा भास म्हणूं ?
या जागेवर धुंद दरवळे
मज आवडता वास जणूं !

सजवितसे मी ज्यांनीं वेणी
त्यांनीं सजली ही फुलदाणी
पुरे जाहले रुमाल का हे
मीच घातले ज्यास विणूं ?

मज आवडती तसले साधे
कुणी निवडले येथें पडदे
समोर दिसतें आहे — कैसें —
स्वप्न तरी मी यास म्हणूं ?

मेज, बैठकी, दीप, गालिचा
अगणित वस्तू माझ्या मनिंच्या
माझी आवड लेवुन सजला
या जागेंतिल अणू अणू !

पसंत आहे मुलगी

## स्वप्नांत येउनी कां ?

तीः— उजळे निशीथ तारा, हो मध्यरात्र आतां
स्वप्नांत येउनी कां मज गांजितोस नाथा ?

तोः— या लोचनीं शुभांगी, आहे तुझा निवास
धजते न नीज येथें पाऊल टाकण्यास
मी रात्र संपवीतो तुज प्रेमगीत गातां

तीः— स्वप्नांत येउनी कां मज गांजितोस नाथा ?
तव गीत वाहतें का तेजस्वि रूप घेत ?
डोळ्यांवरी तयाचा येतो असह्य झोत
झोंपेंत जागते मी, तेजांत नेत्र न्हातां
स्वप्नांत येउनी कां मज गांजितोस नाथा ?

तोः— दोन्ही तनूंत खेळे ही प्रीत नाम वीज
या पेटत्या जिवांना आतां कुठून नीज ?

तीः— संपेल दाह केव्हां ?

तोः— हातांत हात येतां !

तीः— स्वप्नांत येउनी कां मज गांजितोस नाथा ?

पसंत आहे मुलगी

# मज आवडलें हें गांव

मज आवडलें हें गांव

नदी वाहती, घाट उतरते
तीरावरती गोधन चरतें
हिरवी मळई जळा चुंबिते
इकडुन तिकडे, तिकडुन इकडे खेपा करिते नाव !

चहूं बाजुला निळसर डोंगर
मधें थिटुकलें खेडें सुंदर
निंब, बाभळी, अंबा, उंबर
हलुनी डुलुनी सपर्ण फुलुनी करिती शीतळ छांव

घरें ठेंगणी, वळत्या वाटा
चावडिपुढचा रुंद चव्हाटा
राउळ-शिखरीं उंच बावटा
भगव्या रंगें जगास सांगे वंश-कुळाचें नांव !

गांठ पडली ठकाठका

## लोचनींची नीज माझ्या

लोचनींची नीज माझ्या रोज कोणी चोरितें
जागते मी आणि स्वप्नीं रम्य लेणीं कोरितें !

कल्पनेचें शिल्प आतां आकारतें या उरीं
एक मूर्ती रूप घेते या मनाच्या मंदिरीं
मुग्ध प्रीतीवांचुनी का धर्म दुसरा नारितें ?

या मनाच्या मंदिरीं या काय सांगूं आणखी
मूर्तिची त्या ऐट आहे थेट तुमच्यासारखी
हास्यरेषा ओठिंची त्या मजसि सौख्यें भारिते !

साधला जो भाव मजसी शिल्प तुमचें थाटतां
येइना कां लोचनीं तो नाथ, तुम्ही भेटतां
लाजतें कां त्या क्षणीं मी, उगिच पदरां वारितें ?

गांठ पडली ठकाठका

## फुलत्या फुलांत कांटा !

जा एकटीच तूं गे, दोघे सुखांत भेटा
मी पाहिजे कशाला फुलत्या फुलांत कांटा?

येतील स्वागता ते, येतील हात हातीं
एकाच स्पर्शमात्रें तुमची जडेल प्रीती,
ठेवूं कशी मुखीं मी गंभीर भाव खोटा ?

कमळापरी तुला ते नेतील गे खुडून
मज सोडतील तेथें शेवाळ मीं म्हणून
जाऊं कशी कुठें मी शोधीत पायवाटा ?

मज ओळखील ऐसी तेथें नसे असामी
तव सासुऱ्यास आलें जरि मैत्रिणी पुन्हां मी
तूं दावशील कोपा डोळा करून मोठा !

निर्लज्ज मी बनून जरि राहिलें तुझ्यांत
श्रीमंत तूं पिढ्यांची, घेशिल काय आंत
फेंकून घोंगडी तूं मज दावशील ओटा !

गांठ पडली ठकाठका

## स्वप्नांत पूजिलें ज्यास गडे

स्वप्नांत पूजिलें ज्यास गडे
तें रूप ठाकलें आज पुढें !

भरीव मूर्ती, कोरिव डोळे
जितके मिस्किल, तितके भोळे
भाळीं कुंतल धुंद मोकळे
नयनांस माझिया भूल पडे !

अनोळखी तें लोभस हंसणें
वीरोचित तें सुंदर बसणें
वरि संकोचें कुशला पुसणें
कां उत्तर माझ्या अधरिं अडे ?

मलाच माझी दशा कळेना
स्थिरावली ग नजर वळेना
पापणि त्याची जरा चळेना
ढळतसे पदर, कां हृदय उडे ?

देवघर

## राहिलें अर्ध्यावर बोलणें !

गगनीं अर्धा चंद्र उगवला, मोहरलें चांदणें
अडली वाणी, मिटे पापणी, मिटलीं ग लोचनें
राहिलें अर्ध्यावर बोलणें !

प्रथम बोलले तेच कांहिंसें
मला न सुचलें उत्तर कैसें
भलत्या वेळीं कसें बाई ग आठवलें लाजणें ?

धीर धरून मी पुसतां कांहीं
अस्फुट त्यांचें उत्तर येई
शब्दाहुनही अधिक बोलकें झालें मग पाहणें !

एक हांक ये दुरुनी साधी
सिद्धीपूर्वी सुटे समाधी
पुन्हां न जमलें कधीं त्यापरी एकांतीं भेटणें !

देवघर

## नका सोडून जाऊं मला

तुम्हावांचुनी मला न सुचते
नर्तन-गायन कला
पवनावांचुन सुगंध सुचतो
कधिं का कलिका-फुला ?
एक मागणें म्हणुन मागतें
पसरुनिया अंचला—
नका सोडून जाऊं मला !

तुम्हावांचुनी गंध येईना
धुंद केतकी-दलां
तुम्हासंगतीं सुगंध सुटतो
माझ्या मृदु कुंतलां
स्नेह असा आपुला !
नका सोडून जाऊं मला !

तुम्हावांचुनी वसंत येतां
नयन सांडिती जला
तुम्हासंगतीं शिशिर बांधतो
कळ्याफुलांचा झुला
कंठीं ये कोकिला !—
नका सोडून जाऊं मला !

तुम्हावांचुनी स्वर्गसुधाही
शिवनिर्माल्यें मला !
तुम्हासंगतीं आणवीन मी
नंदनवन भूतला !
प्राणप्रिया प्रेमला —
नको सोडून जाऊं मला !

देवघर

# तुजपुढें गातें एक अभंग

रसिकांपुढतीं उधळुनि झाला शृंगाराचा रंग
भावभक्तिचा गातें आतां तुजसी एक अभंग
तुजपुढें गातें एक अभंग !

बहुत नाचलें, बहुत नाचलें
विषयसुखाचे करित चोचले
रसिक भुलविले, भुलुन डुलविले
पाजुन प्रीत सवंग !

स्वप्निं भागलें, आज जागलें
शाश्वत त्याचें वेड लागलें
स्तब्ध राहिलें, तुला बाहिलें
घुमवुन टाळमृदंग !

हीन पापिणीं कामरूपिणी
पूर्ण विसरलें रागरागिणी
आज अकल्पित स्वर हो कंपित
अबोध सूर–तरंग !

देवघर

# बद्नाम नाम झालें

बदनाम नाम झालें माझें तुझ्या जगांत!
आनंद एक आहे—आहेस तूं सुखांत !

तूं प्राशिलीस लज्जा माझ्या तनामनाची
निर्लज्ज मीच अंतीं, वाचा वदे जनाची !
मार्गांत निंदिता मी, तूं नांदसी घरांत !

सर्वस्व अर्पुनीया जो दुःखलाभ झाला
तें दुःख मी कधीं का देईन रे कुणाला ?
प्रीतीपरी तुझ्या तें लपवीन अंतरांत !

जाऊं नको कधीं तूं माझ्या घरावरून
ठेवीन मी स्मृतीचीं हीं पांखरें धरून
घालीन अश्रु-मोती त्यांच्या कधीं मुखांत !

देवघर

नकळत घडला गुन्हा

२४८

नकळत घडला गुन्हा !
अशी ना चूक व्हायची पुन्हां !

पुन्हां भेटशिल मला कधीं का ?
अढीच धरशिल मनामधीं का ?
चुटपुट लागे मना !

कळ्याफुलांचा जिथें मामला
तिथें कसा मी खडा फेंकला ?
सांगूं तरी ग कुणा ?

अनोळखी तूं जरी पाहुणा
ओळखला रे भाव साजणा
ओळखिल्या रे खुणा !

मी तुज केलें अवचित जखमी
हरलें रे पण मनोमनीं मी
तळमळते तुजविणा !

प्रीतिसंगम

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 32908 दि:
क्रमांक 7553 नों. दि.

## नाग काढतो फडा

नाग काढतो फडा !
ग बाई, मज खुडवेना केवडा !

घमघमाट सुटला वास ग
दोघांसही एकच आस ग
दो नजरांचा लढा !

दोघांसही पडली भूल ग
प्रीतिची मनीं चाहूल ग
तो नाग राहिला खडा !

वर खालीं होतो ऊर ग
केतकी राहिली दूर ग
तो नाग बघे वाकडा !

केतकीहून मी पिवळी ग
तो येइल माझ्या जवळीं ग
गळति नयनिंच्या कडा !

प्रीतिसंगम

## चोळी माझी पाठीवर उसवली

शब्द झाला महाग
आली ज्वानीला जाग
कुणीतरी लाज बाई हंसवली –
चोळी माझी पाठीवर उसवली !

झोंप डोळ्यांतली जाइना
माझी पापणी वर होइना
एक तसवीर उरीं बसवली !

कांच अब्रूची ना आयना
एक तरुण आंत देखणा
त्यानं माझी प्रीत बाई फसवली !

तो आला नि निघून गेला
मान लवून बघते त्याला
त्याची सूरत मनीं ठसवली !

खालीं बघुन चालते जनीं
नका पुसूं रे कारण कुणी
त्यानं माझ्या ओठीं खीळ बसवली !

प्रीतिसंगम

## हांस पांखरा, हांस

तो :— हांस पांखरा, हांस ?
भोळं तुझं ग निळं डोळं
अन् कैक गडी तूं केलंस खुळं
तुझी नखरेल चाल
गोरं गुलाबी गाल
अन् नाजुक त्यावर काळा तीळ !

ती :— पाऊल मागं घे रे
नको येऊंस म्होरं
अरे, विषयाचं जरी तुला खूळ
पर मदनाचं हें हितं जाळं
उगा येशील यांत
फुका पडशिल गोत्यांत
पर नाहीं शिजायची तुझी डाळ

तो :— अग, नको दावुंस तोरा
आहे ठाऊक पुरा
तरुणपणाचा तुझा चळ
अन् तूं ग मुलखाची तोंडाळ
तुझ्यासारख्या पोरी
लाख येतील घरीं
अग, डौल तुझा हा पोकळ !

तीः—	तूं रे बोऱ्या भगवान
नाहीं खायाला आन
करिसी कशाला असला चळ
अरे, इंगळासंगती हा खेळ !
तुझी-माझी संगत
त्यांत नाहीं रंगत
जणूं शाळूशेजारीं वाकळ !

तोः—	अग, नको झाडाझाडी
जरा धर गोडी
अग, पोलिसपाटलाचं माझं कुळ
अन् तूं ग पायाची पायधूळ !
तूं ग रिती पणती
तुझा उजेड किती
अन् मी ग चांदोबा तेजाळ !

तीः—	अरे, हाय माहित सारं
तुझं पडकं घर
तुझ्या छपरावरती हिरवाळ
तुझ्या न्हाणींत फुटकं घंगाळ
एरंड लावला उसांत
जरी वाढला जोसांत
पर लावतंय् काय कुणी गुऱ्हाळ ?

तो :—
म्हणे बोऱ्या भगवान्
ऐका शाण्यांनो ज्ञान
अहो, वाट इष्काची खडकाळ
अन् होतं स्वतःचं वाटोळं !
जर चुकून याल
तुम्ही पुरं फसाल
जाळं नव्हे हें—जंजाळ !

प्रीतिसंगम

## मी वाट पाहतें दारीं

मी वाट पाहतें दारीं !

घनरात फुले निशिगंध
दरवळे भोवतीं गंध
रोधिले श्वास पण माझे
भलत्याच भयें अंधारीं !

सारंगी छेडी तारा
निःशब्द गुंजतो वारा
चाहूल प्रियाची घ्याया
अधिरले कान हे भारी !

चंद्रोदय होतो गगनीं
चांदणें सले तें नयनीं
ती छबी दिसेना कोठें
चंद्राहुन लोभस प्यारी !

जिव्हेवर भिजला हर्ष
आठवतो लाडिक स्पर्श
गोहिंच्या गोहिं मी विरही
दमयंती जणूं कांतारीं !

देवाघरचं लेणं

# असा कसा देवाघरचा न्याय उफराटा

असा कसा देवाघरचा न्याय उफराटा !
फूल मरे बघतां बघतां, जगे मात्र कांटा !

उभा होय वाडा कोठें लिंब-बाभळीचा
तसू तसू झिजूनीं मरतो वृक्ष चंदनाचा !
दुष्ट त्यास लाभे आयू, भला तो करंटा !

पिळ्या पिळ्या जगते लोकीं शिळा पत्थराची
क्षणामाजिं जळुनि जाई वडी कापराची
मनुज मरे, मूर्ती त्याची भूषवी चव्हाटा !

विषामुळें जपणुक होते अफूच्या फुलांची
मधुर म्हणुनि फुटतीं माथीं जगीं नारळांचीं
न्यायप्रियतेचा डंका तुझ्या झडे खोटा !

देवाघरचं लेणं

## शपथ नीतिची, शपथ प्रीतिची

शपथ नीतिची, शपथ प्रीतिची
तुम्ही माझे हो, मी तुमची !

वरुन म्हणालें, ‘ नाहीं, नाहीं ’
मनांत होतें दुसरें कांहीं
उगा भुलावण ती गंमतीची !

जवळीं येतां दूर सरावें
दुरून हवें तें जवळ करावें
ही तर क्रीडा नवयुवतीची !

असे कसे हो तुम्ही भोळे
तुम्हां न कळले माझे डोळे
त्यांत भावना शरणागतिची !

प्रेम बोलतें शब्दावांचुन
शब्द उमटती अर्थावांचुन
ही तर किमया मदन-रतीची !

देवाघरचं लेणं

# स्मर मन, राधा-माधव-प्रीत !

स्मर मन, राधा-माधव-प्रीत !
गा रसने, नित प्रेमरसांकित हरिचरिताचें गीत !

गोपरूप प्रभु गोकुळिं रतले
असार जीवन त्यांनीं मथिलें
राधेकरवीं स्वयें भक्षिलें प्रेमतत्त्व-नवनीत !

ध्यास हरीचा ती तर भक्ति
प्रपंच-विस्मृति तीच विरक्ति
वरुनी मुक्ति व्रजललना ती उरली मायातीत !

करि पुरुषोत्तम अविरत लीला
जाणिव जाणे अर्थ त्यांतला
आत्मज्ञानही रसाळ झालें नंदाच्या नगरींत !

उतावळा नारद

## प्रवासी, थांब इथं क्षणकाल

प्रवासी, थांब इथं क्षणकाल !

सरोवरीं या जळ झांकळलें
तृषार्त येथें कोणि न वळलें
दळ कमळांचें बघ पेंगुळलें
सुकले मृदुल मृणाल !

आळसल्या रे, तरुंच्या छाया
बहर फळांचा पिकला वाया
फुलुन वल्लरी देत जांभया
थकले ताल-तमाल !

जागव हें जल भरुन अंजुली
येइ क्षणभरी, बैस तरुतळीं
फुलें फळें लव निवड यांतलीं
कवळ मुखामाधिं घाल !

शब्द एवढा मानच माझा
अनाहूत तूं इथला राजा
अधिर वनश्री करण्या पूजा
तूंच तिचा गोपाळ !

उतावळा नारद

# ये वसंत यौवनीं

ती :— अबोध बोलणें तुझें, अंगकांति सांवळी

तो :— अबोल ओठिंची तुझ्या फुले किमर्थ पाकळी ?

ती :— सुगंध ये कुठून हा ? – नसे वसंत काननीं

तो :— मदालसे प्रिये सखे, ये वसंत यौवनीं !

ती :— ये वसंत यौवनीं – तरीच का फुले तनू
उरांत कंप दाटला थरारतो अणू अणू !
स्फुरे मना स्वराविना एक धुंद रागिणी —

तो :— प्रमोद तोच नाचुं दे, बंधमुक्त पैंजणीं !

ती :— देहधारी मन्मथा, ये वसंत यौवनीं !
नाचले तरी सख्या, उरे मनांत आर्तता

तो :— अर्पणाविना नसे लाभण्यास पूर्तता !
स्तब्ध होइ कमलिनी कमलभृंग-मीलिनीं !

दोघें :— बंधनांत मुक्ति दे ! – ये वसंत यौवनीं !

उतावळा नारद

# एका तळ्यांत होतीं

एका तळ्यांत होतीं बदकें पिलें सुरेख
होतें कुरूप वेडें पिल्लूं तयांत एक !

कोणी न त्यास घेई खेळावयास संगें
सर्वांहुनी निराळें तें वेगळें तरंगें
दावूनि बोट त्याला, म्हणती हंसून लोक
आहे कुरूप वेडे पिल्लूं तयांत एक !

पिल्लास दुःख भारी, भोळें रडे स्वतःशीं
भावंड ना विचारी, सांगेल तें कुणाशीं ?
जें तें तयास टोंची, दावी उगाच धाक
आहे कुरूप वेडें पिल्लूं तयांत एक !

एके दिनीं परंतू पिल्लास त्या कळालें
भय वेड पार त्याचें वाऱ्यासवें पळालें
पाण्यांत पाहतांना चोरूनिया क्षणैक
त्याचेंच त्या कळालें — तो राजहंस एक !

सुखाचे सोबती

## काल रात सारी मजसी

काल रात सारी मजसी झोंप नाहीं आली
जीव झाला थोडा थोडा ऊर वरी खालीं !

पती दूर देशीं माझे
रूप माझें मजसी ओझें
मध्यान्हीच्या पारीं दारीं एक थाप आली !

कशी आंत घेऊं चोरा ?
कशी उघडूं मी दारा ?
पांच माळ्यावरती माझी कोपऱ्यांत खोली !

कोण आसुसला पापा
पुन्हा पुन्हा मारी थापा
कलंडलें मंचकीं मी – मूर्च्छनाच आली !

कांच कवाडाची होती
पतंगास कळली ना ती
भरारून तोचि होता येत हो महालीं !

कांचेवरती त्याची झेंप
तीच मला वाटे थाप
अशी तुझी मैत्रिण बाई पांखरांस भ्याली !

सांगत्ये ऐका

## झाली भली पहांट

दिली कोंबड्यानें बांग
विझे चांदण्याची रांग
ये जाग पांखरांना, तो ऐक किलबिलाट
रे ऊठ रानराजा, झाली भली पहांट !

मुक्या लेकरांची माय
हंबरते माझी गाय
घे ओढ वासरूं तें, रुतली गळ्यांत गांठ

पुरे लेकराची आस
झरे माउलीची कांस
त्या झेलतांच धारा आला भरून माठ

लागे दुडूं दुडूं करूं
खुळें शेळीचें कोकरूं
येतांच माय चाटूं तें थांबलें मुकाट

अंगें झिंझाडून सैल
उभे ठाकले रे बैल
गवतांत झोंपलेली न्हाली दंवांत वाट !

सांगत्ये ऐका

## दिलवरा, दिल माझें ओळखा

राम राम घ्या, दूर करा जी भवतीचा घोळका
दिलवरा, दिल माझें ओळखा !

बांधला बादली साफा जरि मी वरून
रुळतात केस हे कुरळे भालावरुन
नसत्या पदराकडे धांवतो हात गडे सारखा !

ही पैरण मेली चोळीहुन कांचली
हालचाल कटिची शेल्यानें जाचली
पाउलें महालीं कशीबशीं पोंचलीं
सोंग घेतल्या काजवा कधीं बनेल हो जाळ का ?

तुजसाठिं दौड मी केली घोड्यावरुन
मर्दानी वेष हा दुनियेसाठीं करुन
चोरुनि निघालें रात्रीं माझ्या घरुन
एकांतीं मज घेई जवळी सख्या, असा वेळ कां ?

सांगत्ये ऐका

*

## बुगडी माझी सांडली ग

बुगडी माझी सांडली ग जातां सातान्याला
चुगली नगा सांगू ग माझ्या म्हातान्याला

माझ्या शेजारी तरुण राहतो
टकमक टकमक मला तो पाहतो
कधीं खुणेनें जवळ बाहतो
कधीं नाहीं तें भुललें ग बाई, त्याच्या इशान्याला !

आज अचानक घरीं तो आला
पैरण फेटा नि पाठीस शेमला
किती गोड तो मजसी गमला
दिला बसाया पाट मी त्याला माझ्या शेजाराला !

घरांत नव्हते तेव्हां बाबा
माझा मजवर कुठला ताबा
त्याची धिटाई–तोबा तोबा !
थितळूं लागे ग लोणी बाई बघतां निखान्याला !

त्यानें आणिली आपुली गाडी
तयार जुंपुनी खिलार जोडी
मीहि ल्यालें ग पिवळी साडी
वेड्यावाणी जोडीनें ग गेलों आम्ही बाजाराला !

•

येण्या आधीं बाबा परतून
पोंचणार मी घरांत जाऊन
मग पुसतील काना पाहून
काय तेव्हां सांगू मी ग बाई त्याला बिचाऱ्याला ?

सांगत्ये ऐका

# चंद्र आणखी प्रीती

तीः—

चंद्र पाहतां सद् प्रीतीची तरुण मना कां येते ?
चंद्र आणखी प्रीती यांचें काय असावें नातें ?

तोः—

कलावती तूं, तुला असावी अचुक तयाची जाण ग
प्रीतनगरचा राजा मन्मथ, चंद्र तयाचा प्रधान ग
प्रीतनगरची प्रजा तयाच्या मुजऱ्यासाठीं येते
प्रधान साक्षी ठेवुन राणी आण प्रीतिची घेते

तीः—

तोंडावरती जडे काळिमा झिजते ज्याची कला कला
तो मदनाचा मंत्री कैसा समजुन सांगा तुम्ही मला
गुरुपत्नीशीं पाप करी हा, शाप बाधला यातें
चंद्र आणखी प्रीती यांचें काय असावें नातें ?

तोः—

चंद्र उसळतां समुद्र उसळे, चढती डोंगरलाटा
तो देखावा प्रीतरसाचा शाहिर म्हणतो मोठा
नभ-धरणीचें अंतर त्याच्या प्रीतीनें तुटतें
चंद्र आणखी प्रीती यांचें तूंच ठरव गे नातें !

ती :—

लाटा उठती सागरांत ज्या, त्या तर त्याच्या लेकी
चंद्र-लहरिंची प्रीत जोडिती त्यांचीं फिरलीं डोकीं !
सख्खि बहिण अन् सख्ख्या भावाची प्रीत कधीं का होतें ?
चंद्र आणखी प्रीती यांचें काय असावें नातें ?

तो :—

चंद्र कसा ग होइल भाऊ उगाच सागरलाटांचा ?
आधारासी दाव पुरावा, नको धिटावा ओठांचा !

ती :—

देवदानवीं समुद्रमंथन पुराणांतरीं केलें ना ?
मंथनांत त्या रत्न चंद्रमा उसळुन वरतीं आलें ना ?
जन्म पावला सागरपोटीं तो तर त्याचा बेटा
त्याच सागरीं जन्मतात ना निळ्या उसळत्या लाटा ?
बहीण-भाऊ याहुन कुठलें चंद्र-लहरिंचें नातें ?
चंद्र पाहतां सइ प्रीतीची तरुण मना का येतें ?

सांगत्ये ऐका

# जाहली जागी पंचवटी

जाहली जागी पंचवटी !
कळ्या फुलांचे सडे सांडले झाडांच्या तळवटीं !

पहांटवारा सुटला शीतळ
अंब्यावरती बोले कोकिळ
तापसबाला जला चालल्या कुंभ घेउनी कटीं !

सडा शिंपण्या आश्रमांगणीं
कवाड उघडी जनकनंदिनी
उभा पाहिला दीर लक्ष्मण राखित पर्णकुटी !

बघुन तयाची निष्ठा प्रीती
जानकि-नयनीं जमले मोती
त्या मोत्यांचा सडा सांडला भूमीवर शेवटीं !

आकाशगंगा

## बोल ग मैने, बोल !

बोल ग मैने, बोल !
फांदी फांदी आज लहडली, वासंतिक हिंदोल !

तुझा लाडका राजस रावा
तुज सौख्याच्या आणि गांवा
हिरव्या पानीं नवख घरकुल हलकें घेई डोल !

नयन तेच पण नवीन दृष्टि
पंख तेच पण नवीन सृष्टि
तोच गळा पण आज नव्यानें साद आपला खोल !

छेड स्वरांचा मंजुळ पांवा
भार सुखानें नवखा रावा
प्रीतीसंगें आज साजणी दुनिया अवघी तोल !

आकाशगंगा

## यश तेची विष झालें

यश तेची विष झालें, देहांत तें उफाळे
स्फुटून काय आतां, जात्रे मिटून डोळे ?

सुमहार वाटला जो, तो एक साप काळा
प्रासाद वाटला जो, ती बंद बंदिशाळा
त्या बंधनांत बांधी माझें मलाच जाळें

हा खेळ संपलासे, आतां न हारजीत
या हुंदक्यांत गेलें कोंडून प्रेमगीत
माझ्याच काजळानें हें तोंड होय काळें !

आकाशगंगा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...3270... वि: ...3105...
क्रमांक ...2443... नों दि ...3242...

स्वप्नावर स्वप्न पडे, नीज ना मला
जागेपणीं आठवते सारखी तुला !

प्रीतीचे घोष तुझ्या, कानिं ऐकते
मूर्तीचें चित्र तुझ्या पदरिं झांकितें
अंतरिचा भाव कधीं तुज न उमगला !

भोळी मी पोर तुला दुरून पूजितें
सांगावें गूज असें रोज योजितें
काय करूं साधेना कठिण ती कला !

हळुंच तुझ्या छायेशीं आज बोलतें
शबरीच्या बोरांची शपथ घालतें
भिल्लिणिची भक्ती ती राम समजला !

आकाशगंगा

## फुलराणी मी, फुलराणी

कळयाफुलांचीं माझीं लेणीं
फुलराणी मी, फुलराणी !

झुलते माथां आम्रमंजिरी
बकुळमालिका गळां साजिरी
गुंफिली मालतिनें वेणी !

रसराजाच्या राजमंदिरीं
आलें उधळित गीतमाधुरी
मधुरही मदिरेहुन गाणीं !

मंद सुगंधित धुंद शर्वरी
सोडुनि देतां काळ्या भ्रमरी
भरलें रूप तुझें या नयनीं !

कीचकवध

# उपवर झाली लेक लाडकी

उपवर झाली लेक लाडकी लग्नाला आली
स्वयवराची तिच्या घोषणा द्रुपदांनीं केली !

सुवर्णस्तंभावरी बसविली फिरती मत्स्याकृती
तेलामाजीं बिंब पाहुनी छेदिल हो कोण ती ?
छेदिल त्याला विवाहमाला घालिल पांचाली !

रतीहुनी ती अतीव सुंदर सुभगा गुणशालिनी
मऊ रेशमी अलकभार तर ख्यात स्वरूपाहुनी
धनुर्धरांच्या मनिंची आशा आव्हाना टपली !

स्वयंवराचा भरला मंडप, गर्दी तरि ती किती !
देशदेशचे जमले हो ते नरशार्दुल नृपती
भावासंगें तेजस्विनि ती सभागृहीं आली !

हत्तीवरुनी जणूं चमकली समूर्त सौदामिनी
सूतपुत्र अन् कर्ण राहिला उभा त्वरें उठुनी
हीन कुळींचा म्हणुनि तयाला संधी नच दिधली !

इतुकें होतें तरिही कृष्णा कुणातरी न्याहळी
ब्राह्मणवेषें तोंच निरखिला अर्जुन नृपमंडळीं
जिवाशिवासम त्या दोघांची दृष्टभेट झाली !

त्या नजरेनें स्फुरले बाहू वीर सिद्ध झाला
अचूक लावुनी बाण तयानें मत्स्यभेद केला
धनंजयाच्या गळां धन्य ती वरमाला पडली !

कीचकवध

## धुंद मधुमती रात रे

धुंद मधुमती रात रे
तनमन नाचे, यौवन नाचे,
उगवला रजनीचा नाथ रे !

जललहरी या धीट धांवती
हरित तटांचे ओठ चुंबिती
ये प्रियकरा, येई मंदिरा,
अलि रमले कमलांत रे !

ये रे ये कां मग दूर उभा ही घटिकाहि निसटुन जायची
फुलतिल लाखों तारा, परि ही रात कधिं कधिं न यायची
चषक सुधेचा ओठीं लावुनि
कटिभंवतीं धरि हात रे !

कीचकवध

# कां हो धरिला मजवर राग ?

कां हो धरिला मजवर राग ?

शेजाऱ्याच्या घरीं येतां वरचेवरी
तुमचे लाडिक बोल येती कानावरी
आणि जागेपणीं येते स्वप्नांना जाग !

वळती तुमचे डोळे माझ्या खिडकीकडे
भारी हट्टी स्वभाव, तुम्ही जातां पुढें
जातां चैतापरी माझी फुलवून बाग !

जाणें येणें होतें तुमचें माझ्या घरीं
तुमच्या पावलांनीं वाट पडली परसूदारीं
वाटतं फिरुन याल अवचित केव्हांतरी
डोळे न्याहाळती खुळ्या प्रीतीचा माग !

जगाच्या पाठीवर

# एक धागा सुखाचा

एक धागा सुखाचा, शंभर धागे दुःखाचे
जरतारी हें वस्त्र माणसा तुझिया आयुष्याचें

पांघरसी जरि असला कपडा
येसी उघडा, जासी उघडा
कपड्यासाठीं करिसी नाटक, तीन प्रवेशांचें

मुकीं अंगडीं बालपणाचीं
रंगित वसनें तारुण्याचीं
जीर्ण शाल मग उरे शेवटीं, लेणें वार्धक्याचें !

या वस्त्रांतें विणतो कोण ?
एकसारखीं नसतीं दोन
कुणा न दिसले त्रिखंडांत त्या हात विणकऱ्याचे !

जगाच्या पाठीवर

# जग हे बंदिशाला

जग हे बंदिशाला
कुणी न येथें भलाचांगला, जो तो पथ चुकलेला !

ज्याची त्याला प्यार कोठडी
कोठडींतले सखे सौंगडी
हातकडी कीं अवजड बेडी —
प्रिय हो ज्याची त्याला !

जो तो अपुल्या जागीं जखडे
नज़र न धांवे तटापलिकडे
उंबरांतले किडेमकोडे—
उंबरिं करिती लीला !

कुणा न ठाउक सजा किती तें
कोठुन आलों तें नच स्मरतें
सुटकेलागीं मन घाबरतें
जो आला तो रमला !

जगाच्या पाठीवर

## उद्धवा, अजब तुझे सरकार

उद्धवा, अजब तुझे सरकार !
लहरी राजा, प्रजा आंधळी, अधांतरीं दरबार !

इथें फुलांना मरण जन्मतां
दगडांना पण चिरंजीविता
बोरिबाभळी उगाच जगती, चंदनमाथिं कुठार !

लबाड जोडती इमले माड्या
गुणवंतांना मात्र झोंपड्या
पतिव्रतेच्या गळ्यांत धोंडा, वेश्येला मणिहार !

वाइट तितुकें इथें पोसलें
भलेपणाचें भाग्य नासलें
या पृथ्वीच्या पाठीवर ना माणसास आधार !

जगाच्या पाठीवर

## विकत घेतला श्याम

नाहिं खर्चिली कवडीदमडी, नाहिं वेंचला दाम
बाइ, मीं विकत घेतला श्याम

कुणी म्हणे ही असेल चोरी
कुणा वाटते असे उधारी
जन्मभरीच्या श्वासाइतकें मोजियलें हरिनाम !

बाळ गुराखी यमुनेवरचा
गुलाम काळा संताघरचा
हाच तुक्याचा विठ्ठल आणि दासाचा श्रीराम !

जितके मालक, तितकीं नांवें
हृदयें तितकीं, याचीं गांवें
कुणि न ओळखी तरिही याला दीन अनाथ अनाम !

जगाच्या पाठीवर

## थकलें रे नंदलाला !

नाचनाचुनी अति मी दमलें, थकलें रे नंदलाला !

निलाजरेपण कटिस नेसलें, निसुगपणाचा शेला
आत्मस्तुतीचें कुंडल कानीं, गर्व जडविला भाला
उपभोगांच्या शतकमलांची कंठि घातली माला
थकलें रे नंदलाला !

विषयवासना वाजे वीणा, अतृप्ती दे ताला
अनय अनीति नूपूर पायीं, कुसंगती करताला
लोभ प्रलोभन नाणीं फेंकी मजवर आला-गेला
थकलें रे नंदलाला !

स्वतःभोंवतीं घेतां गिरक्या अंधपणा कीं आला
तालाचा मज तोल कळेना, सादहि गोठुन गेला
अंधारीं मी उभी आंधळी, जीव जीवना स्याला
थकलें रे नंदलाला !

जगाच्या पाठीवर

## धक्का लागला ग

धक्का लागला ग मधाशीं कुणाचा
तोल सांवरेना बाई, अजुनी मनाचा !

उगा हांसला तो, उगा लाजलें मी
करीं वीज त्याच्या, उरीं भाजलें मी
ठसा राहिला ग मुक्या भाषणाचा !

पुढें चालतें मी, फिरे पाय मागें
कशाची कळेना अशी ओढ लागे
सुटे त्यांत वारा खुळ्या श्रावणाचा !

झरूं लागल्या ग ढगांतून धारा
मनींच्या विजेचा मनीं कोंडमारा
ठिकाणा तरी ग कुठें साजणाचा ?

भिजे पावसानें जरी अंग सारें
उफाळून येती उरींचे निखारे
शिरे नाद अंगीं जणूं पैंजणांचा !

जगाच्या पाठीवर

# जरी आंधळी मी तुला पाहतें

तुला पाहतें रे, तुला पाहतें
तुझी मूर्त माझ्या उरीं राहते
जरी आंधळी मी तुला पाहतें !

तुझ्या संगतीचा जिवा ध्यास लागे
तुझ्या हांसण्यानें मनीं प्रीत जागे
तुझ्या गायनें मीं सुखीं नाहतें !

किती भाग्य या घोर अंधेपणींही
दिसे स्वप्न झोंपेंत, जागेपणींही
उणें लोजनांचें सुखे साहतें !

कधीं भक्त का पाहतो ईश्वराला ?
नदी न्याहळी का कधीं सागराला ?
तिच्यासारखी मी सदा वाहते !

जगाच्या पाठीवर

## आतां उठा पांडुरंगा

गांव झाला जागा
आतां उठा पांडुरंगा !

उजळली उगवती
जथे पांखरांचे गाती
सकाळच्यां कळशींत आली चंद्रभागा !

घरोघरी सवाशिणी
सडे शिंपिती अंगणीं
साद थकलेले गाती तुक्याच्या अभंगा !

रेखितात पोरीबाळी
चार रांगोळीच्या ओळी
विठो-रुक्मिणीचें रूप दावितात रेघा !

मराठीच्या मुलुखांत
जिथें तिथें पंढरिनाथ
माय धरित्रीहि ल्याली सांवळ्याच रंगा !

पंचारती

# तुझ्या मनांत मी येऊं का ?

तुझ्या मनांत मी येऊं का ?
माझ्या मनांतलें गाऊं का ?

माझ्या मनांत बुजरें गीत
काय त्यालाच म्हणती प्रीत ?
प्रीत बोलुन ती दावुं का ?

तुझ्या मनांत कोठेंतरी
कुणी असेल ना सुंदरी ?
मला न्याहळुन मी पाहुं का ?

थोरामोठ्याचें मी लेकरूं
त्याला उपाय काय मी करूं ?
सांग सोडुन घर देउं कां ?

बोलावांचुन जाणीव झाली
मुकी प्रीतिची असुं दे बोली
नुसती पाहत उभी राहुं का ?

पंचारती

## छंद प्रीतिचा जडला मला

दिवसां डोळ्याचें खळेना पाणी
रात्रीं मिटेना पापणी
— अशी गत झाली !
छंद प्रीतिचा जडला मला औंदाच्या ग सालीं !

तो दिसतां डोळ्यापुढें वाटतें कसें करूं ?
काय जाऊन पुढती त्याच्या हाताला धरूं ?
काया मन ओवाळुन त्याची कुरवंडी करूं !
काय करूं ?—हजारों डोळे उभे भंवतालीं !

जनलोक ठेविती नांवें उगाचच मला
देवदिकांमधीं प्रीतिचा जुना दाखला
राजाची लेक भाळली होती गवळ्याला
कृष्णासंगें रुक्मिणी धीट पळोनिया गेली !

बाणासुराच्या लेकीची तीच झाली दशा
स्वप्नामधीं अनिरुद्धाला कवटाळी उषा
चित्रलेखा सखीनं भेटी घडविल्या कशा
तशी नाहीं उरली मैत्रिण आतांच्या काळीं !

रुक्मिणीनं नाहीं मानली भीति भावाची
नाहीं केली पर्वा वंशाच्या थोर नांवाची
आपसुक जिंकिली तिनं प्रीत देवाची
रीतभात तिनं चिरडली रथाच्या खालीं !

माझ्या मना, तसेंच कर तूं कांहीं वेड्यावाणी
अन् उघड होऊं दे मला सख्याची राणी
मग म्हणोत धिटुकली किंवा उठवळ कोणी
दर्यांसाठीं उडी घे नदी कड्याच्या खालीं !

पंचारती

# देव काळजांत नांदे

देव काळजांत नांदे तुझ्या माणसा रे
विसरसी कसा रे ?

देव ठेवुनी पाषाणीं
हिंडतोस वेड्यावाणी
माय सोडुनिया जासी कुठें पाडसा रे ?

देव बोलतो आंतून
बोल बोल त्याचा मान
नको आडवाटा शोधूं उगा राजसा रे !

आवर्जुन करितां काम
घाम पडे तेथें राम
आपुल्याच ठायीं ठेवी पुरा भरोसा रे !

जीव जीव सारा एक
आपणांत दुसरा देख
देवपणा अपुला वोपूं नको राक्षसा रे !

पंचारती

## जिथें राबती हात

नसे राउळीं वा नसे मंदिरीं
जिथें राबती हात तेथें हरी !

जिथें भूमिचा पुत्र गाळील घाम
तिथें अन्न होऊन ठाकेल श्याम
दिसे सांवळें रूप त्याचें शिवारीं !

नको मंत्र त्याला मुनिब्राह्मणांचे
तया आवडे गीत श्वासां-घणांचें
वसे तो सदा स्वेदगंगेकिनारीं !

शिळा फोडिती संघ पाथरवटांचे
कुणी कापसा रूप देती पटांचें
तयांच्या घरीं नांदतो तो मुरारी !

जिथें काम तेथें उभा श्याम आहे
नव्हे धर्म रे धर्म तें रूप पाहे
असे विश्वकर्मा श्रमांचा पुजारी !

उमज पडेल तर

## घननीळा लडिवाळा

घननीळा लडिवाळा
झुलवुं नको हिंदोळा !

सुटली वेणी, केंस मोकळे
धूळ उडाली, भरले डोळे
काजळ गालीं सहज ओघळे
या साऱ्यांचा उद्यां गोकुळीं होइल अर्थ निराळा !

सांजवेळ ही आपण दोघें
अवघें संशय घेण्याजोगें
चंद्र निघे बघ झाडामागें
कालिंदीच्या तटीं खेळतो गोपसुतांचा मेळा !

उमज पडेल तर

## जपून जा

जपून जा गडे जपून जा
जपून जा बाई जपून जा !
वळती वाट
चढता घाट
तोल सांवरा अंगाचा
वसंत आला वनांत बाई, उत्सव चाले रंगाचा !

हा चैत्र प्रीतिचा महिना
तरुतरूंत गाती मैना
खगाखगांचा सूर लागतो आज वेगळ्या ढंगाचा !

वनलतांत घुमती वाळे
त्या तिथेंच मन्मथ खेळे
तळ्यांत फुलल्या कमळांभंवतीं संघ गुणगुणे भृंगांचा !

भिरभिरून वारा येतो
अन् पदरा उडवुन देतो
वातावरणीं थवा तरंगे सप्तरंगि त्या मेघांचा !

उमज पडेल तर

## नवीन आज चंद्रमा

ती :—

नवीन आज चंद्रमा, नवीन आज यामिनी
मनीं नवीन भावना, नवेंच स्वप्न लोचनीं !
दूर बाल्य राहिलें, दूर राहिल्या सखी
बोलण्या कुणासवें सूर दाटले मुखीं
अननुभूत माधुरी आज गीतगायनीं !

तो :—

अनादि चंद्र अंबरीं, अनादि धुंद यामिनी
यौवनांत तूं नवी मदीय प्रीत-स्वामिनी
घर न प्रीतकुंज हा, बैस ये सुहासिनी !

ती :—

कोण बाइ बोललें ? वाणि ही प्रियंवदा—

तो :—

या मनांत नांदते तुझीच प्रीतसंपदा
कशास वेगळेपणा ? जवळ ये विलासिनी ?

उमज पडेल तर

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठा... स्थळ
अनुक्रम 3२९०८ वि: ३१०५
क्रमांक ७५५३ नों दि: ७/५

## ओल्या हुरड्यास आली शाळू ग !

ओल्या हुरड्यास आली शाळू ग ?
हिला कशी कशी संभाळूं ग ?

हिच्या मायेंत लपला चोर
तो हिच्यावरी शिरजोर
त्याला कुठें कुठें धुंडाळूं ग !

हिरव्या मोत्यांचा सुटला वास
हें आवातणं की त्यास
